Reg. No.PHM / SR / 5 / VIII / 06

पुणे, मंगळवार, २३ जून २०२०

पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

वर्ष ३३, अंक ९७, ५ रुपये, शहर आवृत्ती

सहदैनिकासह पृष्ठे १४

# लोकसत्ता

लोकमान्य, लोकशक्ती !

LOKSATTA.COM FACEBOOK.COM/LOKSATTALIVE TWITTER.COM/LOKSATTALIVE LOKSATTA.COM/APPS

तापमान — कमाल ३१.१°सें | किमान २२.२°सें

**हवामानाचा अंदाज**

हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता.



क्रीडा

**रेयाल माद्रिद अव्वल स्थानी**

Vencobb

एक्स् फार्म ब्रॉयलर चिकनचा दर*
८५ रु. प्रति किलो
किरकोळ विक्रीचा दर*
जिवंत कोंबडी
११३ रु. प्रति किलो
ड्रेस्ड (स्किनसह) दर*
१३९ रु. प्रति किलो
अंड्याचा किरकोळ विक्रीचा दर*
५८ रु. प्रति डझन

# मनुष्यहानीची चीनची कबुली!

## लष्करी अधिकारी ठार झाल्याचा दुसऱ्या चर्चाफेरीत खुलासा; लष्करप्रमुखांकडून आढावा

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

**गलवान खोऱ्यातील** हिंसाचारानंतर भारत आणि चीन यांच्यात निर्माण झालेला तणाव निवळावा, यासाठी दोन्ही देशांतील लेफ्टनंट जनरल स्तरावरील चर्चेची दुसरी फेरी सोमवारी सकाळी झाली. आपल्या एका लष्करी अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्याची कबुली चीनने पहिल्यांदाच या चर्चेच्या वेळी दिली, असे सूत्रांनी सांगितले.

गलवान खोऱ्यात चिनी सैनिकांशी झालेल्या संघर्षात २० भारतीय जवान शहीद झाल्याचे भारताने स्पष्ट केले होते. यात चीनचेही ४० हून अधिक सैनिक ठार झाल्याचे भारतीय लष्कराने, तसेच काही वृत्तसंस्थांनी म्हटले होते; पण चीनने त्यांच्या मनुष्यहानीबाबत मौन बाळगले होते. या पार्श्वभूमीवर चीनने पहिल्यांदाच मनुष्यहानीची कबुली दिली आहे.

पूर्व लडाखमध्ये (पान २ वर)

### पंतप्रधानांनी सबुरीने बोलावे : डॉ. मनमोहन सिंग



चीनशी सुरू असलेल्या संघर्षावर माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी पहिल्यांदाच टिप्पणी केली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सबुरीने बोलण्याचा सल्ला दिला आहे. आपल्या बोलण्याचे परिणाम काय होऊ शकतात, याचा विचार करूनच नेहमी बोलले पाहिजे, असे मनमोहन सिंग म्हणाले. पान ५



पँगाँग सरोवर

### मनमोहन यांच्या कारकीर्दीत चीनची ६०० वेळा घुसखोरी : भाजप



डॉ. मनमोहन सिंग यांची विधाने म्हणजे निव्वळ शब्दांचा खेळ असून त्यांच्या कारकीर्दीत चीनने ६०० वेळा घुसखोरी केली, असे प्रत्युत्तर भाजपचे अध्यक्ष जे. पी नड्डा यांनी दिले. काँग्रेसने देशाचे मनोधैर्य खच्ची केले आहे, असा आरोपही त्यांनी केला.

### परराष्ट्रमंत्र्यांची आज त्रिपक्षीय बैठक

भारत, चीन आणि रशिया या देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची आज दूरचित्रसंवाद बैठक होणार आहे. भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर आणि चीनचे समपदस्थ वँग यी बैठकीत सहभागी होऊन संवाद साधणार आहेत. गलवान खोऱ्यातील रक्तरंजित हिंसाचारानंतर उभय नेत्यांनी फोनद्वारे चर्चा केली होती. दरम्यान, देशाचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह हे सोमवारी तीन दिवसीय मॉस्को दौऱ्यावर रवाना झाले.

### सीमेजवळील ३२ प्रकल्पांना गती

सीमेवर तणावाची स्थिती असताना भारताने सीमेजवळील ३२ रस्ते प्रकल्पांना गती देण्याचा निर्णय सोमवारी घेतला. गृहमंत्रालयाने बोलावलेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. भारत-चीन सीमेजवळ ७३ रस्त्यांच्या प्रकल्पांचे काम सुरू आहे.

# जगन्नाथ पुरी रथयात्रेला सशर्त परवानगी

## सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

पीटीआय, नवी दिल्ली



**ओदिशातील ऐतिहासिक** जगन्नाथ पुरी यात्रेला परवानगी नाकारण्याच्या चार दिवसांपूर्वीच्या आपल्या आदेशापासून फारकत घेत सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने यात्रेला सशर्त परवानगी दिली. त्यामुळे ही यात्रा आज, मंगळवारपासून सुरू होईल.

करोना विषाणू साथीच्या पार्श्वभूमीवर आरोग्याच्या प्रश्नाशी तडजोड न करता राज्य सरकार, केंद्र सरकार आणि मंदिर व्यवस्थापनाने यात्रेचे नियोजन करावे, असे सर्वोच्च न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले. धार्मिक विधींबाबतच्या प्रत्येक गोष्टींमध्ये न्यायालय दखल देऊ शकत नाही, अशी टिप्पणीही खंडपीठाने हा निकाल देताना केली आहे.

पुरी जगन्नाथ मंदिराच्या प्रशासकीय समितीचे अध्यक्ष गजपती महाराज यांच्या प्रस्तावानुसार लोकांच्या उपस्थितीविना मर्यादित स्वरूपात यात्रा काढण्यात येणार असेल तर ओदिशा सरकारने यात्रेसाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करावी, असे आदेशही खंडपीठाने दिले.

केंद्र सरकार आणि मंदिर व्यवस्थापन समितीशी समन्वय साधून ओदिशा सरकार करोना विषाणू साथीच्या पार्श्वभूमीवर आरोग्यविषयक निकष पाळून रथयात्रा पार पाडेल, अशी माहिती सरन्यायाधीश शरद बोबडे यांच्या नेतृत्वाखालील न्यायमूर्ती दिनेश महेश्वरी आणि ए. एस. बोपण्णा यांच्या खंडपीठाला (पान २ वर)

### काय चाललंय काय!

प्रशांत कुलकर्णी



कबूल! सरकारमध्ये निर्णय घेताना तुम्हाला दूर ठेवलं जातंय! पण याला तुम्ही सोशल डिस्टन्सिंग समजा, पॉलिटिकल डिस्टन्सिंग नको!!

■ अग्रलेख ■

**शैक्षणिक स्वैराचार**

### टाळेबंदीचा पोटगीलाही फटका



**पुणे :** करोनाचा संसर्गामुळे सरकारी नोकरदार वगळता खासगी क्षेत्रातील कर्मचारी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. आर्थिक चणचणीमुळे पोटगीच्या दाव्यांवर परिणाम झाला आहे. वृत्त...३

## पुणे, परिसरात ३५२ नवे रुग्ण, दिवसभरात १२ जणांचा मृत्यू

**पुणे :** पुणे, पिंपरी-चिंचवडसह ग्रामीण आणि छावणी परिसरात सोमवारी नव्याने ३५२ रुग्ण आढळून आले. त्यापैकी २०३ रुग्ण हे पुणे शहरातील असून पिंपरी-चिंचवड शहरातील रुग्णसंख्या १२८ आहे. ग्रामीण भागातील आणि छावणी परिसरात अनुक्रमे १८ आणि ३ रुग्ण जिल्हा आरोग्य विभागाला आढळून आले आहेत. दरम्यान, गेल्या चोवीस तासांत नव्याने ३५२ रुग्णांची नोंद झाल्यामुळे पुणे आणि परिसरातील नव्या रुग्णांची एकूण संख्या १६ हजार ३१ झाली आहे. तर दिवसभरात एकूण १२ रुग्णांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. यामध्ये पुण्यातील ८ रुग्णांचा समावेश आहे.

करोनाबाधित रुग्ण, उपचार करून घरी सोडण्यात आलेले रुग्ण, मृत्यू याबाबतची माहिती विभागीय आयुक्त कार्यालयाकडून सोमवारी रात्री जाहीर करण्यात आली. करोना संसर्गामुळे एकूण मृत्यू झालेली संख्या ६०४ आहे. करोनाबाधितांची रविवारपर्यंतची एकूण संख्या १५ हजार ६७९ होती. त्यामध्ये सोमवारी ३५२ रुग्णांची वाढ झाली. पुण्यातील २०३, पिंपरी-चिंचवडमध्ये १२८, ग्रामीण भागात १८ तर छावणी परिसरात ३ नव्या रुग्ण आढळून आले. पुण्यात ससून, डॉ. नायडू रुग्णालयसह अन्य खासगी रुग्णालयात सध्या या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, पुणे शहरातील २५५ रुग्णांना उपचार करून सोमवारी घरी सोडण्यात आले.

### शब्दकिमयागार गुरू ठाकूर यांच्याशी गप्पा







पान ३

## बारावीचा १५ जुलैपर्यंत, दहावीचा जुलैअखेर निकाल

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** राज्य मंडळाच्या बारावीचा निकाल १५ जुलैपर्यंत तर दहावीचा निकाल जुलैअखेरीस जाहीर होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत सोमवारी दिली. त्याचप्रमाणे जिओ टिव्ही आणि गुगल मीटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची सोमवारी बैठक घेतली. ऑनलाइन शिक्षण, दहावी, बारावीचे निकाल, अकरावीची प्रवेश प्रक्रिया अशा विविध मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. दहावी आणि बारावी निकालाच्या प्रक्रियेचा ठाकरे यांनी आढावा घेतला. 'निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरु असून १५ जुलैपर्यंत बारावीचा आणि जुलैअखेरपर्यंत दहावीचा निकाल जाहीर करण्यात येईल,' अशी माहिती राज्य मंडळाच्या अध्यक्ष शकुंतला काळे यांनी या बैठकीत दिली.

दहावीच्या परीक्षेला यंदा १७ लाख ६५ हजार ८९८ आणि बारावीला १५ लाख ५ हजार २७ विद्यार्थी बसले होते. बारावीची सर्व विषयांची परीक्षा टाळेबंदीपूर्वी संपली होती. मात्र, दहावीची भूगोलाची परीक्षा (पान २ वर)

उत्तम आरोग्य, सर्वोत्तम व्याज!

लोकमान्य सादर करीत आहे - COVID-19 प्रोटेक्शन प्लॅन, जो देतो दुहेरी फायदा. पहिला म्हणजे कोरोनाविरुद्धच्या लढाईत विम्याचं संरक्षण आणि दुसरा म्हणजे गुंतवणुकीवर 9 टक्के व्याजदर. ही संधी सोडू नका. आजच गुंतवणूक करा.

9% व्याजदरासोबतच मिळवा
₹ 1 लाखाचा आरोग्य विमा मोफत!





*फक्त सभासदांकरिता *नियम व अटी लागू.

₹ 2 लाखांच्या गुंतवणुकीवर ₹ 1 लाखाचा कोरोना आरोग्य विमा मोफत • एक वर्षाची गुंतवणूक • प्री मेडिकल चेकअपची आवश्यकता नाही • संपूर्ण कुटुंबासाठी घ्यावी अशी योजना

CALL 1800 212 4050 | lokmanyasociety.org

महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली

Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002

स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि.





संस्थापक - अध्यक्ष : श्री. किरण ठाकूर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.

epaper.loksatta.com

# पाच जणांचे बळी घेणाऱ्या वाघाचा नागपुरात संशयास्पद मृत्यू

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**नागपूर :** गोरेवाड्यातील वन्यप्राणी बचाव केंद्रात अडीच ते तीन वर्षांच्या वाघाचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे. अवघ्या तीन महिन्यांत पाच गावकऱ्यांचा बळी घेणाऱ्या या वाघाला जेरबंद करून बचाव केंद्रात आणले होते. मात्र, सोमवारी सकाळी त्याचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाला लागून असलेल्या चिमूर तालुक्यातील कोलारा परिसरात फेब्रुवारीपासून जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत दोन महिला व तीन पुरुषांना 'केटी-१'या वाघाने ठार केले. यामुळे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नितीन काकोडकर यांनी त्याला जेरबंद करण्याचे आदेश दिले. चैती संरक्षित वनक्षेत्रात १० जूनला या वाघाला बेशुद्ध करून जेरबंद करण्यात आले. ११ जूनला त्याची नागपूर येथील गोरेवाडा वन्यजीव बचाव केंद्रात रवानगी करण्यात आली. जेरबंद केल्यानंतर या वाघाने तीन दिवस काहीच खाल्ले नव्हते. गोरेवाड्यातील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील तज्ज्ञ पशुवैद्यकांचे पथक त्याच्यावर उपचार करत होते.



दरम्यान, त्याने मांस खाण्यास सुरुवात केली होती आणि त्याच्यात कोणतीही गंभीर आजाराची लक्षणे नव्हती. सोमवारी सकाळी वनरक्षक पिंजऱ्याजवळ गेले असता वाघ हालचाल करत नसल्याचे दिसून आले. गोरेवाडा बचाव केंद्राच्या रुग्णालयात आणून तपासणी केल्यानंतर त्याला मृत घोषित करण्यात आले. शरीरावर कोणतीही जखम किंवा सूज नसली तरीही त्याच्या एका पायात पू झाल्याचे पशुवैद्यकांना लक्षात आले. सुरुवातीला साप चावल्यामुळे त्याचा मृत्यू झाला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. शवविच्छेदनानंतरच त्याच्या मृत्यूचे खरे कारण कळेल, असे गोरेवाडा प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

नागपूर पशुवैद्यकीय महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक माधुरी हेडाऊ, डॉ. मयूर पावशे, डॉ. सुजित कोलंगथ यांनी शवविच्छेदन केल्यानंतर गोरेवाड्यातच या वाघावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तत्पूर्वी मृत्यूचे कारण शोधण्यासाठी वाघाचे काही अवशेष काढण्यात आले. यावेळी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे सहाय्यक महासंचालक हेमंत कामडी, मानद वन्यजीव रक्षक कुंदन हाते हे प्रधान मुख्य वनसंरक्षकांचे प्रतिनिधी म्हणून तर गोरेवाडा प्रकल्पाचे विभागीय व्यवस्थापक नंदकिशोर काळे, सहाय्यक वनसंरक्षक श्री. माडभूशी, वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. शिरीष उपाध्ये, डॉ. शालिनी ए.एस. उपस्थित होते.

### दुसरा वाघही गंभीर

**नागभिड तालुक्यात धुमाकूळ घालणाऱ्या वाघाला रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास गोरेवाडा बचाव केंद्रात आणण्यात आले. या वाघाची प्रकृती देखील नाजूक असून त्याच्याही मृत्यू ओढवण्याची भीती वन्यजीवप्रेमींकडून व्यक्त करण्यात येत आहे.**

## राज्यात 'सीईटी' लांबणीवर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या उच्च शिक्षण आणि तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांच्या प्रवेश परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या (सीईटी सेल) माध्यमातून दरवर्षी उच्च शिक्षण आणि तंत्र शिक्षण विभागाच्या विविध विषयांच्या प्रवेश परीक्षा घेण्यात येतात. सध्या संपूर्ण देशात आणि महाराष्ट्रात करोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असून या सर्व परीक्षांच्या तारखा नव्याने जाहीर करण्यात येतील, असेही सामंत यांनी संगितले.

## महावितरण कर्मचाऱ्याचा करोनाने मृत्यू झाल्यास ३० लाख

**मुंबई :** राज्यातील सुमारे दोन कोटी ६० हजार ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी कार्यरत असणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्याचा करोनामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांना ३० लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे.

महावितरणमध्ये संचालन आणि दुरुस्तीच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना (बाह्यस्रोत) तसेच महावितरणच्या विविध कार्यालयांत कार्यरत असणारे सुरक्षारक्षक यांनादेखील ३० लाख रुपयांचे विमा संरक्षण देण्याचा निर्णय ऊर्जा विभागाने घेतला असल्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सांगितले. कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या भवितव्याबाबत विचार करून निर्णय घेतला आहे, असे राऊत यांनी सांगितले.महावितरणच्या तांत्रिक तसेच अतांत्रिक प्रवर्गात कार्यरत असणारे सर्व अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे सानुग्रह अनुदान लागू राहणार आहे.

# खासगी रुग्णालयांची मनमानी बंद!

## लक्षणे नसलेले करोना रुग्ण दाखल करण्यास मुंबई महापालिकेची मनाई

संदीप आचार्य, लोकसत्ता

**मुंबई :** मुंबईतील पंचतारांकित रुग्णालये तसेच कोणत्याही खासगी रुग्णालयांना यापुढे लक्षणे नसलेले करोना रुग्ण परस्पर दाखल करण्यास मुंबई महापालिकेने बंदी घातली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जाईल, असे पालिका आयुक्त इक्बाल सिंग चहेल यांनी स्पष्ट केले आहे.

आरोग्य विभागाने २१ मे रोजी साथरोग कायदा १८९७ अंतर्गत आदेश काढून सर्व खासगी रुग्णालयांतील ८० टक्के खाटा करोना रुग्णांसाठी राखीव ठेवण्यास सांगितले. मात्र बहुतेक रुग्णालयांनी याचे पालन तर केले नाहीच उलट परस्पर खासगी प्रयोगशाळांतून करोना रुग्णांचे अहवाल मिळवून आपल्या रुग्णालयात लक्षण नसलेले करोना रुग्ण दाखल करण्याचा सपाटा लावून पैसे मिळवायचे नवे तंत्र विकसित केले. लक्षणे नसलेल्या करोना रुग्णांना करोनासाठी राखीव असलेल्या रुग्णालयात दाखल करू नये, अशी 'आयसीएमआर'ची सुस्पष्ट मार्गदर्शन तत्त्वे असताना बहुतेक रुग्णालयांनी तीही धाब्यावर बसवली आहेत. कालपर्यंत मुंबई महापालिकेने खासगी रुग्णालयातील ८० खाटांही ताब्यात घेतल्या नव्हत्या आणि 'आयसीएमआर'ची मार्गदर्शक तत्त्वे धाब्यावर बसविणाऱ्या एकाही रुग्णालयावर कारवाई केलेली नाही.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खासगी रुग्णालयातील खाटा ताब्यात घेण्याचे आदेश दिल्यानंतर महापालिका आयुक्त इक्बालसिंग यांनी ३५ खासगी रुग्णालयातील खाटा ताब्यात घेतल्या असून विभाग पातळीवरील नर्सिंग होममधील खाटा विभाग अधिकाऱ्यांना ताब्यात घेण्यास सांगितले आहे. त्यानुसार सध्या पालिकेच्या ताब्यात तीन हजारांहून अधिक खाटा आहेत. मात्र यातील बहुतेक खाटांवर ही खासगी रुग्णालये परस्पर लक्षणे नसलेल्या करोना रुग्णांना दाखल करत आहेत. यासाठी खासगी प्रयोगशाळांशी संधान बांधून तेथून रुग्णांच्या चाचणी अहवालाची माहिती मिळवली जाते आणि लक्षणे नसलेल्या करोना रुग्णांना रुग्णालयात दाखल केले जाते. ज्यांच्याकडे पैसे अथवा आरोग्य विमा आहे अशी लक्षणे नसलेले लोक भीतीपोटी खासगी रुग्णालयांतील करोना रुग्णांच्या खाटा अडवून बसल्याचे आम्ही केलेल्या तपासात आढळून आल्याचे पालिका आयुक्त चहेल यांनी सांगितले. यामुळे तीन दिवसांपूर्वी सर्व प्रमुख खासगी रुग्णालयांच्या प्रमुखांची बैठक घेऊन यापुढे लक्षणे नसलेल्या रुग्णांना दाखल केल्यास कारवाई केली जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. खासगी रुग्णालयांनी अपवादात्मक बाब वगळता एकही करोना रुग्ण परस्पर दाखल करू नये असेही संबंधितांना सांगण्यात आले आहे.



### अशी आहे पालिकेची योजना

पालिकेच्या योजनेनुसार, खासगी प्रयोगशाळांना यापुढे रुग्णाचे करोना चाचणी अहवाल थेट पालिकेला देणे बंधनकारक केले. हे अहवाल पालिकेला सकाळी सहापर्यंत मिळाल्यानंतर प्रत्येक विभागातील नियंत्रण कक्षांतील डॉक्टर रुग्णाशी संपर्क साधून त्याला कोणत्या रुग्णालयात दाखल करायचे त्याची व्यवस्था करतील. प्रत्येक प्रभागात यासाठी १० डॉक्टरांचे पथक व आवश्यक कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहेत. १० रुग्णवाहिकाही देण्यात आलेल्या आहेत. लक्षणे नसलेल्या मात्र करोना चाचणी होकारार्थी आलेल्या रुग्णांची व्यवस्था घरी किंवा पालिकेच्या वलगीककरण केंद्रात केली जाते, तर ताप किंवा अन्य लक्षणे असलेल्या रुग्णांना त्यांच्यासाठी असलेल्या रुग्णालयात उशिरात उशिरा दुपारी बारापर्यंत दाखल केले जाणार आहे. ज्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल व्हायचे आहे अशांसाठी प्रभागस्तरावर नर्सिंग होममधील १०० खाटा ताब्यात घेण्याचे आदेश विभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत, असे पालिका आयुक्तांनी सांगितले.



मुंबईत धारावी परिसरात करोनाचे रुग्ण मोठ्या संख्येने आढळून आले आहेत. या ठिकाणी करोनाबाधितांवर उपचारांसाठी महापालिकेने कर्मचारी तैनात केले आहेत. (छायाचित्र – एपी)

## 'रुग्णालयांकडून करोना अधिभाराच्या नावाखाली लूट'

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** करोना रुग्णांवर उपचार आणि वेगवेगळ्या शुल्कांचे कमाल दर राज्य सरकारने ठरवून दिले असले तरी खासगी रुग्णालयांकडून रुग्णांची लूट सुरूच आहे. काही रुग्णालयांनी बिलावर करोना अधिभार आकारण्यास सुरुवात केली असून मनमानी शुल्क आकारले जात आहे.

खासगी रुग्णालयांच्या मनमानीला चाप लावण्यासाठी राज्य सरकारने २१ मे रोजी आदेश काढून करोना रुग्णांवर उपचारांचे कमाल दर ठरवून दिले. अतिदक्षता विभाग, विशेष व अन्य कक्ष व अन्य बाबींवर दररोज किती शुल्क आकारता येईल, असे निश्चित करून दिले होते. पण हे आदेश कागदावरच असून रुग्णालयांकडून रुग्णांची लूट सुरूच आहे. करोना रुग्णांवर उपचारांसाठी पाच ते दहा लाख रुपयांची बिले आकारली जात आहेत. भाजपचे माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांनी मुंबईतील काही रुग्णालयांच्या बिलांच्या आधारे राज्य सरकारकडे याबाबत तक्रार केली आहे. राज्य सरकारचे आदेश कागदावरच असून खासगी रुग्णालयांवर कारवाई करण्याची मागणी सोमय्या यांनी केली आहे.

## दिनदर्शिका

**मंगळवार, २३ जून २०२०**
भारतीय सौर ०२ आषाढ शके १९४२. मिती आषाढ शुक्लपक्ष - द्वितीया : ११ : २० पर्यंत.
नक्षत्र : पुनर्वसू : १३:३३ पर्यंत
चंद्र - मिथुन : ०७:३५ पर्यंत
**मेष :** भौतिक सुखाची चाहूल.
**वृषभ :** नवीन संपर्क वाढेल.
**मिथुन :** धनाची वाढ होईल.
**कर्क :** सुरुवात चांगली राहील.
**सिंह :** अनर्थ गोष्टी टाळा.
**कन्या :** नावीन्यपूर्ण अनुभव.
**तूळ :** काम पूर्ण होईल.
**वृश्चिक :** उच्च लक्ष गाठाल.
**धनू :** मानसिक स्वास्थ्य जपा.
**मकर :** भावना अनावर होतील.
**कुंभ :** प्रत्यक्ष संपर्क साधा.
**मीन :** तुमचे कौशल्य वापरा.
**शुभ राशी : मिथुन, तूळ.**

## नेटक्लिप्स

लो | लोकसत्ता.COM

- पेट्रोल, डिझेल महागाईचा भडका
- अभिनय ते कृषीक्षेत्र; संपदा जोगळेकरांचा 'खेड्याकडे चला'चा प्रवास

हे व्हिडीओ बघण्यासाठी खालील क्यूआर कोड स्कॅन करा...

## सर्वाधिक वाचकपसंती

- अग्रलेख - महाबलीपुरम
- चीनचा हल्ला विफल करण्यासाठी भारताने तैनात केली स्पेशल 'माऊंटन फोर्स'
- सर्वसामान्यांमागे इंधन दरवाढीचे ग्रहण; पेट्रोल, डिझेलच्या किंमतीत पुन्हा वाढ
- निकृष्ट प्रतीच्या बियाणांमुळे सोयाबीनची पेरणी वाया; कृषी विभाग उदासीन

# करोनाच्या चर्चेने माणुसकीच हरपली!

करोनामुक्त होऊन घरी परतलेल्या धनंजय मुंडे यांच्या भावना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई :** करोना विषाणूने अनेकांचे बळी घेतले, परंतु या आजाराच्या चर्चेने माणुसकीच हरपली, हा एक माझ्या आयुष्यातील जीवघेणा अनुभव मी घेतला, अशा शब्दात राज्याचे सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केल्या. ब्रीच कँडी रुग्णालयात अकरा दिवसांच्या उपचारानंतर करोनावर मात करून मुंडे सोमवारी घरी परतले.

धनंजय मुंडे व त्यांच्या सात कर्मचाऱ्यांना करोनाची लागण झाल्याचे चाचणी अहवालातून निष्पन्न झाल्यानंतर त्यांना ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अकरा दिवसांच्या उप्पचारानंतर त्यांना सोमवारी घरी सोडण्यात आले. त्या एकूण उपचार प्रवासाचे त्यांनी अनुभव कथन केले. ते म्हणाले की, 'बुधवारी १० जून रोजी अजित पवार यांच्याकडे एक बैठक झाली. नंतर माझ्या दालनात आलो असता हाफकिनमधून पुन्हा फोन आला. तुमचा स्वीय सहाय्यकाची चाचणी सकारात्मक आहे. त्यामुळे तुम्हाला परत यावे लागेल आणि चाचणी करावी लागेल. त्या दरम्यान दोन दिवसात जे माझ्या संपर्कात आले होते म्हणजे माझा मित्र, खासगी सचिव डॉ. प्रशांत भामरे, प्रशांत जोशी, माझे तीन वाहन चालक, स्वयंपाकी, सुरक्षा रक्षक, सगळ्यांची चाचणी केली. एक वाहनचालक व मित्र वगळून बाकीच्या सगळ्यांची चाचणी सकारात्मक आली. मग तिथेच ठरवले की आपल्याला रुग्णालयात दाखल व्हावे लागेल. मला श्वास घ्यायला खूप त्रास होऊ लागला आणि जीवघेणा कोरडा खोकला. डॉ. संजय ओक यांना बोललो. त्यांनी काही उपचार सांगितले, ते घेतले आणि ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल झालो.'

'डॉ. संधानी आणि तिथल्या कर्मचाऱ्यांनी मला व्हेंटिलेटरवर जाऊ दिले नाही. मी सुद्धा गेल्या अनेक दिवसांपासून धावण्याचा, चालण्याचा व्यायाम, प्राणायाम करतो आहे. त्याचाही फायदा झाला. तशा त्रासातही प्राणायाम करतच होतो. शरद पवार यांनी चौकशी केली, अजित पवारही दररोज विचारपूस करत होते, मला मानसिकदृष्ट्या त्यांनीच संभाळले. मंत्रिमंडळातील सगळ्या सहकाऱ्यांनी दूरध्वनी करून विचारपूस केली.

हा आजार झाल्यानंतर ब्रीच कँडीला जाईपर्यंत, असेच वाटले की, करोना विषाणूने अनेकांचे बळी घेतले, पण त्याचबरोबर करोना आजाराच्या चर्चेने माणुसकीच हरपली. अशा शब्दात मुंडे यांनी भावना व्यक्त केल्या.

# सागरी मार्गाच्या कामासाठी चिनी यंत्रच, पण तंत्रज्ञ भारतीय

इंद्रायणी नार्वेकर, लोकसत्ता

**मुंबई:** गलवान खोऱ्यात चिनी सैनिकांच्या हल्ल्यात २० भारतीय सैनिक शहीद झाल्यानंतर चिनी मालावर आणि कंपन्यांवर बहिष्कार टाकण्याचे सत्र सुरू असले तरी मुंबईतील सागरी मार्ग प्रकल्प मात्र चिनी बनावटीच्या यंत्रानेच पूर्ण करावे लागणार आहे. हे यंत्र जोडण्यासाठी मात्र तेथील तंत्रज्ञांऐवजी भारतीय तंत्रज्ञांची मदत घेतली जाणार आहे.

तणावाच्या पार्श्वभूमीवर चिनी कंपन्यांची कंत्राटे रद्द करून चीनची कोंडी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. एमएमआरडीएने मोनोरेल खरेदी निविदा प्रक्रियेतून दोन चिनी कंपन्यांना हद्दपार करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आता मुंबई महापालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या सागरी किनारा मार्गाच्या कामात चिनी कंपन्यांना दूर ठेवणार का? हा प्रश्न होता.

प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वांद्रे वरळी सागरी सेतूचे वरळीकडील टोक या दरम्यान ९.९८ किमीचा सागरी रस्ता बांधण्यात येणार आहे. त्यात ३.४५ किलो मीटरचे दोन समांतर बोगदे खणण्यात येणार आहेत. हे बोगदे खणण्यासाठी खास चीनहून यंत्र आणण्यात आले आहे.

ऑक्टोबर अखेर याच यंत्राने बोगदा खणण्याचे काम प्रत्यक्षात सुरू होईल, अशी माहिती पालिका अधिकाऱ्यांनी दिली.

खटल्यामुळे सागरी मार्गाचे काम सहा महिने पूर्णतः थांबले होते. त्यानंतर टाळेबंदीमुळे हे काम रखडले होते. सागरी मार्गाचे काम ज्या कंपन्यांना देण्यात आले आहे त्यात चिनी कंपन्या नाहीत.

तीन टप्प्यांपैकी प्रिन्सेस स्ट्रीट ते बरोडा पॅलेसच्या दोन टप्प्यांचे काम एलएण्डटी कंपनी कडे आहे तर बरोडा पॅलेस ते वरळी सागरी सेतू या एका टप्प्याचे काम एचसीसी कंपनीला दिले आहे. दक्षिण कोरियातील एका कंपनीशी या कंपनीची भागीदारी आहे. त्यामुळे या कामात चीनबरोबर कोणताही करार केलेला नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.



> **सागरी महामार्ग प्रकल्पामध्ये चीनशी कोणत्याही प्रकारचा करार करण्यात आलेला नाही. केवळ बोगदा खणण्यासाठी जे मशीन आणले आहे ते चीनहून आणलेले आहे. हे यंत्र जोडण्यासाठी चीनच्या किंवा सिंगापूरच्या तज्ज्ञांची मदत घ्यावी लागणार होती. मात्र त्याकरितादेखील आम्ही देशातील तज्ज्ञांचीच मदत घेणार आहोत.**
> विजय निघोट, प्रमुख अभियंता, सागरी किनारा मार्ग

# जगन्नाथ पुरी रथयात्रेला सशर्त परवानगी

*(पान १ वरून)* ओदिशा सरकारतर्फे देण्यात आली.

नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड न करता, मंदिर व्यवस्थापन आणि राज्य सरकार यांच्या सहकार्याने रथयात्रा आयोजित केली जाऊ शकते, अशी भूमिका केंद्र सरकारनेही खंडपीठापुढे मांडल्यानंतर न्यायालयाने रथयात्रा काढण्यास सशर्त परवानगी दिली. या यात्रेत जगभरातून लाखो भाविक सहभागी होतात.

### सुनावणी प्रथमच नागपुरातून!

नागपूर : सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी सोमवारी प्रथमच नागपूरमधून सर्वोच्च न्यायालयाची दूरचित्रसंवाद (व्हिडिओ कॉन्फरसिंग) माध्यमातून सुनावणी घेतली. जगन्नाथ पुरी मंदिराच्या रथयात्रेसाठी परवानगी मागणाऱ्या अतिमहत्त्वाच्या याचिकेवर ही सुनावणी घेण्यात आली. सुनावणीत न्या. दिनेश महेश्वरी आणि न्या. ए. एस. बोपण्णा दिल्लीतून सहभागी झाले होते.

### आधीच्या आदेशात काय?



ओदिशा विकास परिषदेच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने १८ जूनला दिलेल्या निकालात यात्रेला परवानगी नाकारली होती. 'नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने यंदा यात्रेला परवानगी देता येणार नाही आणि दिली तर देव जगन्नाथ आपल्याला क्षमा करणार नाही', अशी टिप्पणी सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी निकालात केली होती.

### न्यायालयाने घातलेल्या अटी

- रथयात्रेत सहभागी होण्यास परवानगी दिलेल्या प्रत्येकाची करोना चाचणीसह सर्व वैद्यकीय माहिती नोंदवावी.
- रथयात्रेदरम्यान राज्य सरकारने पुरी शहरात संचारबंदी लागू करणे आवश्यक.
- जगन्नाथाचा रथ ओढणाऱ्या प्रत्येकाची करोना चाचणी करणे बंधनकारक.
- जगन्नाथाचा रथ ओढणाऱ्या प्रत्येकाने यात्रेदरम्यान आणि नंतर इतरांपासून अंतर पाळणे अनिवार्य.

# बारावीचा १५ जुलैपर्यंत, दहावीचा जुलैअखेर निकाल

**(पान १ वरून)** होऊ शकली नाही. सध्या टाळेबंदीतही ९७ टक्के उत्तरपत्रिका मूल्यांकन करून परीक्षकांनी जमा केल्या असून उर्वरित काम सुरू आहे, असे काळे यांनी सांगितले.

**अकरावी प्रवेश प्रक्रियेची १ जुलैपासून सुरूवात**

जुलैअखेरीस दहावीचा निकाल जाहीर होणार असून अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेची तयारी विभागाने सुरू केली आहे. १ जुलैपासून महाविद्यालयांची नोंदणी सुरू होणार आहे. यंदा संकेतस्थळात आवश्यक ते बदल करण्यात आले असून विद्यार्थ्यांना माहिती पुस्तकापासून शुल्क भरण्यापर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाइन करता येणार आहे. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नाशिक या विभागांमध्ये ही प्रक्रिया ऑनलाईन असून बाकीच्या जिल्ह्यांमध्ये ऑफलाईनच असेल.

### विद्यार्थ्यांना 'जिओ टिव्ही'वर शिक्षण

विद्यार्थ्यांसाठी जिओ टिव्हीवर शिक्षण विभागाने दोन वाहिन्या सुरू केल्या असून, गुगल मीट प्रणालीच्या माध्यमातून ऑनलाइन वर्ग भरवण्यात येणार आहेत. जिओ टीव्हीवर प्रायोगिक तत्त्वावर दहावी आणि बारावीसाठी दोन वाहिन्या तयार करण्यात आल्या असून पहिली ते बारावीसाठी स्वतंत्र ९ वाहिन्या सुरू करण्याचेही नियोजन आहे. त्याचप्रमाणे दूरदर्शन वाहिनीवर दिवसाला ४ ते ५ तास शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत, असे यावेळी शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितले. गुगल मीटवर भरणाऱ्या वर्गांचे प्रात्यक्षिक ठाकरे यांनी पाहिले.

# मनुष्यहानीची चीनची कबुली!

*(पान १ वरून)*

चीनच्या बाजूला असलेल्या चुशुल क्षेत्रात मोल्डो येथे सकाळी साडेअकरा वाजता लेफ्टनंट जनरल स्तरावरील चर्चा झाली. दोन्ही देशांत ६ जूनला झालेल्या चर्चेतील मुद्द्यांची तसेच विश्वास निर्माण करणाऱ्या उपायांची अंमलबजावणी करण्यावर दोन्ही देशांनी चर्चेत भर दिल्याची माहिती सूत्रांनी दिली.

भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व चौदाव्या कोअरचे कमांडर लेफ्टनंट जनरल हरिंदर सिंग यांनी केले, तर चीनचे नेतृत्व तिबेट लष्करी जिल्ह्याच्या कमांडरने केले. ही चर्चा सुरु असतानाच लष्करप्रमुख मनोज नरवणे यांनी सोमवारी लष्करी अधिकाऱ्यांशी चर्चा करून परिस्थितीचा आढावा घेतला.

गलवान खोऱ्यात १५ जून रोजी चिनी सैनिकांशी झालेल्या धुमश्चक्रीत २० भारतीय जवान शहीद झाले. चकमकीनंतर चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी आणि भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्यात चर्चा झाली होती. या चर्चेत, चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने मुद्दाम नियोजनपूर्वक चकमक घडवून आणल्याचा आरोप भारताने केला होता.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी रविवारी घेतलेल्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकीत चीनने कोणतीही आगळीक केल्यास सडेतोड प्रत्युत्तर देण्याचे पूर्ण स्वातंत्र्य भारतीय सैन्यदलांना देण्यात आले. या बैठकीस संरक्षण प्रमुख बिपीन रावत, लष्कर प्रमुख मनोज नरवणे, नौदल प्रमुख करमबीर सिंह, हवाईदल प्रमुख आरकेएस भदौरिया उपस्थित होते.

भारत आणि चीन यांच्यातील सीमा ३५०० किलोमीटरची आहे. भारताने गलवानमधील १५ जूनच्या चकमकीनंतर चीनलगतच्या प्रत्यक्ष सीमारेषेनजीक अतिरिक्त कुमक तैनात केली आहे. अनेक लढाऊ जेट विमाने त्या भागात घिरट्या घालीत आहेत.

सुखोई ३० एमकेआय, जग्वार, मिराज २००० विमाने, अपाची हेलिकॉप्टर्स लेह आणि श्रीनगर येथील हवाई तळांवर पाच दिवसांपासून सज्ज आहेत. भारतीय हवाई दलास सीमेवर चीनच्या काही हालचाली जाणवल्या असून कुठल्याही आपत्कालीन स्थितीस तोंड देण्यास हवाई दल सज्ज असल्याचे हवाई दल प्रमुख भदौरिया यांनी शनिवारी स्पष्ट केले होते.

# टाळेबंदीचा पोटगीलाही फटका

## रक्कम देण्यास असमर्थता; घटस्फोटित महिलांची होरपळ

**राहुल खळदकर, लोकसत्ता**

**पुणे :** करोनाच्या संसर्गामुळे सरकारी नोकरदार वगळता खासगी क्षेत्रातील कर्मचारी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे. आर्थिक चणचणीमुळे पोटगीच्या दाव्यांवर परिणाम झाला आहे. वेतनकपातीमुळे अनेकांना पोटगीची रक्कम अदा करण्यात अडचणी येत असून, पोटगीची रक्कम न मिळाल्याने माहिलांची होरपळ सुरू आहे.

कौटुंबिक न्यायालयात दाखल होणाऱ्या दाव्यांमध्ये पन्नास टक्क्यांहून अधिक दावे हे पोटगी मिळवण्याबाबतचे असतात. पोटगीची रक्कम मिळावी तसेच पोटगीची रक्कम वसूल करण्याबाबतचे हे दावे असतात. त्यात दरमहा पोटगी मिळवण्याबाबतचे दावे सर्वाधिक असतात. टाळेबंदी शिथिल झाली असली, तरी अनेक खासगी कंपन्यांमधील कामकाज तसेच व्यवसाय सुरळीत झालेले नाहीत. कौटुंबिक न्यायालयात सध्या केवळ महत्त्वाच्या दाव्यांवर सुनावणी होत आहे. पोटगी मिळवण्याबाबत दाखल असलेल्या दाव्यांवर अशा परिस्थितीत सुनावणी होऊ शकत नसल्याने पुढील एक ते दोन महिन्यांच्या तारखा देण्यात आल्या आहेत. येत्या काही महिन्यांत पोटगी मिळवण्याबाबतच्या दाव्यांत वाढ होण्याची शक्यता आहे.



### सामंजस्याने विचार आवश्यक

पोटगीची रक्कम आणि मंजूर पोटगीची रक्कम याबाबत सामंजस्याने विचार करायला हवा. थकलेल्या पोटगीची रक्कम अनेकांना एकाच वेळी भरता येणार नाही. टप्प्याटप्प्याने रक्कम अदा केल्यास उभयतांच्या दृष्टीने सोयीस्कर ठरेल, असे ॲड. सुप्रिया कोठारी यांनी सांगितले.

> पोटगी देण्याबाबतचे आदेश देऊनही काही जण टाळेबंदीमुळे आर्थिक चणचण असल्याचे कारण सांगून पोटगी देण्यात टाळाटाळ करत आहेत. आर्थिक परिस्थिती चांगली असेल, तर खोटी कारणे देणे योग्य ठरत नाही.
>
> – ॲड. वैशाली चांदणे, अध्यक्ष, दी फॅमिली कोर्ट लॉयर्स असोसिएशन

भगिनी हेल्पलाइनच्या संस्थापक आणि कौटुंबिक न्यायालयातील वकील ॲड. सुप्रिया कोठारी म्हणाल्या, पोटगीचा विषय किंवा दावा तसा संवेदनशील आहे. पोटगी देण्याचे आदेश देण्यात आले असले, तरी पतीच्या आर्थिक परिस्थितीचा विचारही करणे गरजेचे आहे. टाळेबंदीत आर्थिक होरपळ सुरू आहे. अनेक खासगी कंपन्यांत वेतनकपात झाली आहे. पोटगीची रक्कम मिळत नसल्याने महिलांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागत आहे. मात्र, पोटगीची रक्कम अदा करणाऱ्या पतीचा विचार करणे तितकेच गरजेचे आहे. वेतनकपात तसेच अनेकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे, याकडे दुर्लक्ष करता कामा नये. अनेकांना गृहकर्ज, वाहनकर्जाचे हप्ते आहेत. काहींना आरोग्य-विषयक खर्च आहेत. त्यामुळे अनेकांना पोटगीची रक्कम लगेचच अदा करता येणार नाही. कौटुंबिक न्यायालयाचे कामकाज सुरू झाले असले, तरी पतीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास आणखी काही वेळ लागणार आहे, असे ॲड. सुप्रिया कोठारी यांनी नमूद केले.

# शब्दकिमयागार गुरू ठाकूर यांच्याशी गप्पा

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**मुंबई :** मनात रुंजी घालणाऱ्या आणि पुन्हा पुन्हा श्रवणानंद घ्यावा, अशा मराठी चित्रगीतांच्या लयास गेलेल्या परंपरेला पुनरुज्जीवित करणारे गीतकार गुरू ठाकूर यांच्याशी गप्पा मारण्याचा योग 'लोकसत्ता'ने जुळवून आणला आहे- 'सहज बोलता बोलता' या वेबसंवादातून. हा संवाद शुक्रवारी, २६ जूनला संध्याकाळी ५ वाजता होईल. गुरू ठाकूर यांच्याशी गीतगप्पांबरोबरच अभिनय, चित्रपट, नाटक, पटकथा लेखन अशा अनेकविध कलाघटकांवर संवादाची संधी मिळणार आहे. ही संवाद मैफल संवादक मिलिंद कुलकर्णी जमवणार आहेत.

लोकसत्ता सहज बोलता बोलता



कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी
http://tiny.cc /LS_ SahajBoltaBolta_26June येथे नोंदणी आवश्यक.

गेल्या वीस वर्षांत सर्वसामान्यांच्या आयुष्यात झालेले बदल, घडलेल्या सामाजिक-सांस्कृतिक घटना आणि बदलत गेलेली अभिरुची लक्षात घेत प्रत्येक पिढीला आवडतील अशी गीते लिहिणाऱ्या या गीतकाराचा सर्जनशील प्रवास 'सहज बोलता बोलता'मधून समोर येणार आहे.


निरोगी आरोग्याचा सुरक्षा मास्क
रोज घ्या 2 तन्वीशता टॅबलेट्स
तेजस्वी त्वचा, दाट केस, शक्तिस्फुर्ती, शांत झोपेसाठी, ॲसिडीटी, थकवा, डोकेदुखी, पिंपल्स, केसगळती इ. वर




केमिस्टकडे उपलब्ध
तन्वी क्लिनिक ठाणे : रोज स. ११ ते साय. ५ , संपर्क : 9769695892
तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्यसल्ला
डॉ. रविंद्र पोळ : 9323181682
तन्वी ठाणे 9820075813
व्हॉट्सॲप आरोग्यसल्ला 9769905892
www.tanviherbals.com वर आजच तन्वी हर्बल प्रॉडक्ट्स ऑनलाईन मागवा


# चीनमधील कंपन्यांबरोबरचे करार 'जैसे थे'!

## तीन कंपन्यांशी गेल्याच आठवड्यात ५०२० कोटींचे गुंतवणूक करार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** भारत आणि चीनदरम्यान सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर 'हेंगली', 'पीएमआय इलेक्ट्रो मोबिलिटी सोल्युशन्स जेव्ही विथ फोटोन' आणि 'ग्रेट वॉल मोटर्स' या तीन चिनी कंपन्यांशी करण्यात आलेले गुंतवणूक करार तुर्तात 'जैसे थे' ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने सोमवारी घेतला.

सरकारने गेल्याच आठवड्यात या कंपन्यांसोबत ५०२० कोटी रुपयांच्या गुंतवणूक प्रकल्पांचे करार केले होते. केंद्र सरकारशी चर्चा करून याबाबत पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी सांगितले.

करोनानंतर राज्यातील अर्थचक्राला गती देण्यासाठी मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० च्या माध्यमातून राज्य सरकारने गेल्या सोमवारी देश विदेशातील १२ कंपन्यांसमवेत १६ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले होते.

त्यामध्ये भारतासह सिंगापूर, दक्षिण कोरिया, अमेरिकन कंपन्यांबरोबरच चीनमधील तीन कंपन्यांचाही समावेश होता. यावेळी ग्रेट वॉल मोटर्स (जीएमडब्ल्यू) या वाहननिर्मिती क्षेत्रातील कंपनीबरोबर ३ हजार ७७० कोटींचा करार करण्यात आला. या कराराअंतर्गत जीएमडब्ल्यू पुण्यातील तळेगावमध्ये वाहननिर्मिती कारखाना उभारणार आहे.

राज्य सरकार आणि चिनी कंपन्यांदरम्यान झालेल्या तीन करारांपैकी हा सर्वात मोठा करार होता. त्याचप्रमाणे 'पीएमआय इलेक्ट्रो मोबॅलिटी' या कंपनीने 'फोटॉन' या चिनी कंपनीच्या मदतीने एक हजार कोटींचा कारखाना सुरू करण्यासंदर्भात करार केला असून तेथे १५०० लोकांना रोजगार मिळण्याची अपेक्षा आहे. तर 'हेंगली इंजिनीयरिंग कंपनी' तळेगाव येथील कारखान्याच्या दुसऱ्या टप्प्यात २५० कोटींची गुंतवणूक करणार असून तेथे १५० जणांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

भारत आणि चीनदरम्यान लडाखमधील गलवान खोऱ्यात सुरू असलेल्या संघर्षानंतर देशभरात चीनविरोधातील वातावरण तापत असून काही दिवसांपूर्वीच केंद्र सरकारने चिनी कंपन्यांना दिलेली कंत्राटे रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.

त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी बोलावलेल्या सर्व पक्षीय बैठकीतही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी चीन संदर्भातील केंद्राच्या भूमिकेला पाठिंबा देताना आम्ही पंतप्रधानांसोबत आहोत असे सांगितले होते. त्यानंतर सरकारने तिन्ही चिनी कंपन्यांसोबतचे सामंजस्य करार तूर्तास जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. हे करार तूर्तास जैसे थे ठेवण्यात आले आहेत, याचा अर्थ ते रद्द केले असा नसून त्यावरील पुढील कार्यवाही प्रतीक्षाधीन आहे, असे देसाई यांनी स्पष्ट केले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता बंद

## संचित तोट्यात वाढ होत असल्याने निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबई महानगर परिसरात अत्यावश्यक सेवा देणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचा ३०० रुपये प्रोत्साहन भत्ता बंद करण्यात येणार आहे. त्याची अंमलबजावणी १ जूनपासून करण्यात येईल, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.



मुंबई, ठाणे, पालघर एसटी विभागाकडून पोलीस, पालिका कर्मचारी, मंत्रालय कर्मचारी, डॉक्टर, परिचारीका इत्यादी अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी एसटी सेवा चालवण्यात आली. ही सेवा देताना कर्मचाऱ्यांना दररोज ३०० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्याचा निर्णय महामंडळाने घेतला.

एप्रिल, मे महिन्यात भत्ता दिल्यानंतर १ जूनपासून मात्र कर्मचाऱ्यांना भत्ता मिळालेला नाही. एसटीची नुकतीच तालुका ते तालुका व गाव अशी सेवा सुरू झाली. या प्रवासाला फारसा प्रतिसाद नाही. तर राज्यांतर्गत प्रवास अद्यापही सुरू झालेला नाही. त्यामुळे टाळेबंदीआधी दिवसाला मिळत असलेले २२ कोटी रुपये उत्पन्न आता बंद झाले आहे. त्यामुळे संचित तोटा वाढत असून तो सहा हजार कोटीपर्यंत पोहोचला आहे. परिणामी ७ तारखेपर्यंत होणारे वेतनही उशिराने होऊ लागले.

आर्थिक कोंडी होत असल्याने मुंबई परिसरात अत्यावश्यक कर्मचाऱ्यांसाठी सेवा देणाऱ्या एसटी कर्मचाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. याची महामंडळाकडून लवकरच घोषणा करण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली.

# ठाणे जिल्ह्यात १ हजार १० नव्या करोना रुग्णांची नोंद

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** जिल्ह्यात सोमवारी दिवसभरामध्ये १ हजार १० नवे करोना रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील करोनाबाधितांचा आकडा २२ हजार ५६८ इतका झाला आहे. तर, सोमवारी जिल्ह्यात २६ जणांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने जिल्ह्यातील एकूण मृत्यू झालेल्यांची संख्या ७७१ वर पोहचली आहे.

ठाणे जिल्ह्यात सोमवारी १ हजार १० नवे करोनाबाधित रुग्ण आढळून आले आहेत. त्यामध्ये ठाणे शहरातील १४७, नवी मुंबईतील १२०, कल्याण-डोंबिवली शहरातील २५६, भिवंडी शहरातील ७२, अंबरनाथ शहरातील १३०, उल्हासनगर शहरातील ६९, बदलापूर शहरातील १७, मीरा-भाईंदर शहरातील १२९ आणि ठाणे ग्रामीण मधील ७० रुग्णांचा समावेश आहे.


## एलांटास बेक इंडिया लि.

**सीआयएन :** एल२४२२२पीएन१९५६पीएलसी१३४७४६
**नोंदणीकृत कार्यालय :** १४७, मुंबई-पुणे रोड, पिंपरी, पुणे-४११ ०१८
**टेलि :** +०२० ६७१९०६०० **ईमेल :** Abhijit.Tikekar@altana.com
**वेबसाईट :** http://www.elantas.com

**व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हिसी) / अन्य ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (ओएव्हिएम) द्वारा घेण्यात येणाऱ्या ६४व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधीत माहिती**

भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी की **कंपनीची ६४वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम)** एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता, सिक्युरिटिज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (यापुढे एकत्रीतपणे "परिपत्रके" म्हणून संबोधीत) द्वारा निर्गमित केलेली परिपत्रके आणि निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेल्या साधारण परिपत्रक नं. १४ / २०२०, १७/२०२०, २०/२०२० च्या अनुषंगाने तसेच कंपन्या अधिनियम, २०१३ च्या लागू तरतुदी आणि त्याखाली दिलेले नियम यासह वाचलेल्या तरतुदींच्या अनुपालनार्थ **व्हिसी / ओएव्हिएम द्वारा २१ जुलै, २०२० रोजी स.११.३० वा (भाप्रवे) घेण्यात येणार आहे.**

सद्य परिस्थितीती लक्षात घेवून उक्त सूचना आणि वार्षिक अहवालांच्या प्रत्यक्ष प्रती पाठविण्यात येणारी अडचण आणि वरील परिपत्रकांच्या अनुसार वर्ष २०१९ करिता वार्षिक अहवालासह एजीएम बोलाविणारी सूचना ईलेक्ट्रॉनिक मेलद्वारा अशा भागधारकांना पाठविण्यात येतील ज्या भागधारकांचे ईमेल पत्ते कंपनी / डिपॉझीटरिजकडे नोंदणीकृत आहेत. ही कागदपत्रे **www.elantas.com** या कंपनीच्या वेबसाईटवर व **www.bseindia.com** या बीएसई लि.च्या वेबसाईटवर (जेथे कंपनीचे भाग सूचीबद्ध करण्यात आले आहेत) उपलब्ध आहेत. भागधारक एजीएममध्ये (जेव्हा ई-मतदान प्रक्रियेकरिता विंडो उपलब्ध असेल) किंवा दुरःस्थ पद्धतीने (दुरःस्थ ई-मतदान कालावधीत) एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता ईलेक्ट्रॉनिक प्रणालीत त्यांचे मतदान करण्यास सक्षम असतील.

जर तुमचा ईमेल पत्ता कंपनीकडे / डिपॉझीटरिजकडे नोंदणीकृत असल्यास, दुरःस्थ ई-मतदानाकरिता लॉग-इन अधिकारपत्रे तुमच्या नोंदणीकृत ईमेल पत्त्यावर पाठविण्यात येत आहेत. कृपया नोंद घ्यावी की सदर लॉग-इन अधिकारपत्रे एजीएममध्ये ठरावावर मतदान करण्यास तसेच व्हिसी / ओएव्हिएम द्वारा एजीएममध्ये भाग घेण्याकरिता आवश्यक आहेत.

लाभांशाच्या स्वीकृतीकरिता ज्या भागधारकांचे ईमेल पत्ते / बँक तपशील नोंदणीकृत / अपडेट केलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी खालील प्रक्रियेचे अनुपालन करावे :

१. ज्या भागधारकांकडे डिमॅट प्रारुपात भाग आहेत त्यांना त्यांच्या संबंधीत डिपॉझीटरी पार्टिसिपंटकडे संपर्क साधून त्यांचा ई-मेल आयडी नोंद करु शकतील.
२. ज्या भागधारकांकडे प्रत्यक्ष स्वरुपात भाग आहेत ते वार्षिक अहवाल, एजीएम सूचना व ई-मतदान सूचना प्राप्त करणे आणि त्यांच्या ईमेल पत्त्यांची नोंदणीकरिता भाग प्रमाणपत्राची प्रत व स्वयं-साक्षांकित पॅन कार्डची प्रत, ईमेल पत्ता व मोबाईल नंबरची तरतूद करुन विनंती पत्राच्या स्वाक्षरीकृत स्कॅन्ड प्रतीसमवेत <pune@linkintime.co.in> या ईमेल आयडीवर ईमेलद्वारा विनंती पाठवून कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट म्हणजेच लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (आरटीए) यांच्याकडे त्यांचा मोबाईल नंबर व ईमेल पत्त्याची नोंदणी करु शकतील. बँक खात्याच्या प्रकारासह बँकेचे नाव व शाखा, बँक खाते क्रमांक, ९ डिजीट एमआयसीआर कोड, ११ डिजीट आयएफएससी कोड, इ.सारखा अतिरिक्त तपशील आणि कॅन्सल्ड चेकची स्कॅन्ड प्रत बँक खात्याचा तपशील अपडेट करणयाकरिता आवश्यक असणार आहे.

ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते आरटीए कडे / त्यांचे डिपॉझीटरि पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत केलेले नाहीत किंवा ज्या भागधारकांनी वार्षिक अहवाल, एजीएम सूचना आणि मतदानाबाबत सूचना स्वीकारल्या नाहीत त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी **https://linkintine.co.in/ EmailReg/Email_Register.html** या वेबसाईटला भेट द्यावी आणि इलेक्ट्रॉनिक प्रणालीत वार्षिक अहवाल, एजीएम सूचना आणि मतदानाबाबत सूचनांची स्वीकृती होण्याकरिता त्यांचे ईमेल तातपुरते अपडेट होण्याकरिता त्यात नमूद केल्यानुसार प्रक्रियेचे अनुपालन करावे.

वित्त कायदा, २०२०च्या अनुसार सुद्धा, लाभांशाचे उत्पन्न ०१ एप्रिल २०२० च्या प्रभावापासून भागधारकांच्या हाती करयोग्य येणार आहे आणि कंपनीला आयकर कायदा, १९६१ ("आयकर कायदा") यामध्ये विहित केलेल्या दरात सदस्यांना प्रदान केलेल्या लाभांशातून डिडक्ट टॅक्स ॲट सोर्स ("टीडीएस") आवश्यक आहे. साधारणतः, टीडीएस आवश्यकतांच्या अनुपालनार्थ सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांच्या डिपॉजीटरी पार्टिसिपंट्सकडे आयकर कायद्यानुसार त्यांचा निवासी दर्जा, पॅन, प्रवर्ग पूर्ण / अपडेट ठेवावा किंवा जर भाग प्रत्यक्ष स्वरुपात असतील तर **https://linkintine.co.in/EmailReg/ Email_Register.html** यावर क्लिक करुन आणि उशिरात उशिरा १५ जुलै २०२० पर्यंत त्यात नमूद केलेल्या प्रक्रियेचे अनुपालन करुन कंपनीला विनंती करावी. ज्या निवासी स्वतंत्र भागधारकांकडे वैध पॅन आहे आणि जर देय लाभांश वित्तिय वर्षानुसार रु ५,०००/- पेक्षी कमी आहे आणि रेसिडंट इन्शुरन्स कंपन्या व रेसिडंट म्युच्युअल फंड प्रवर्गाबाबत लागू असल्यानुसार कर वजात करणे थांबविता येणार नाही.

कंपनीने कर सूट प्रपत्रे / विनंतीवजा कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता भाग धारकास वेब-पोर्टल सक्षम करुन दिले आहे. भागधारक **https://linkintine.co.in/formsreg/ submission-of-form-15g-15h.html** यावर क्लिक करुन टॅक्स डिडक्शन ॲट सोर्सच्या प्रयोजनार्थ पोर्टलवर थेट त्यांची पुष्ठयर्थ कागदपत्रे तसेच कर सूट प्रपत्रे कंपनी ड्रॉपडाउनमधील "ईलान्टास बेक इंडिया लिमिटेड" ची निवड करुन सादर करु शकतील.

व्हिसी / ओएव्हिएम द्वारा एजीएममध्ये उपस्थित राहण्याकरिता व मतदान करण्याकरिता सूचनांची एजीएमच्या सूचनेमध्ये तरतूद करुन देण्यात आली आहे आणि कंपनीच्या वेबसाईटवर सुद्धा अपलोड करण्यात आल्या आहेत तसेच **www.evoting.nsdl.com** यावरील डाउनलोड सेक्शनवरसुद्धा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**एलांटास बेक इंडिया लि.करिता**
**स्वाक्षरी/-**
**अभिजीत टिकेकर**
**मुख्य विधि व कंपनी सचिव**
**(सदस्यत्व क्र. एसीएस २०२१३)**

**तारीख : २२ जून २०२०**
**स्थळ : पुणे**



## बजाज फायनान्स लिमिटेड

CIN-L65910MH1987PLC042961
**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे –४११०३५
कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे–अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे – ४११०१४

### मुदत ठेव योजना

क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएएए (स्टेबल)' रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (०४ जुलै २०२० पासून लागू) वैध आहे.
नवीन ग्राहकांसाठी:

| कालावधी महिन्यांमध्ये | किमान ठेव (रु. मध्ये) | संचयी | बिगर- संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
| १२ – २३ | २५,००० | ६.९०% | ६.६९% | ६.७३% | ६.७९% | ६.९०% |
| २४ – ३५ | | ७.००% | ६.७९% | ६.८२% | ६.८८% | ७.००% |
| ३६ | | ७.१०% | ६.८८% | ६.९२% | ६.९८% | ७.१०% |

क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिट्स (रिझर्व्ह बँक) डायरेक्शन्स, 2016 याअनुसार कंपनी डिपॉझिट्च्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: 28,116.47 कोटी
ख) प्रत्यक्षात 31.03.2019 रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम आहे : 13,193.01 कोटी

## शीव उड्डाणपुलाचे रखडलेले काम सुरू

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** टाळेबंदी दरम्यान परराज्यातून येऊ न शकलेली सामग्री अखेरीस मिळाल्यामुळे शीव उड्डाणपुलाचे रखडलेले काम पुन्हा सुरु झाले आहे. पुलाचे अद्याप ८० बेअरिंग बदलणे बाकी असून, सध्या सुरु असलेले ३४ गर्डरच्या मजबुतीकरणाचे काम संपल्यावर पुढील महिन्यात बेअरिंग बदलले जातील.

शहराच्या वेशीवर २००० साली बांधलेल्या शीव उड्डाणपुलाच्या सांध्यांमध्ये पोकळी निर्माण झाल्यामुळे ते बदलण्याची शिफारस संरचनात्मक अहवालात २०१८ मध्ये करण्यात आली. त्यानुसार एक वर्षांपूर्वीच १६० बेअरिंग बदलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने घेतला. मात्र या कामाला वर्षभरात मुहूर्तच लागला नव्हता.

अखेरीस १४ फेब्रुवारीला हे काम हाती घेण्यात आले. टाळेबंदी जाहीर होण्यापूर्वी एकूण ८० बेअरिंग बदलण्याचे काम पूर्ण झाले असून, अद्याप ८० बेअरिंग बदलणे बाकी आहे.

# राज्यात आठवडाभर हलका पाऊस

## विदर्भ, कोकण विभागात जोरदार पावसाची नोंद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** विदर्भ आणि कोकण विभागात काही ठिकाणी गेल्या चोवीस तासांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली. या दोन्ही विभागांसह मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील पाच ते सहा दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, पावसाची विश्रांती असलेल्या भागामध्ये सध्या दिवसाच्या तापमानात वाढ नोंदविली जात आहे.

राज्याच्या सर्वच विभागांमध्ये गेल्या आठवड्यामध्ये जोरदार पावसाची नोंद झाली आहे. सध्या अनुकूल स्थिती नसल्याने अनेक भागांत पावसाने अल्प विश्रांती घेतली आहे. मात्र, कोकण विभागात सर्वच ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात पाऊस सुरू आहे. मुंबई आणि परिसरातही पाऊस हजेरी लावतो आहे. ठाणे, कल्याण, उल्हासनगर आदी भागात जोरदार पावसाची नोंद झाली. यंदा मोसमी वारे वेळेपूर्वीच दाखल झालेल्या विदर्भामध्ये पावसाने विश्रांती घेतली होती. मध्य भारतात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यानंतर या भागामध्ये सोमवारी चांगल्या पावसाची नोंद झाली. चंद्रपूर भागात सर्वाधिक पाऊस झाला.

### मोसमी वाऱ्यांचा प्रवास रखडला

**महाराष्ट्र व्यापून पुढे गेलेल्या नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांचा प्रवास गेल्या आठवड्यापासून रखडला आहे. सध्या मोसमी वाऱ्यांची वाटचाल गुजरात, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेशच्या काही भागांपर्यंत झाली आहे. याच ठिकाणी १५ जूनपासून मोसमी वारे रखडले आहेत. मात्र, बंगालच्या उपसागरात पोषक वातावरण निर्माण होणार असल्याने येत्या ४८ तासांमध्ये त्यांचा प्रवास पुन्हा सुरू होऊ शकणार आहे. त्यामुळे उत्तर भारतात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस होणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.**



मध्य महाराष्ट्रातील पश्चिम घाटक्षेत्रामध्ये पाऊस कायम आहे. महाबळेश्वर, सांगली, सोलापूर भागांमध्ये सोमवारी पाऊस झाला. पुणे परिसरात हलक्या सरी कोसळल्या. इतरत्र मात्र पावसाची विश्रांती कायम आहे. गेल्या चोवीस तासांत मराठवाड्यामध्ये कोणत्याच ठिकाणी मोठा पाऊस झाला नाही. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार कोकणात कमी-अधिक प्रमाणात पाऊस कायम राहणार असून, २६ जूनपर्यंत उर्वरित महाराष्ट्रात काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होणार आहे.

## ‘वीज देयकांना स्थगिती द्यावी’

**मुंबई :** राज्यामध्ये गेल्या तीन महिन्यांपेक्षा अधिक काळ टाळेबंदी असताना मुंबईतील अदानी सारख्या खाजगी वीज कंपन्यांनी आणि इतर सरकारी कंपन्यांनी ग्राहकांना अव्वाच्या सव्वा देयके आकारली आहेत. त्यामुळे या वीज वितरण कंपन्यांवर तात्काळ कारवाई करून वीज देयकांना स्थगिती देण्याची मागणी भाजपचे प्रदेश सरचिटणीस आमदार अतुल भातखळकर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.



पंतप्रधानांच्या आर्थिक पॅकेज मध्ये राज्य सरकारच्या वीज वितरण कंपन्यांसाठी ९० हजार कोटी रूपयांचे सहाय्य दिले असतानाही शासन वीज देयके माफ करण्याची भूमिका घेत नाही, हे संतापजनक आहे, अशी टीका भातखळकर यांनी केली आहे.

# आयसीएसई दहावी, बारावीच्या उर्वरित विषयांच्या परीक्षांबाबत संदिग्धता नको

## उच्च न्यायालयाकडून राज्य सरकार आणि मंडळाला निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** करोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना आयसीएसईच्या दहावी आणि बारावीच्या उर्वरित विषयांच्या परीक्षा घेण्याबाबत सरकार तळ्यात–मळ्यात भूमिका का घेत आहे, असा सवाल उच्च न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारला केला. तसेच, परीक्षांबाबत नेमकी भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. परीक्षा न देणाऱ्या विद्यार्थ्यांना पर्यायी गुणांकनासाठी कोणती पद्धत अवलंबणार हे मंडळास स्पष्ट करण्यास सागितले आहे.

परीक्षांचे प्रकरण न्यायालयात आल्यानंतर विद्यार्थ्यांना उर्वरित विषयांची परीक्षा न देण्याची मुभा देण्यात आल्याचे मंडळाने जाहीर केले होते. त्यानंतर आयसीएसई आणि आयएससीच्या विद्यार्थ्यांचे जे विषय रद्द झाले त्याचे गुण देण्यासाठी नेमक्या कोणत्या पद्धतीचा अवलंब करणार, अशी विचारणा करत त्याची माहिती सादर करण्याचे आदेश न्यायालयाने मंडळाला दिले होते.

मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती एस. एस. शिंदे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सोमवारी सुनावणी झाली. त्या वेळी न्यायालयाने राज्य सरकारच्या भूमिकेविषयी विचारणा केली. ५०, २५ किंवा १० टक्के विद्यार्थी परीक्षा देण्यास तयार असल्यास सरकारची भूमिका वेगळी असणार की सारखीच असणार, सरकार याप्रकरणी संदिग्ध भूमिकेत का आहे, असा सवालही केला. त्यावर सरकार पहिल्यापासून परीक्षा न घेण्याच्या बाजूने आहे. परंतु मंडळाने परीक्षांबाबत पर्याय उपलब्ध केल्याने विद्यार्थ्यांची संख्या पाहून परीक्षेस परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्याचे म्हटले होते, असे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयाला सांगितले. दुसरीकडे मंडळाने पर्यायी गुणांकनाची पद्धत सादर करण्यासाठी न्यायालयाकडे वेळ मागून घेतला. अशाच आशयाची याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून त्यावर मंगळवारी सुनावणी होणार असल्याचेही सांगितले.

मंडळाने परीक्षेबाबतचा पर्याय निवडण्यासाठी २२ जूनपर्यंतची मुदत दिली आहे. त्यामुळे बऱ्याच शाळा परीक्षा घेण्याचा पर्याय निवडण्यासाठी दबाव टाकत असल्याची तक्रार काही पालकांनी केली. त्यावर पर्यायी गुणांकनाची पद्धत सादर करेपर्यंत आम्ही पर्याय निवडण्याची मुदत वाढवून देऊ, असे न्यायालयाने स्पष्ट केले. पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांनाही गुणांकनाची पद्धत सादर झाल्यावर तो बदलण्यास परवानगी दिली जाईल. ज्या विद्यार्थ्यांना उर्वरित विषयांची परीक्षा द्यायची आहे, त्यांनी स्वतःच्या जबाबदारीवर परीक्षा देत असल्याची हमी द्यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# राज्यात महिनाभरात २० लाख ग्राहकांना घरपोच मद्य

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्य शासनाने टाळेबंदीच्या काळात घरपोच मद्यविक्री करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार १५ मे ते २१ जून या काळात २० लाख ५० हजार ग्राहकांना घरपोच मद्यविक्री सेवा देण्यात आली. रविवारी एका दिवसात ६६ हजार ५७० ग्राहकांना घरपोच मद्यविक्री करण्यात आल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क आयुक्त कांतीलाल उमाप यांनी दिली.

करोना साथरोगाचा मुकाबला करण्यासाठी राज्यात टाळेबंदी लागू करण्यात आली. मात्र चौथ्या व पाचव्या टप्प्यातील टाळेबंदीत ठप्प झालेले आर्थिक व्यवहार काही प्रमाणात तरी पुन्हा सुरू करण्यासाठी बरेचसे निर्बंध शिथिल करण्यात आले. त्यानुसार राज्यात १५ मेपासून घरपोच मद्यविक्रीला परवानगी देण्यात आली.



राज्यात एकूण १० हजार ७९१ किरकोळ मद्यविक्री अनुज्ञप्तीपैकी ८,२२२ अनुज्ञप्ती सुरू आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाने तयार केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाइन मद्यसेवन परवाना प्राप्त करण्याची सुविधा उपलब्ध आहे. १ एप्रिल ते १७ जून २०२० या काळात १ लाख ३८ हजार ४६ ग्राहकांनी मद्यसेवन परवाने मिळवण्यासाठी अर्ज केले होते; यापैकी १ लाख ३२ हजार ७०६ ग्राहकांना परवाने मंजूर करण्यात आले आहेत.

### ऑनलाइन मद्यपरवाना

ऑनलाइन मद्यसेवन परवाना घेताना येत असलेल्या सर्व तांत्रिक अडचणी दूर करण्यात आल्या असून आता इच्छुक व्यक्ती संगणक, लॅपटॉप, अँड्रॉइड फोन तसेच आयओएस प्रणालीद्वारे ऑनलाइन परवाने घेऊ शकतात. कोणाला ऑनलाइन परवाना घ्यायचा नसेल तर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सर्व अधीक्षक, निरीक्षक व दुय्यम निरीक्षकांच्या कार्यालयात दररोज मद्यसेवन परवाने देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे, असे उमाप यांनी सांगितले.

## सत्र न्यायालयाचे प्रत्यक्ष कामकाज ३० जूनपर्यंत एकाच सत्रात

**मुंबई :** करोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेत सत्र न्यायालयाचे प्रत्यक्ष कामकाज ३० जूनपर्यंत सकाळी ११ ते दुपारी २ असे केवळ एकाच सत्रात आणि मर्यादित न्यायाधीशांकडून चालवण्यात येईल. सत्र आणि दिवाणी न्यायालयाचे प्रधान न्यायाधीश एम. डब्ल्यू. चांदवानी यांनी नुकताच त्याबाबतचा आदेश काढला.

केंद्र व राज्य सरकारने टाळेबंदीचे निर्बंध शिथिल केल्याने मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांनीही मुंबईसह मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महापालिका, तसेच राज्यभरातील अन्य दहा महापालिका क्षेत्रांतील कनिष्ठ न्यायालयांना दोन पाळ्यांत प्रत्येकी १५ टक्के वेगवेगळ्या कर्मचारी वर्गाला बोलावून न्यायालयीन काम करण्याचे आदेश दिले होते.

# म्हाडा पुनर्विकासाच्या प्रकल्पांना गती

## चटई क्षेत्रफळावरील शुल्क कपात लागू होणार

निशांत सरवणकर लोकसत्ता,

**मुंबई :** अतिरिक्त चटईक्षेत्रफळासाठी आकारण्यात येणाऱ्या प्रिमिअममधील कपातीचा लाभ म्हाडा पुनर्विकासातील रखडलेल्या प्रकल्पांना मिळणार आहे. याबाबत गृहनिर्माण विभागाकडून लवकरच सुधारीत आदेश जारी केला जाणार आहे. त्यामुळे पुनर्विकास प्रकल्पांनी गती मिळेल, असा दावा म्हाडाने केला आहे.

म्हाडा पुनर्विकासात उच्च, मध्यम आणि अल्प उत्पन्न गटातील इमारतींना अतिरिक्त चटईक्षेत्रफळाच्या वितरणासाठी रेडी रेकनर दराच्या अनुक्रमे ४०, ६० व ८० टक्के प्रिमिअम आकारले जात होते. मात्र प्रिमिअम भरमसाठ आहे, त्यामुळे प्रकल्प अव्यवहार्य होत असल्याची ओरड विकासकांकडून केली जात होती. महाराष्ट्र चेंबर ऑफ हौसिंग इंडस्ट्रीज (एमसीएचआय)–कॉन्फर्डेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन (क्रेडाई) यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रिमिअमच्या दरात कपात व्हावी यासाठी तगादा लावला होता. प्रिमिअममध्ये ५० टक्के कपात करण्याची विकासकांचा मागणी होती. राज्य शासनाने २० ऑगस्ट २०१९ रोजी आदेश जारी करीत वाढीव चटईक्षेत्रफळावरील प्रिमिअममध्ये कपात करण्यात आल्याचा आदेश जारी केला. मात्र त्यानुसार अल्प गटासाठी ५० टक्के तर मध्यम व उच्च गटासाठी २५ टक्के कपात केली. त्यामुळे वाढीव चटईक्षेत्रफळासाठी अल्प गटासाठी २० ते २८ टक्के, मध्यम गटासाठी ४५ ते ५६ टक्के आणि उच्च गटासाठी ६० ते ७१ टक्के असे प्रिमिअम निश्चित करण्यात आले.

> **म्हाडा पुनर्विकास तातडीने मार्गी लागावा यासाठी जे उपाय योजण्यात येत आहेत, त्यापैकी हा एक आहे. अधिकाधिक प्रकल्प उभे राहावेत, असा आमचा प्रयत्न आहे.**
> – मिलिंद म्हैसकर, उपाध्यक्ष, म्हाडा

मात्र हा आदेश २० ऑगस्ट २०१९ नंतरच्या प्रकल्पांसाठी दोन वर्षांसाठी लागू होता. याशिवाय विकास शुल्कातूनही दोन वर्षांसाठी सूट देण्यात आली होती. हा आदेश सर्वच प्रकल्पांना लागू करावा, अशी मागणी सातत्याने केली जात होती. गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी तशा सूचना विकासकांसोबतच्या बैठकीत केल्या होत्या. म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी मिलिंद म्हैसकर यांनी या निर्णयाच फायदा २० ऑगस्ट २०१९ आधीच्या प्रकल्पांनाही देताना मात्र ज्यांनी आतापर्यंत प्रिमिअमचे शुल्क अदा केलेले नाही वा ज्यांना ना हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आलेले नाही, अशाच प्रकल्पांना हा लाभ देण्याचे प्रस्तावीत केले आहे. अतिरिक्त सचिव (गृहनिर्माण) संजय कुमार यांना पाठविलेल्या पत्रात तसा उल्लेख आहे. या पत्राची प्रत ‘लोकसत्ता’कडे आहे. ज्यांनी या आदेशापूर्वी ज्यांनी ना हरकत प्रमाणपत्र घेतले आहे त्यांना हा लाभ मिळणार नसल्याचे या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र यामुळे ज्यांनी इमानेइतबारे शुल्क भरले त्या विकासकांना हा लाभ नाकारण्यात आल्यामुळे विकासकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड. मल्टी-स्टेट शेड्यूल्ड बँक

प्रस्तुत

लोकसत्ता यशस्वी भव! ९




## इयत्ता १० वी, विषय : भूगोल

### प्रकरण : क्षेत्रभेट

विद्यार्थी मित्रांनो,

मानव व पर्यावरण यांच्यातील सहसंबंध जाणून घेण्यासाठी एखाद्या भौगोलिक, ऐतिहासिक किंवा मानवनिर्मित ठिकाणांना भेट देणे म्हणजेच क्षेत्रभेट होय.

आज आपण क्षेत्रभेट अभ्यासाचे महत्त्व समजावून घेऊया. भूगोल विषयाच्या अभ्यासासाठी क्षेत्रभेट ही एक महत्त्वाची अभ्यास पद्धती आहे. क्षेत्रभेटीदरम्यान भौगोलिक घटक व प्रक्रियांचा प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे अनुभव घेता येतो. म्हणूनच मानव आणि पर्यावरण यांच्यातील सहसंबंध जाणून घेण्याच्या दृष्टीने भौगोलिक क्षेत्रभेटी उपयुक्त ठरतात.

क्षेत्रभेटीतील ठळक मुद्द्यांचा अभ्यास पुढील प्रवाहतक्त्यावरून करूया.




क्षेत्रभेटीची पूर्वतयारी करताना आवश्यक घटक.




**महत्त्वाची निरीक्षणे :** भूरचनेतील बदल, वनस्पतीमधील बदल, रेषाकृती वस्त्या व केंद्रित वस्त्या इत्यादी.
**शेती :** कडधान्याची पिके, उसाची शेती.
**मानवी वस्त्या व आकृतिबंध :** धाब्याची घरे, अनेक मजली इमारती, शॉपिंग मॉल, मोठी हॉटेल्स, रेषाकृती वस्त्या इत्यादी.
**वातावरणातील बदल :** शेती/ वृक्ष, बागायती शेती, भात शेती, नारळी, पोफळी, सुपारी, केळी, मसाल्याचे पदार्थ. केंद्रित वस्त्या, पाठयपुस्तकातील हे प्रकरण अभ्यासताना पाठात दिलेल्या क्षेत्रांचा क्षेत्रभेटीच्या मुद्यांचे नीट अवलोकन करा. तसेच वरील मुद्यांवरून आपल्या असे लक्षात येईल की, क्षेत्रभेट देतांना आपण या सर्व गोष्टी अभ्यासणे आवश्यक आहे.

**प्रकरणावर आधारित प्रश्नोत्तरे :**

**प्रश्न 1) पुढील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

i) सिंधुदुर्ग किल्ला भुईकोट किल्ला आहे.
**उ.** हे विधान चूक आहे.
ii) बालाघाट रांग सह्याद्री पर्वताची पूर्वेकडे पसरलेली एक डोंगररांग आहे.
**उ.** हे विधान बरोबर आहे.
iii) क्षेत्रभेट म्हणजे मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून केलेली सहल होय.
**उ.** हे विधान चूक आहे.
iv) वनस्पतींच्या प्रकारांमध्ये होणारा बदल त्या प्रदेशातील पर्जन्यमानाच्या प्रमाणातील बदलाचा सूचक नसतो.
**उ.** हे विधान चूक आहे.
v) पुणे शहराला खडकवासला धरणातील जलाशयातून पाणीपुरवठा केला जातो.
**उ.** हे विधान बरोबर आहे.

**प्र. 2. दिलेल्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**
क्षेत्रभेटीचा मार्ग (पाठ्यपुस्तक आकृती क्रमांक १.१)

i) **क्षेत्रभेटीच्या दरम्यान कोणता किल्ला आहे?**
**उ.** क्षेत्रभेटीच्या दरम्यान सिंहगड किल्ला आहे.
ii) **पश्चिम दिशेला कोणता समुद्र आहे?**
**उ.** पश्चिम दिशेला अरबी समुद्र आहे.
iii) **नकाशातील जलाशय कोणत्या शहराजवळ आहे?**
**उ.** नकाशातील जलाशय इंदापूर शहराजवळ आहे.
iv) **नकाशातील थंड हवेचे ठिकाण कोणते आहे?**
**उ.** नकाशातील थंड हवेचे ठिकाण लोणावळा आहे.
v) **नकाशात कोणता जलदुर्ग दाखविण्यात आला आहे?**
**उ.** नकाशात अलिबाग जलदुर्ग दाखविण्यात आला आहे.

**प्र.3. सविस्तर उत्तरे लिहा.**

i) **क्षेत्रभेटीची आवश्यकता स्पष्ट करा.**
**उ.** भूगोल विषयाच्या अभ्यासासाठी क्षेत्रभेट ही एक महत्त्वाचीअभ्यास पद्धती आहे. भौगोलिक संकल्पनांचा व घटकांचा विद्यार्थ्यांना स्वानुभव क्षेत्रभेटीद्वारे घेता येतो. विद्यार्थ्यांमधील निरीक्षण कौशल्याचा विकास होतो आणि ते घटनांची कारणमीमांसा स्थानिक लोकांशी थेट संवाद साधून करतात. भूगोल विषयाचा अभ्यास अधिक रंजक होतो व ज्ञानाच्या उपयोजनास क्षेत्रभेटीद्वारे चालना मिळते.

ii) **क्षेत्रभेटीसाठी तुम्ही कोणते साहित्य घ्याल?**
**उ.** क्षेत्रभेटीसाठी आम्ही खालील साहित्य सोबत घेऊ.
i) **नोंदवही–** माहिती, प्रश्नावली, प्रश्नावलीची उत्तरे इत्यादींची नोंद ठेवण्यासाठी. ii) **पेन, पेन्सिल, पट्टी–** कच्चे लेखन, नोंदवहीत नोंद, आकृती काढण्यासाठी. iii) **क्षेत्रभेटीचा मार्ग व ठिकाणांचा नकाशा–** दोन ठिकाणांमधील अंतर, अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय समजण्यासाठी. iv) **होकायंत्र–** क्षेत्रभेटीदरम्यान दिशा समजण्यासाठी. v) **कॅमेरा व दुर्बीण–** भूरूपे, वनस्पती, जलाशय, दगडांच्या प्रकारांचे छायाचित्रे घेण्यासाठी कॅमेरा व लांबवरचे भौगोलिक स्थळ पाहण्यासाठी व निरीक्षणासाठी दुर्बीण. vi) **प्रथमोपचार पेटी–** प्रथमोपचार साहित्य व वेदनाशामक औषधे ठेवण्यासाठी. vii) **पिशवी–** मृदा, दगडाचे नमुने, वनस्पतींची पाने वगैरे इत्यादींचे नमुने गोळा करण्यासाठी. viii) **इतर वस्तू–** याशिवाय मोजपट्टी, टेप, टोपी, पाण्याची बाटली, ओळखपत्र.

3) **कारखान्यास भेट देण्यासाठी प्रश्नावली तयार करा.**
i. कारखाना कधी स्थापन करण्यात आला?
ii. कारखान्यात कोणत्या वस्तूंचे उत्पादन घेतले जाते?
iii. उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल कोठून मागवला जातो?
iv. कमी वेळेत जास्त उत्पादनासाठी कोणत्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?
v. कामगार कायद्याच्या शर्तीची अंमलबजावणी व्यवस्थापनाकडून होते काय?
vi. कामगार विमा योजनांसारख्या इतर कोणत्या योजना कामगारांच्या कल्याणासाठी राबविल्या जात आहेत?
vii. अंतिम उत्पादन कोणत्या बाजारपेठेत विक्रीसाठी पाठविले जाते?
vii. सौरऊर्जेचा किती प्रमाणात वापर केला जातो?
viii. पर्यावरणाचा नाश होऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात?
ix. आपत्कालीन स्थिती टाळण्यासाठी कोणत्या उपायांचा अवलंब केला जातो?

4) **क्षेत्रभेटीदरम्यान कचऱ्याचे व्यवस्थापन कसे कराल?**
**उ.** आपले आद्यकर्तव्य म्हणून क्षेत्रभेटीच्या परिसरातील कचऱ्याचे व्यवस्थापन आपणच करणे आवश्यक आहे. क्षेत्रभेटीत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून तेथील परिसरात कचरा पसरणार नाही याबद्दल हमीपत्र घेतले पाहिजे. क्षेत्रभेटीदरम्यान खाण्याचे रिकामे पुडे, पाकिटे, पाण्याच्या बाटल्या, उरलेले अन्नपदार्थ यासंदर्भात विद्यार्थ्यांना ओला व सुका कचराकुंडीमध्ये वेगवेगळ्या टाकण्याच्या सूचना दिलेल्या असतील. ज्या ठिकाणी कचराकुंडी नसेल तेथील कचरा गोळा करण्यासाठी विद्यार्थी मोठ्या आकाराच्या गोणी व पिशव्या सोबत घेतील. क्षेत्रभेटीशी संबंधित परिसरातील कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी तेथील शासकीय अधिकाऱ्यांशी पत्राद्वारे संपर्क साधून माहिती घेतली जाईल. विद्यार्थ्यांना ‘स्वच्छ भारत’या संकल्पनेचे व्यवस्थापन व नियोजन कचऱ्याच्या माध्यमातून समजावून सांगण्यात येईल.

**स्वाध्याय : प्र.1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**
i. क्षेत्रभेटीसाठी उपयुक्त साहित्य .......नाही.
अ) नोंदवही ब) कॅमेरा क) नकाशा ड) आरेखन दंड
ii. महाराष्ट्र पठार हा अग्निजन्य प्रकाराचा......... खडक आहे.
अ) गाळाचा ब) रूपांतरित क) वालुकामय ड) बेसॉल्ट
iii. कोकणातील महत्त्वाचे पीक.......आहे.
अ) गहू ब) भात क) बाजरी ड) ज्वारी
iv. शनिवारवाडा हे प्रसिद्ध पर्यटन स्थळ........ शहरात आहे.
अ) मुंबई ब) औरंगाबाद क) पुणे ड) सातारा

**प्र.2. योग्य जोड्या जुळवा.**

| अ स्तंभ | ब स्तंभ |
|---|---|
| i. उस्मानाबाद | अ) सिंहगड किल्ला |
| ii. रायगड | ब) नळदुर्ग किल्ला |
| iii. पुणे | क) प्रतापगड किल्ला |
| iv. जंजिरा | ड) अलिबाग किल्ला |
| | इ) जलदुर्ग किल्ला |

**लेखन– पद्माकर हिरनाईक,** सहा. शिक्षक, प्रा.ज.ल. शिर्सेकर शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व), मुंबई.
**समन्वयक : सी. डी. वडके,** विद्याप्रबोधिनी, दादर

**उद्याचा विषय : विज्ञान आणि तंत्रज्ञान भाग-१**

# मोदींनी सबुरीने बोलावे!

## माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांचा सल्ला

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली




**चीनशी सुरू** असलेल्या संघर्षावर माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पहिल्यांदाच टिप्पणी केली असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सबुरीने बोलण्याचा सल्ला दिला आहे. आपल्या बोलण्याचे परिणाम काय होऊ शकतात याचा विचार करूनच नेहमी बोलले पाहिजे, असे 'मार्गदर्शन' मनमोहन सिंग यांनी सोमवारी दिलेल्या सविस्तर प्रतिक्रियेत केले आहे.

पूर्व लडाखमध्ये भारताच्या हद्दीत चीनने घुसखोरी केलेली नाही किंवा चिनी सैनिकांनी गलवान खोऱ्यातील लष्करी तळ ताब्यात घेतले नाहीत, असे विधान गेल्या शुक्रवारी झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. या विधानाचा चीनने गैरफायदा घेत गलवान खोऱ्यावर हक्क सांगितला. मोदी यांच्या विधानावर शनिवारी पंतप्रधान कार्यालयाने स्पष्टीकरण देत पंतप्रधानांच्या विधानाचा विपर्यास केल्याचे म्हटले होते. या पार्श्वभूमीवर, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी चीनच्या विद्यमान समस्येवर मतप्रदर्शन केले आहे.

गलवान खोऱ्यात १५ व १६ जून रोजी चिनी सैनिकांशी झालेल्या संघर्षामध्ये २० साहसी जवानांनी बलिदान दिले. मातृभूमीसाठी त्यांनी प्राणांची बाजी लावली. हे जवान अखेरच्या श्वासापर्यंत देशासाठी लढले. या जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांबद्दल देश कृतज्ञता व्यक्त करतो. पण, कर्नल बी. संतोष बाबू व अन्य शहीद जवानांचे बलिदान व्यर्थ जाऊ नये. त्यासाठी केंद्र सरकारने मोठे पाऊल उचलले पाहिजे. सरकारकडून त्यापेक्षा कोणतेही कमी योगदान देशाचा विश्वासघात ठरेल. अवघ्या देशाने एकत्रितपणे चीनने केलेल्या दुष्कृत्याला प्रत्युत्तर देण्याची हीच वेळ आहे.

भ्रामक प्रचार कधीही मुत्सद्दी राजकारणासाठी वा सशक्त नेतृत्वासाठी पर्याय असू शकत नाही. दिशाभूल करणाऱ्या, खोट्या व अवडंबर माजवणाऱ्या प्रचारामुळे सत्य लपून राहात नाही, हे केंद्र सरकारने लक्षात घ्यावे, अशी समज मनमोहन सिंग यांनी दिली.

एप्रिलपासून चीन सातत्याने भारताच्या हद्दीतील गलवान खोरे व पँगाँग तळ्याच्या भूप्रदेशात घुसखोरी करून या भूभागावर दावा करत आहे. आपण चीनच्या या धमक्यांना कोणत्याही परिस्थितीत बळी पडू शकत नाही व पडणारही नाही. पंतप्रधानांनी त्यांच्या विधानांचा चीनने गैरफायदा उठवू नये यासाठी दक्ष राहिले पाहिजे.

पंतप्रधानांच्या विधानांचा वापर चीनने गलवान खोऱ्यावरील दावा बळकट करण्यासाठी करू नये. या संकटाचा निपटारा करण्यासाठी व हा संघर्ष तीव्र होऊ नये यासाठी सर्व सरकारी यंत्रणांनी एकत्रित काम केले पाहिजे, असेही मनमोहन सिंग यांनी म्हटले आहे.

### हे तर शब्दांचे खेळ- नड्डा



मनमोहन सिंग यांच्या सूचनेवर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी, 'माजी पंतप्रधानांची विधाने म्हणजे निव्वळ शब्दांचा खेळ आहे,' अशी टीका केली आहे. चीनच्या कुटिल नीतीबद्दल ते आत्ता जेवढी चिंता व्यक्त करत आहेत, तेवढ्या गांभीर्याने मनमोहन सिंग यांनी पंतप्रधान असताना विचार केला असता तर अधिक बरे झाले असते. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची विधाने ऐकल्यावर मनमोहन सिंग यांच्या वक्तव्यांवर कोणीही विश्वास ठेवणार नाही. काँग्रेसच्या नेत्यांनी देशाचे मनोधैर्य खच्ची केले आहे. मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या काळात शेकडो चौरस किलोमीटरचा प्रदेश चीनला आंदण देण्यात आला. २०१० ते १३ या तीन वर्षांत चीनने ६०० वेळा घुसखोरी केली, असाही हल्ला नड्डा यांनी चढवला.

### पंतप्रधानांची जबाबदारी मोठी - राहुल



'मनमोहन सिंग यांनी महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित केला आहे. आत्ता आपण ऐतिहासिक वळणावर उभे आहोत. आपले सरकार जे निर्णय घेईल आणि कृती करेल त्याचा दूरगामी परिणाम पुढील पिढ्यांना भोगावा लागणार आहे. त्या परिणामांच्या उत्तरदायित्वाचे ओझे देशाच्या विद्यमान नेतृत्वावर असते. आपल्यासारख्या लोकशाही देशामध्ये ही जबाबदारी पंतप्रधानांवरच असते. त्यामुळेच पंतप्रधानांनी आपण उच्चारलेल्या शब्दांचे आणि घोषणांचे आपल्या देशाच्या सुरक्षेवर, राजनैतिक व्यवहार-धोरणांवर व भौगोलिक हितसंबंधांवर कोणते दूरगामी परिणाम होऊ शकतात याचा विचार केला पाहिजे, असे मनमोहन म्हणाले. भारताच्या भल्यासाठी पंतप्रधान मोदी त्यांचे म्हणणे ऐकतील अशी आशा करतो,' असे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

सहज बोलता बोलता...

गुरू ठाकूर... शांत, प्रसन्न, अबोल अशा या कलावंताची गीतं आपल्याला एकाचवेळी गुणगुणायला लावतात आणि मनात विचारांची रुजवातही करतात.

मनाचा सहज ठाव घेतील असे नेमके बोल, भिडणारा भावार्थ अशी सरळ, सुरेल गाणी ही या प्रतिभावंताची ओळख आहे. या दोन दशकांच्या सर्जनाचा धांडोळा घेण्यासाठी आपण गुरू ठाकूर यांना भेटणार आहोत... 'लोकसत्ता'च्या सहज बोलता बोलता या वेबसंवादात, येत्या शुक्रवारी...

बोलत बोलत सहज सहभागी व्हावे असा कार्यक्रम
**लोकसत्ता... सहज बोलता बोलता....**



गुरू ठाकूर,
प्रसिद्ध गीतकार

संवादक :
मिलिंद कुलकर्णी

कधी : शुक्रवार, २६ जून २०२०
वेळ : सायंकाळी ५ वाजता

* नियम व अटी लागू. प्रवेश मर्यादित

त्यांना भेटण्यासाठी तुम्ही करायचं ते इतकंच...
- http://tiny.cc/LS_SahajBoltaBolta_26June या लिंकवर जाऊन नोंदणी करा.
- नोंदणी करून झाल्यावर आमच्याकडून तुम्हाला ई-मेल आयडीवर संदेश येईल.
- याद्वारे २६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता या वेब-संवादात सहभागी होता येईल.
- अधिक माहितीसाठी http://www.loksatta.com या संकेतस्थळाला भेट द्या.

# नेपाळमधील नागरिकत्व कायद्यात भारतविरोधी तरतुदींचा समावेश

वृत्तसंस्था, काठमांडू

**नेपाळच्या नागरिकत्व** कायद्यात भारताला प्रतिकूल असे बदल करण्यात येत असून नेपाळी नागरिकाशी विवाह करणाऱ्या परदेशी महिलेला सात वर्षांनंतर नैसर्गिक नागरिकत्व मिळणार आहे.

नेपाळच्या विरोधी पक्षांनी या प्रस्तावाला विरोध केला असून त्यामुळे मधेशी लोकांची अडचण होणार असल्याचे म्हटले आहे. मधेशी लोक सीमावर्ती भागात राहतात त्यामुळे त्यांचे भारताशी रोटीबेटी व्यवहार आहेत. नेपाळी काँग्रेस व जनता समाजवादी पक्ष यांनी म्हटले आहे की, या तरतुदीमुळे भारताशी असलेल्या रोटीबेटी व्यवहारांवर परिणाम होणार आहे. मधेशी हे तराई प्रदेशात राहणारे लोक असून हा भाग दक्षिण नेपाळमध्ये येतो. हिमालयाच्या पायथ्याशी बिहारलगत हा भाग आहे. नागरिकत्व कायद्यातील प्रस्तावित सुधारणेनुसार एखाद्या परदेशी महिलेने नेपाळी व्यक्तीशी विवाह केला तर तिला सात अधिकार वापरता येतील. या महिलेला सात वर्षांनी नागरिकत्व मिळेल.

रविवारी संसदीय समितीने या सुधारणा विधेयकास मंजुरी दिली आहे. या सुधारणानुसार या परदेशी महिलांना सात वर्षे नागरिकत्वाचे प्रमाणपत्र मिळणार नाही, पण त्यांना नेपाळमध्ये राहता येईल. त्यांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक अधिकार अबाधित राहतील, त्यांना देशात उद्योग चालवता येईल. जन्म, मृत्यू, विवाह, घटस्फोट, स्थलांतर याची नोंदणी करता येईल. या महिलांना ओळखपत्रे देण्यात येतील.

महिला संघटनांनी यावर टीका केली असून त्यांनी म्हटले आहे की, जे परदेशी पुरुष नेपाळी महिलेशी विवाह करतील त्याबाबत यात काहीही म्हटलेले नाही. सध्या एखाद्या परदेशी पुरुषाने नेपाळी महिलेशी विवाह केला तर त्याला नागरिकत्वासाठी १४ वर्षे वाट पाहावी लागते.

# चाळीस सैनिक मारल्याच्या विधानावर चीनचा प्रतिक्रियेस नकार

वृत्तसंस्था, बीजिंग

**पूर्व लडाखमधील** गलवान खोऱ्यातील चकमकीत चाळीसहून अधिक चिनी सैनिक मारले गेल्याच्या केंद्रीय मंत्री व माजी लष्करप्रमुख व्ही. के. सिंह यांच्या विधानावर कुठलीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यास चीनने सोमवारी नकार दिला आहे. याबाबत कुठलीही माहिती आमच्याकडे नाही असे चीनने स्पष्ट केले. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते झाओ लिजियान यांनी सांगितले की, चीन व भारत यांच्यात सीमेवरील परिस्थिती सुधारण्यासाठी संवाद चालू आहे. राजनैतिक व लष्करी पातळीवर चर्चा चालू आहे.

चीनचे चाळीसहून अधिक सैनिक मारले गेल्याच्या सिंह यांच्या वक्तव्यावर विचारले असता त्यांनी सांगितले की, आमच्याकडे त्याबाबत कुठलीही माहिती नाही.

१५ जूनला पूर्व लडाखमधील गलवान खोऱ्यात झालेल्या धुमश्चक्रीत भारताचे २० जवान शहीद झाले होते, पण चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीचे किती सैनिक त्यात मारले गेले हे चीनने जाहीर केलेले नाही. त्या देशाच्या अधिकृत प्रसारमाध्यमांनी चीनचे नुकसान झाल्याचे म्हटले आहे पण प्राणहानीचा आकडा जाहीर केलेला नाही.

भारत-चीन यांच्यात झालेल्या धुमश्चक्रीबाबत व्ही. के. सिंह यांनी एका वृत्तवाहिनीला असे सांगितले होते की, आमचे वीस सैनिक आम्ही गमावले असले तरी त्यांचे दुप्पट सैनिक यात मारले गेले आहेत.

दरम्यान या चकमकीनंतर चीनशी चर्चा झाल्यानंतर भारताचे जे दहा जवान चीनने ओलिस ठेवले होते त्यांची सुटका करण्यात आली होती. भारतानेही चीनच्या एका कर्नलला पकडून ठेवले होते त्याच्या बदल्यात चीनने १० सैनिकांची सुटका केल्याचे माहीतगार सूत्रांचे म्हणणे आहे. भारत व चीन यांच्यातील सीमा ३४८८ कि.मी.ची असून चीनने अरुणाचल प्रदेशवर दावा सांगताना तो दक्षिण तिबेटचा भाग असल्याचे म्हटले आहे, पण भारताने हा दावा नेहमीच फेटाळला आहे.

# भारतात जन्मलेले शिया विद्वान जौहरी यांचे निधन

**कराची :** जन्माने भारतीय असलेले पाकिस्तानातील शिया विद्वान व लेखक तालिब जौहरी यांचे येथे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. जौहरी यांचा जन्म २७ ऑगस्ट १९३९ रोजी पाटण्यात झाला. त्यांच्या पश्चात तीन मुलगे आहेत. जौहरी हे फाळणीनंतर दोन वर्षांनी १९४९ मध्ये पाकिस्तानात स्थलांतरित झाले. त्यांचे शिक्षण झाल्यानंतर ते इराकला गेले. तेथे १० वर्षे धार्मिक शिक्षण घेतले.

जौहरी हे एका खासगी रुग्णालयात पंधरा दिवस व्हेंटिलेटरवर होते. रविवारी त्यांचे निधन झाले. त्यांचे पुत्र रियाझ जौहरी यांनी सांगितले की, त्यांचे पार्थिव अंचोली इमामबारा येथे अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले आहे. अयातोल्ला सय्यीद अली हुसायनी अल सिस्तानी यांचे ते शिष्य होते. ते कवी, इतिहासकार, तत्त्वज्ञही म्हणून ओळखले जात. पाकिस्तानचे पंतप्रधान इम्रान खान यांनी त्यांच्या निधनाबाबत दुःख व्यक्त केले आहे.

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

सर्व्हिसेस

भविष्यविषयक

**मुफ्त** सल्ला २४ तासात समाधान फोनवर कारोबार, प्रेमविवाह, विवाह विलंब, ग्रहक्लेश, सौतन त्रास, शत्रूनाश, घटस्फोट, विदेश यात्रा, लक्ष्मीबंधन. Pashaji- 9819326896 Bandra वेस्ट.
0070701307-2

इतर जाहिराती

नावात बदल

**मी** सीमा मधुकर कुलकर्णी माझे नाव बदलून शुभांगी श्रीकांत अरगडे आधार कार्ड नोंदणी क्र. 373401365447 असे आहे. मी राहणार 25/383 मधूस्नेह सिंहगड रोड, हिंगणे खुर्द, पुणे 411051.
0090273218-2

I have changed my old name Kotha Suseela to new name as Sanapala Suseela vide Adhaar card No.6798 4695 9218.
0090273197-1

I have changed my old name Naveen Kumar to new name as Sanapala Naveen Kumar vide Adhaar card No.4022 6771 9653.
0090273196-1

I have changed my name from Shinu Elizabeth Thomas S to shinu Anil as per Maharashtra Gazette No.(P-204150)
0070707101-1

स्थावर मालमत्ता? तुमच्या अपेक्षेप्रमाणे व्यवहार होण्यासाठी 'लोकसत्ता'त एक छोटी जाहिरात पुरेशी आहे!

छोटी मोठा

महत्त्वपूर्ण निवेदन
वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (अॅडव्हर्टायझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

बजाज फायनान्स लिमिटेड
CIN-L65910MH1987PLC042961
नोंदणीकृत कार्यालय: आकुर्डी, पुणे -४११०३५
कॉर्पोरेट कार्यालय: ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४
मुदत ठेव योजना
क्रिसिल (CRISIL) कडून 'एफएए/स्टेबल' रेटिंग आणि इक्रा (ICRA) कडून 'एमएए (स्टेबल)' रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

| कालावधी महिन्यांमध्ये | किमान ठेव (रु. मध्ये) | संचयी | बिगर- संचयी | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
| १२ - २३ | २५,००० | ६.९०% | ६.६९% | ६.७३% | ६.७९% | ६.९०% |
| २४ - ३५ | | ७.००% | ६.७९% | ६.८२% | ६.८८% | ७.००% |
| ३६ - ६० | | ७.१०% | ६.८८% | ६.९२% | ६.९८% | ७.१०% |

# लोकमानस

loksatta@expressindia.com

## चीनच्या पाठीवर बसून आर्थिक प्रगती अशक्य

**'महाबलीपुरम' हा** अग्रलेख (२२ जून) वाचला. गलवान खोऱ्यात जे घडले त्याला 'वास्तविक उंचीची जाणीव करून देणे' असे म्हणता येईल. म्हणजेच १९६२ साली जे झाले, तेच आताही झाले आहे. अमेरिकेला बाजूला सारून एकमेव महासत्ता होणे हे चीनचे ध्येय आहे, हे आता जगजाहीर आहे. २०१५ मध्ये प्रकाशित झालेल्या 'द हण्ड्रेड-इयर मॅरेथॉन' या मायकेल पिल्सबरी लिखित ग्रंथात हीच गोष्ट अधोरेखित करण्यात आली आहे. चीन भारतापेक्षा आर्थिकदृष्ट्या पाचपट मोठा आहे. चीनकडून आपण जी आयात करतो, ती चीनच्या एकूण निर्यातीच्या तीन टक्के आहे, तसेच आपली चीनला निर्यात ही चीनच्या एकूण आयातीच्या एक टक्के आहे. चीनची परकीय चलनाची गंगाजळी तीन लाख कोटी डॉलर, म्हणजे भारताच्या जवळजवळ सहापट मोठी आहे. तेव्हा चीनच्या वाढत्या जागतिक वर्चस्वाबद्दल आपले काय धोरण असणार, हा मुख्य प्रश्न आहे. चीनने भारताचे आर्थिक विश्व व्यापलेले आहे व याची परिणती आर्थिक गुलामगिरीत होऊ शकते, हा मूळ रोग आहे.

चीनला आता अधिक भूमीची नव्हे, तर अधिक मांडलिकांची गरज भासेल. चीनच्या कंपूत आपण सामील व्हायचे हे शक्य नाही. अमेरिकेची मदत घ्यायची तर अमेरिका काय करेल, याचा भरवसा नाही. कदाचित पश्चिमेत आम्ही राजे व पूर्वेत चीन राजा अशी जगाची वाटणी करायला अमेरिका तयार होईल. अर्थव्यवस्था ढासळती आहे, लष्करी सामर्थ्य मर्यादित आहे, अशा परिस्थितीत भारतासमोर अत्यंत मर्यादित पर्याय आहेत. पहिले म्हणजे, स्वतःच्या सामर्थ्याबद्दल अवास्तव गैरसमज टाळावेत. चिकाटी व संयम हवा, कारण आंतरराष्ट्रीय राजकारण हा अनेक दशके चालणारा खेळ असतो. मूळ गरज आहे ती आपली अर्थव्यवस्था बळकट करण्याची, कारण आंतरराष्ट्रीय बाजारात एखाद्या राष्ट्राचे मूल्य त्याच्या जीडीपी एवढेच असते. चीनच्या पाठीवर बसून आपली आर्थिक प्रगती करणे शक्य नाही याची खूणगाठ बांधणे आवश्यक आहे. किमान हा धडा गलवान प्रकरणातून आपण शिकावयास हवा!

– **प्रमोद पाटील,** नाशिक

## महासत्तांची व्यक्तिकेंद्रितता चिंताजनक

**'महाबलीपुरम' हा** अग्रलेख (२२ जून) वाचला आणि 'राजा कालस्य कारणम्' या संस्कृत उक्तीची आठवण झाली. आधुनिक संस्कृती व उदार अर्थव्यवस्था जोपासणारा अतिप्रगत अमेरिका आणि अर्वाचीन संस्कृती असलेला साम्यवादी, ताकदवान चीन हे दोन देश आज त्यांच्या राष्ट्रप्रमुखांच्या प्रतिमेवरून जास्त ओळखले आणि अभ्यासले जात आहेत. मात्र सर्वाधिक लोकसंख्या आणि सकल राष्ट्रीय उत्पन्न असलेल्या या दोन जागतिक महासत्ता व्यक्तिकेंद्रित असणे हे चिंताजनक आहे. माहिती तंत्रज्ञान आणि जागतिकीकरणाच्या काळात जग अधिक खुले आणि सर्वसमावेशक होईल या विचाराला मिळालेला हा धक्का आहे.

– **नकुल संजय चुरी,** विरार पूर्व (मुंबई)

## मुत्सद्देगिरीच्या कसोटीवर अपयश...

**'आक्रमकतेला वेसण?'** हा 'लालकिल्ला' सदरातील महेश सरलष्कर यांचा लेख (२२ जून) वाचला. ले. जनरल (निवृत्त) एच. एस. पनाग आणि कर्नल (निवृत्त) अजय शुक्ला यांनी चीन सीमेवरील घुसखोरीबाबत सातत्याने संरक्षणतज्ज्ञ म्हणून विश्लेषण करताना काही गंभीर प्रश्न विचारले आहेत. सर्वपक्षीय बैठकीतील पंतप्रधानांच्या घोषणेने भाजप समर्थकांसह सर्वांनाच संभ्रमात टाकले. त्यानंतर पंतप्रधान कार्यालयाने केलेला खुलासा ही सारवासारव ठरली. स्वातंत्र्यानंतर संरक्षण दलांनी आपली अराजकीयत्वाची भूमिका काटेकोरपणे जपली होती, त्याला २०१९ च्या निवडणुकीत तडा गेला. पाकिस्तानविरुद्ध केलेल्या लक्ष्यभेदी कारवाईचा लाभ उठविण्यासाठी भाजपने जाणीवपूर्वक प्रयत्न केला आणि 'सरकारविरोधात बोलणे हे संरक्षण दलांच्या विरोधी' असे समीकरण रूढ केले. पाकिस्तानविरोधी राष्ट्रवादी भूमिकेला मुस्लीमविरोधाची जोड मिळाली, हेच भाजपच्या यशाचे गमक आहे. चीनबाबत असा राष्ट्रवाद यशस्वी ठरत नाही हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. अशा प्रसंगी राजकीय नेतृत्वाच्या मुत्सद्देगिरीची कसोटी असते आणि या वेळी ते अपयशी ठरले. यातील चिंतेचा मुद्दा आहे तो सैन्य दले आणि सैनिकी कारवायांच्या होत असलेल्या राजकीयीकरणाचा. त्याबद्दल सरकार आणि सैन्य दलांचे प्रमुख यांनी गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

– **ॲड. वसंत नलावडे,** सातारा

## आक्रमक घोषणाबाजीतून मूळ मुद्द्याला बगल

**'आक्रमकतेला वेसण?'** या लेखात ('लालकिल्ला', २२ जून) नरेंद्र मोदींच्या निर्णयांमुळे आजवर झालेल्या राष्ट्रीय नुकसानीवर नेमका प्रकाश टाकला आहे. आताही राष्ट्रवादाची भुरळ पाडून, आक्रमक घोषणाबाजी करून काँग्रेसने मांडलेल्या मूळ मुद्द्याला बगल दिली जात आहे. ५ मेपासून चाललेल्या संघर्षात नक्की काय घडले; पंतप्रधान घुसखोरी झालीच नसल्याची ग्वाही देत असले तरी २० जवानांना जीव का गमवावा लागला... या साऱ्या प्रश्नांना 'भारत सहन करणार नाही' हे ठोकळेबाज उत्तर पुरेसे नाही. घुसखोरीचे वास्तव नाकारण्यात काय हशील आहे? आंतरराष्ट्रीय संबंधांवर प्रश्न उपस्थित करायचे नसतात असे एकीकडे म्हणायचे आणि जवळपास सर्व पक्षांनी सरकारला पाठिंबा जाहीर केला असतानाही सर्वपक्षीय बैठक बोलावून सोयीचे निवेदन करायचे, हे योग्य आहे का? विरोधकांच्या प्रश्नांना पंतप्रधान कार्यालय आणि दुसऱ्या फळीतील नेत्यांनी उत्तरे देण्यापेक्षा स्वतः पंतप्रधान मोदींनी पुन्हा निवेदन देऊन विश्वासार्हता वाढवणे योग्य वाटते. 'अशा प्रसंगी अंतर्गत विरोध चव्हाट्यावर मांडून भारताची बदनामी करू नये' असे म्हणणे लोकशाहीच्या व्याखेत तर बसत नाहीच, पण बालिशपणाचेही वाटते. लेखात नोटाबंदी आणि टाळेबंदीमुळे झालेल्या गैरसोयीवर आणि या निर्णयांच्या उपयुक्ततेवरही निर्माण केलेले प्रश्नचिन्ह विचार करायला लावते. मात्र, सध्या सगळ्या प्रश्नांवर दिले जाणारे एकच उत्तर 'राष्ट्रवाद जोपासा, आत्मनिर्भर व्हा' हे पुरेसे नाही.

– **नितीन गांगल,** रसायनी

## ऑनलाइन शिक्षणगंगेच्या प्रवाहातील अडथळे

**'दिशाहीन शिक्षणदीक्षा?'** हा रसिका मुळ्ये यांचा लेख ('सह्याद्रीचे वारे', २२ जून) वाचला. ग्रामीण भागात स्मार्टफोन बऱ्याच घरी आलेत; मात्र विजेचा अडथळा, घरात असलेली गजबज, शेतीच्या आणि इतर कामांचा व्यत्यय, अनेक पालकांना मोबाइल सफाईदारपणे हाताळता न येणे अशा बऱ्याच बाबी ऑनलाइन शिक्षणात अडथळे निर्माण करतील. शाळेत जाण्यासाठी सध्या येणाऱ्या अडचणी ऑनलाइन शिक्षणाने दूर करता येऊ शकतात; मात्र ग्रामीण भागात या शिक्षणाची गंगा पोहोचवणे म्हणजे एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पाणी वळविण्यासारखे झाले! ऑनलाइन शिक्षणासाठी ग्रामीण भागात मूलभूत बाबींची पूर्तता करणे हे प्रशासनासमोरचे आणि पालकांसमोरचेही मोठे आव्हान असेल. ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थितीकडेही दुर्लक्ष करून चालणार नाही. ऑनलाइन शिक्षणासाठी लागणारे कौशल्य विकसित करणेसुद्धा गरजेचे आहे. काही शिक्षक या माध्यमातून नावीन्यपूर्ण उपक्रम राबवू शकतात, मात्र सर्वच शिक्षकांची मानसिकता तशी असेल काय? शहरी भागात ऑनलाइन शिक्षण ही बाब अमलात आणण्यासाठी ग्रामीण भागाएवढे अति अडथळे येणार नाहीत, मात्र येणारच नाहीत असेही नव्हे. मोबाइल स्क्रीनसमोर बसून मुलांना कार्टून्स पाहण्यात रस आहे, मात्र तेवढाच त्यांना ऑनलाइन शिक्षणात रस असेल याबाबत साशंकता आहे. ज्याप्रमाणे वर्गात बसून आकलन होते, त्याप्रमाणेच या डिजिटल माध्यमातून होईल का, हाही प्रश्नच आहे.

– **कृष्णा जावळे,** बुलडाणा

## संयुक्त महाराष्ट्रासाठी दिनू रणदिवेंचे योगदान...

**'संयुक्त महाराष्ट्र** दालनात दिनू रणदिवे यांचा कार्यालेख उभारा!; आदरांजली कार्यक्रमात भालचंद्र मुणगेकर यांची मागणी' ही बातमी (लोकसत्ता, २२ जून) वाचली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होण्याआधी दिनू रणदिवे, प्रभाकर कुंटे व अशोक पडबिद्री या तरुणांनी 'दादर युवक सभा' स्थापन केली होती. या तरुणांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी उग्र भूमिका घेतल्यावर ज्येष्ठ नेत्यांना त्यांचे म्हणणे ऐकावे लागले आणि संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाचा नूरच पालटून गेला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कॉम्रेड डांगे, आचार्य अत्रे यांच्यासोबत रणदिवेंनी कारावासही भोगला. त्यांनी 'संयुक्त महाराष्ट्र पत्रिका' व 'लोकमित्र' या नियतकालिकांचे संपादनही केले. 'संयुक्त महाराष्ट्र पत्रिके'त रणदिवेंचे लेख व बाळासाहेब ठाकरे यांची व्यंगचित्रे असत. गिरणी कामगार व एकूणच कष्टकऱ्यांच्या बाजूनेच त्यांनी आपली लेखणी झिजवली. आजच्या नकली आणि बेगडी राष्ट्रभक्तांच्या मांदियाळीत दिनू रणदिवे यांचे कर्तृत्व अतिशय उठून दिसते. त्यामुळे मुंबईतील दादर येथील (शिवाजी पार्क) संयुक्त महाराष्ट्र दालनात दिनू रणदिवे यांचा कार्यालेख उभारण्याची डॉ. मुणगेकर यांची मागणी रास्त वाटते. राज्यातील सध्याच्या सत्ताधाऱ्यांकडून या मागणीची अंमलबजावणी हीच रणदिवे यांच्या कार्यकर्तृत्वाला अभिवादन ठरेल.



– **शिवराम सुकी,** भांडुप पूर्व (मुंबई)

## रिझर्व्ह बँकेकडे थेट नियंत्रण शक्य!

**'सहकारी बँकांचे** नियंत्रण रिझर्व्ह बँकेकडे हवे : सहकार भारतीची मागणी' ही बातमी (अर्थसत्ता, ११ जून) वाचली. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ अन्वये सहकारी बँकांची तपासणी करण्याचे अधिकार 'नाबार्ड'ला दिलेले आहेत. 'नाबार्ड'च्या स्थापनेपासून देशातील ३४ राज्य सहकारी बँका, ३६३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ५६ प्रादेशिक ग्रामीण बँका यांचे पर्यवेक्षण (इन्स्पेक्शन) 'नाबार्ड' करते. ३१ मार्च २०१९ रोजी 'नाबार्ड'चे भरणा झालेले भांडवल (कॅपिटल) रु. १२,५८० कोटी झाले असून त्यात केंद्र सरकारचा भाग १०० टक्के आहे. 'नाबार्ड'वर संपूर्ण मालकी केंद्र सरकारची असल्याने 'नाबार्ड'ची ध्येय-धोरणे ठरविताना त्यात सरकारचा वरचष्मा राहील हे निश्चित. तथापि ५ फेब्रुवारी २०२० रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय पाहता, संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात रिझर्व्ह बँकेलाच नागरी बँकांच्या नियंत्रणात अधिक अधिकार मिळण्याची शक्यता आहे.

– **रमेश नार्वेकर,** मुलुंड पूर्व (मुंबई)

# मोदी बोलले तसे वागतील!

### भारत-चीनदरम्यान आजही निश्चित सीमारेषा नसल्याने काँग्रेस नेतृत्वाच्या काळात परिस्थिती आणखी बिकट बनली. कारगिलच्या वेळी अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली जसे प्रत्युत्तर दिले, तसे आताही शक्य आहे...

**पहिली बाजू**



अतुल भातखळकर
विधानसभा सदस्य, भाजप

**चिनी सैन्याने** भारतीय भूभागावर आक्रमण केले ही वस्तुस्थिती नसून, भारत-चीन या दोन देशांमध्ये आजही कुठल्याही प्रकारची आंतरराष्ट्रीय निश्चित सीमारेषा नाही ही वस्तुस्थिती आहे. चीनशी चर्चा करत असताना आपण या ठिकाणची आंतरराष्ट्रीय सीमा ठरवावी हा आग्रह धरला; परंतु आतापर्यंत नकाशांची अदलाबदल करण्याच्या पलीकडे चीन सरकारने कधीही या गोष्टीला प्रतिसाद दिलेला नाही, हे लक्षात ठेवण्याची गरज आहे. प्रत्यक्ष नियंत्रण रेषा (लाइन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल) ही केवळ लडाखमध्ये नाही, तर भारत-चीन या दोन्ही देशांच्या संपूर्ण सीमावर्ती भागात आहे.

#### मधे आठ किलोमीटरचा टापू

तिबेटचा भाग १९५० साली पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हलगर्जीमुळे चीनने बळकावल्यानंतरच चीन आणि भारत यांची सीमा ही तयार झाली. अन्यथा जवळपास पश्चिम युरोपइतका आकाराने मोठा असलेला तिबेट जर आपण किलक (बफर) राष्ट्र म्हणून मधे ठेवू शकलो असतो, तर आज या सगळ्या प्रश्नांची चर्चा करण्याची वेळच आपल्यावर आली नसती. परंतु भू-सामरिक दृष्टिकोन तत्कालीन सत्ताधारी राजकीय नेतृत्वाकडे नसल्यामुळेच काश्मीरचा प्रश्न असेल किंवा आत्ताचा लडाखचा प्रश्न असेल, हे प्रश्न निर्माण झाले आहेत आणि त्याची दुष्फळे हा देश इतकी वर्षे भोगत आहे. आंतरराष्ट्रीय सीमांचे मानांकन झालेले नसल्यामुळे दोन्ही देशांचे सैन्य आपापल्या दृष्टीने जी प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आहे त्या रेषेवर उभे असते. दोन्ही देशांचे सैन्य उभे असलेल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषांमध्ये सुमारे आठ किलोमीटरचा भूभाग मोडतो. त्या भूभागावर भारत व चीन दोघेही दावा करत आहेत. दोन्ही देशांचे सैन्य या भूभागावर ये-जा करत असते. चर्चा केल्यानंतर दोन्ही सैन्ये आपल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर परत जातात. डोकलाममध्ये हेच घडले. आपण हरकत घेतल्यानंतर डोकलाममधून चिनी सैन्य परत मूळ ठिकाणी गेले. 'बॉर्डर मॅनेजमेंट' सुरळीत व्हावी यासाठी १९९३ व २००५ मध्ये दोन्ही देशांनी करार केले. लष्करी भाषेत 'कॉन्फिडन्स बिल्डिंग मेजर्स' हे घेतले जात असतात.

#### दोन्ही सीमांच्या आतच लष्कर

एप्रिल-मेमध्ये चिनी सैन्य या सामायिक भूभागावर आले, त्याच वेळेस त्यांच्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या आत त्यांनी सैन्याची जमवाजमव केली ही वस्तुस्थिती आहे. परंतु याकडे भारतीय लष्कराने वा सरकारने दुर्लक्ष केले ही वस्तुस्थिती नाही. लष्कराच्या भाषेत बोलायचे, तर 'अपोझिट मिरर डिप्लॉयमेंट' (थोडक्यात, जेवढ्यास तेवढे सैन्य आपल्या नियंत्रण रेषेच्या आत) तातडीने आपण सज्ज केले. त्यामुळे भारताने या घुसखोरीकडे दुर्लक्ष केले ही वस्तुस्थिती नाही.



गलवानमधील एक शहीद, नायब सुभेदार मनदीप सिंग यांना अखेरचा निरोप.

या घटनांच्या बाबतीत चर्चेतून तोडगा काढायचा म्हणून सैन्याच्या स्तरावर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या आणि ६ जूनला लेखी करार होऊन भारतीय व चिनी सैन्यांनी आपापल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर जाण्याचे ठरवले. ठरल्यानुसार १५ जूनला चिनी सैनिक परत जातात किंवा नाही हे बघण्याकरिता आपले सैनिक त्या ठिकाणी गेले होते. परंतु चिनी सैनिकांनी त्यांच्याशी वाद घालून त्यांच्यावर नियोजनपूर्व भीषण हल्ला केला. मात्र, त्याला आपण तोडीस तोड उत्तर दिले आणि या अत्यंत कठीण अशा भूप्रदेशामध्ये ३० चिनी सैनिकांना यमसदनी पाठवले, अनेकांना गंभीर जखमी केले. त्यामुळे भारतीय सैन्याने या ठिकाणी मार खाल्ला असे अजिबात नाही.

#### राजकीय नेतृत्वाकडून आदेश!

'अरे ला का रे करा' अशाच प्रकारचा आदेश हा विद्यमान राजकीय नेतृत्वाकडून होता. म्हणूनच भारतीय सैन्याने या भ्याड हल्ल्याला इतक्या प्रखरपणे उत्तर दिले. कारगिलमध्येही अशाच प्रकारे पाकिस्तानचे सैन्य आले होते, हे प्रतिपादन वस्तुस्थितीला सोडून आहे. मुळात 'एलओसी' (लाइन ऑफ कंट्रोल) व 'एलएसी' (लाइन ऑफ ॲक्च्युअल कंट्रोल) या दोन संकल्पनांमध्ये फरक आहे. १९७१ च्या सिमला करारानुसार, दोन्ही देशांनी कारगिलमधील शिखरावरील सैन्य हिवाळ्याच्या आधी खाली आणायचे आणि हिवाळा संपल्यानंतर परत वर न्यायचे असे ठरले होते. १९७२ ते १९९८ पर्यंत या पद्धतीने दोन्ही देशांची सैन्ये वागत होती. मात्र १९९९ मध्ये जेव्हा आपले सैन्य हिवाळा संपल्यानंतर मे महिन्यात त्या ठिकाणी गेले, तेव्हा आपल्या सैन्याच्या लक्षात आले की तिथे काही घुसखोर लपलेले आहेत. पण पाकिस्तान सरकारने अशी अधिकृत भूमिका घेतली की, 'हे सैन्य आमचे नाही, ते घुसखोर आहेत.' ते तुमच्या भूभागात आहेत, तुम्ही तुमचे काय ते बघून घ्या- अशा प्रकारची फसवी भूमिका पाकिस्तानने घेतली आणि अटलजींच्या समर्थ नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने त्या घुसखोरांना हाकलून लावले आणि टोलोलिंगसहित सर्व शिखरे पुन्हा एकदा आपल्या ताब्यात घेतली. भू-सामरिक दृष्टिकोन अटलजींकडे असल्यामुळेच हे घडू शकले. १९५०, १९६२ तसेच अक्साई चीनचा घास चीनने गिळल्यानंतरही लडाखचे लचके तोडण्याचे काम चीनने चालू ठेवले याचे कारणच तत्कालीन सत्ताधारी राजकीय नेतृत्वाकडे ना भू-सामरिक दृष्टिकोन होता, ना संघर्ष करण्याची राजकीय इच्छाशक्ती होती. अगदी अलीकडचे उदाहरण द्यायचे, तर २००८ साली तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी चीनच्या दबावापुढे झुकून आपला तवांगचा दौरा रद्द केला होता. त्याचबरोबर त्या वर्षीचा दलाई लामांचा तवांगमधला नियोजित कार्यक्रमसुद्धा त्यांना रद्द करायला लावला. माजी लष्करप्रमुख जनरल सुंदरजी यांनी राजकीय नेतृत्वाचा वरदहस्त नसतानाही १९८७ मध्ये 'ऑपरेशन फाल्कन' व 'ऑपरेशन ब्रास्टॅक्स' केल्यामुळे अनुक्रमे चीन व पाकिस्तानचे धाबे दणाणले होते. मात्र, या देशातल्या 'इकोसिस्टीम'ने सुंदरजी यांना याचे श्रेय न देता त्यांना युद्धखोर सेनापती ठरवले.

#### धावपट्टी पडून, रस्ता नव्हता...

नरेंद्र मोदी हे सत्तेवर आल्यापासून चीन व पाकिस्तानच्या बाबतीत अत्यंत ठामपणे पावले उचलत आहेत. व्हिएतनामला मदत, मालदीवला पुन्हा एकदा आपल्या पंखाखाली आणण्याचा प्रयत्न, मंगोलियाची भेट, सेसल्स या छोट्या देशाला लष्करी मदत करण्याचा प्रयत्न, त्याचबरोबर मुख्यतः आपल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या भागात गेल्या सहा वर्षांत गतीने पायाभूत सोयीसुविधा निर्माण करण्याचे काम मोदी सरकारने केले आहे. खरे तर चीन अस्वस्थ होण्याचे हे प्रमुख कारण आहे. जगातील सर्वात उंचीवर असलेल्या दौलत बेग ओल्डी हवाईपट्टीकडे- जिच्यामुळे अक्साई चीन व त्यापुढील सर्वच भूभाग भारतीय सैन्याच्या टप्प्यात येईल- जाणारा रस्ता भाजपचे सरकार सत्तेत येईपर्यंत तयार नव्हता. भारतीय सैन्याला या हवाईपट्टीवर पोहोचण्यासाठी चार दिवस चालत जावे लागत असे.

आता हा रस्ता पूर्णत्वाला पोहोचला असल्याने ही हवाई धावपट्टी भारत पूर्ण क्षमतेने वापरू शकतो. यामुळेही चीन अस्वस्थ आहे. (१९६२ च्या युद्धानंतर ही हवाई धावपट्टी बंद होती, ती २००७ मध्ये वायुसेनेने तत्कालीन संरक्षणमंत्री अँटोनी यांची परवानगी तर सोडाच, त्यांना न कळवताच वापरात आणली. जर त्या वेळच्या सरकारला विचारले असते तर परवानगी मिळाली नसती, असेही तत्कालीन अधिकाऱ्याने गेल्या आठवड्यातच या संदर्भात एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सांगितले आहे.)

#### उरी, बालाकोट, डोकलाम!

त्यामुळे सोनिया गांधींनी- 'चीनने आपला भूभाग कसा बळकावला,' असा प्रश्न विचारणे चुकीचे तर आहेच; पण त्यांचे भारताच्या भू-सामरिक इतिहासाचे अज्ञान प्रगट करते. मोदींच्या नेतृत्वाखाली भारताने आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्याकरिता आपले सैन्य अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. देशाच्या पंतप्रधानांनी 'या सगळ्याला आम्ही योग्य ते उत्तर देऊ' अशा प्रकारचे उद्गार काढलेले आहेत. जे उरीला घडले, जे बालाकोटला आपण घडवून दाखवले, तसेच जे डोकलामला झाले, हा इतिहास लक्षात घेतला तर नरेंद्र मोदी जसे बोलले आहेत त्याप्रमाणे वागतील, याच्याविषयी भारतीय जनतेच्या मनात कुठलीही शंका नाही, अशी खात्री आहे. त्यामुळे कुठल्याही प्रकारचे अस्थैर्य यामुळे निर्माण झाले आहे असे मानायला कोणताही वाव नाही. भारतीय सैन्य आणि भारताचे विद्यमान राजकीय नेतृत्व हे या बाबतीत पूर्णपणे समर्थ आहे.

**मनोवेध**

## भावनिक सजगता



**तारुण्यात निद्रानाश** हे चिंता, उदासीचे सौम्य लक्षण आहे. याच आजाराच्या तीव्र अवस्थेत आत्महत्या होतात. जगभरात वर्षाला साधारण आठ लाख लोक आत्महत्या करतात. यातील ३० टक्के आत्महत्या भारतात होतात. यामध्ये अयशस्वी आत्महत्या मोजलेल्या नाहीत हे लक्षात घेतले, की ही साथ किती भयंकर आहे हे लक्षात येते. ती आटोक्यात आणायची असेल तर 'भावनांची सजगता' या विषयाला शालेय वयापासून महत्त्व द्यायला हवे. औदासीन्य आजारात आत्महत्या होतात हे खरे असले, तरी शाळकरी मुले क्षुल्लक कारणांनीदेखील आत्महत्या करतात. ६० टक्के आत्महत्या पंचविशी गाठण्यापूर्वी होतात, असे जगभरात दिसून येते. कार्टून पाहायला न दिल्याने वा मोबाइल मिळाला नाही म्हणून आत्महत्या करणाऱ्या मुलांचे प्रमाण आपल्या देशातही वाढते आहे. त्यामुळे तात्कालिक प्रतिक्रिया करीत न राहता या समस्येकडे गांभीर्याने पाहायला हवे.

आत्महत्या केलेल्या व्यक्तीविषयी करुणा वाटू शकते; पण आत्महत्या या कृतीचे उदात्तीकरण होत नाही ना, याचीही काळजी समाज म्हणून आपण घ्यायला हवी. अन्यथा त्या व्यक्तीला मिळणारी प्रसिद्धी आणि सहानुभूती यामुळे त्या कृतीचे मनात सुप्त आकर्षण निर्माण होऊ शकते. आत्महत्या करायला धाडस आवश्यक असते हे खरे आहे; पण खून आणि बलात्कार करायलाही धाडस लागते. भावना तीव्र होतात तेव्हा असे धाडस येते. राग तीव्र असतो त्या वेळी खून होतो, तशीच आत्महत्याही होते. मुले राग अनावर झाल्यानेच आत्महत्या करतात. वासना तीव्र असते त्या वेळी बलात्कार होतो. आयुष्य निरर्थक आहे, भविष्य भयंकर आहे अशी भावना तीव्र होते, त्या वेळीही आत्महत्या होते. बलात्कार किंवा खुनाचे कृत्य जेवढे निंदनीय आहे, तेवढीच आत्महत्याही निंदनीय आहे, हे पुनःपुन्हा मनाला सांगायला हवे.

एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीने आत्महत्या केली की, माणसे काही काळ त्याविषयी चर्चा करतात, एकमेकांशी बोलायला हवे असे समाजमाध्यमांवर सल्ले देतात आणि काही काळ गेल्यावर हे सारे विसरून जातात. ही समस्या कमी करण्यासाठी अधिकाधिक माणसांनी 'भावनिक सजगता' या विषयाचा प्रसार करायला हवा आणि या सजगतेची सुरुवात स्वतःपासून करायला हवी.

– **डॉ. यश वेलणकर**
yashwel@gmail.com

**एकात्मयोग**

## ३३०. तीन अपराध

**अवधूत हा** यदुराजाला चराचरांतील गुरुतत्त्व सांगत आहे, त्यामागेही एक रहस्य आहे बरं का! सद्गुरू-तत्त्वाचं वर्णन काय आहे? तर *'गुरूः साक्षात् परब्रह्म'*! सद्गुरू हा 'साक्षात'- म्हणजे डोळ्यांना दिसणारं परब्रह्मच आहे. परब्रह्म म्हणजे काय? तर चराचरांत सर्वत्र जे व्याप्त आहे ते. आणि म्हणूनच गुरुतत्त्वाचं दर्शनही चराचरांत सर्वत्र घडतं, असं अवधूताचं सांगणं आहे. *'अवधूत गीते'*च्या आठव्या अध्यायात पहिला श्लोक आहे तो असा : "**त्वद्यात्रया व्यापकता हता ते। ध्यानेन चेतः परता हता ते। स्तुत्या मया वाक् परता हता ते। क्षमस्व नित्यं त्रिविधा पराधान्।।**" या श्लोकावर श्रीधर स्वामी यांनी 'गुरुतत्त्व' या प्रवचनात विवेचन केलं आहे. त्याचाही आधार आपल्या या चिंतनाला आहे. तर, 'त्वद् यात्रया' म्हणजे तुला भेटण्यासाठी मी यात्रा करतो आणि त्यामुळे व्यापक अशा तुला एका गावात, एका स्थानी, एका रूपात मी कोंडून टाकतो. म्हणजे साईबाबांचं दर्शन घ्यायचंय ना, तर शिर्डीलाच जायला हवं, गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगावी, गोंदवलेकर महाराजांच्या दर्शनासाठी गोंदवल्यातच जायला हवं. तिथं जाऊन मीच वर उच्चरवानं म्हणतो, "*अनंतकोटी ब्रह्माण्डनायक... अखंड मंडलाकारं*"! तिथून बाहेर पडलं आणि एकदा का सद्गुरूंचं गाव मागे पडलं, की त्यांनी चराचर व्यापल्याचा तो भाव क्षणार्धात विसरतो. याचा अर्थ सद्गुरूस्थानाला महत्त्व नाही असा नाही बरं. पण तिथं गेल्यावरच त्यांचं दर्शन घडतं, हा भाव चुकीचा आहे, हा पहिला अपराध आहे, हे *'अवधूत गीता'* लक्षात आणून देते. मग आम्ही ध्यानानं त्यांचं दर्शन साधायचा प्रयत्न करतो. आता हे ध्यान मनानंच घडतं आणि त्यामुळे जो मनातीत आहे त्याला मनानं जाणण्याचा प्रयत्न हा दुसरा अपराध आहे. आपण स्तुतीनं त्याचं वर्णन करण्याचा प्रयत्न करतो. म्हणजे जो वाणीपलीकडे आहे, वाणीनं ज्याचं वर्णन होऊ शकत नाही, त्याचं वर्णन वाणीनं करण्याचा तिसरा अपराध घडतो. बाबूराव अथणी म्हणून एका भक्तानं चिले महाराजांच्या आठवणी लिहिल्या आहेत. त्यात कोल्हापूरचा एक प्रसंग आहे. एकदा बाबूराव महाराजांकडे येत असताना त्यांचे एक मित्र वाटेत भेटले. त्यांचा काही महाराजांवर विश्वास नव्हता. त्यामुळे ते बाबूरावांना म्हणाले, "तुमच्यासारख्यांनी तरी अशांकडे जाऊ नये." त्यावर हे महाराज कसे वेगळे आहेत, चांगले आहेत हे काही उदाहरणं देत बाबूराव सांगू लागले. त्यात अर्धा तास गेला. ते धावतच महाराजांकडे आले, तर महाराज संतापले होते. यांना कळेना, काय झालंय ते. महाराज एकदम ओरडले, "चल, आधी अंबाबाईची क्षमा मागायला चल!" त्यांना पायात चपला घालू न देता महाराज स्वतःही अनवाणी निघाले. भर माध्यान्हीचं टळटळीत ऊन. रस्ता तापलेला. पाय पोळताहेत. अर्धा तास कित्येक गल्लीबोळांतून महाराजांनी फिरवलं. बाबूराव दमल्यावर एका झाडाच्या सावलीत त्यांना बसू दिलं. महाराज मात्र अनवाणी पायांनी भर उन्हातच उभे. बाबूराव क्षमा मागू लागल्यावर महाराज म्हणाले, "अर्धा तास माझी निंदा करत होतास काय? आता सांग की परत असं करणार नाही!" बाबूराव कळवळून म्हणाले, "मी तुमची स्तुतीच करीत होतो." महाराज ताडकन म्हणाले, "*अरे, ज्याच्या हृदयात श्रद्धा नाही, त्याच्यासमोर केलेली स्तुती निंदेतच परावर्तित होते!*" म्हणजे स्तुतीही अपराधच ठरते!

– **चैतन्य प्रेम**

**कुतूहल**

## वनशास्त्राची संस्थात्मक घडण

**प्राचीन काळी** गावांच्या हद्दीपासूनच अरण्याची सुरुवात होत असे. खरे तर जलाशये वगळता सर्वच जमीन वन-अरण्यांनी व्यापलेली होती, ज्यात लहान-लहान बेटांप्रमाणे गावे होती. अधिकतर गावकऱ्यांचा उदरनिर्वाह वनउपजांवर होत होता. अरण्यातील काही भाग मोकळा करून शेती करायची व काही वर्षांनी दुसरा भाग मोकळा करून त्यात लागवड करायची. ज्यामुळे अरण्याचे एकूण क्षेत्र तेवढेच राहत असे. भारतीय संस्कृती नद्या व अरण्ये केंद्रस्थानी ठेवूनच बहरली.

ब्रिटिश राजवटीत १८६४ साली सर डेट्रिच ब्रँडिस या जर्मन व्यक्तीची वन-महानिरीक्षक (इन्स्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्ट) म्हणून नेमणूक झाली. त्याच्या नेतृत्वाखाली जगातील पहिले वैज्ञानिक वनशास्त्र उदयाला आले. १८६५ साली पहिला भारतीय वन कायदा (इंडियन फॉरेस्ट ॲक्ट) केला गेला. शेती सुधारण्यासाठी ब्रिटिश शासनाने दुसरा एक जर्मन तज्ज्ञ द व्होलेकर याला निमंत्रित केले आणि त्याच्या सल्ल्यानुसार १८९४ मध्ये पहिले वन धोरण आखले. यानुसार वनांवरील विशेषाधिकार व वनउपजांच्या उत्पन्न-व्यापारविषयक अधिकारांवर निर्बंध घालण्यात आले. डोंगरउतारांवरील वने संरक्षित केली व व्यावसायिक वने आरक्षित म्हणून घोषित झाली. वनांतील सरकत्या शेतीवर (शिफ्टिंग कल्टिव्हेशन) बंदी आणून वनांचे किमान क्षेत्र राखून अतिरिक्त क्षेत्र स्थायी शेतीसाठी वापरण्यास अनुमती दिली. लाकूडफाटा व चाऱ्यासाठी प्रत्येक गावाला त्याच्या मालकीचे गायरान बाळगायची अनुमती मिळाली.

स्वातंत्र्योत्तर काळात, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (१९६१-६६) युनायटेड नेशन्स स्पेशल फंड आणि फूड ॲण्ड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन यांच्या सहकार्याने वनसंपत्तीचे गुंतवणूकपूर्व सर्वेक्षण करण्यात आले. त्यातून भारतीय वन सर्वेक्षण संस्थेचा (फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया) जन्म झाला. सातव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (१९८५-९०) भारतीय वन संशोधन व शिक्षण परिषद (इंडियन कौन्सिल फॉर फॉरेस्ट रिसर्च ॲण्ड एज्युकेशन), वन संशोधन संस्था (फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट) आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय वन प्रशिक्षण संस्था (आयजीएनएफए) यांची स्थापना झाली. या सर्व प्रयत्नांतून भारताने वनशास्त्रात वाखाणण्याजोगे कार्य केले आहे आणि जमीन वापर आकृतिबंधातील वनाच्छादनाचे प्रमाण योग्य राखण्यास मोलाची मदत केली आहे.

– **डॉ. पुरुषोत्तम गो. काळे**
मराठी विज्ञान परिषद,
वि. ना. पुरव मार्ग, चुनाभट्टी, मुंबई २२
office@mavipamumbai.org

# शैक्षणिक स्वैराचार

## केंद्राने विद्यापीठ परीक्षांबाबत देशभरात एक सूत्र ठरवून द्यावे ही मागणी करणाऱ्या मुख्यमंत्र्यांचे सरकारच महाराष्ट्रात असे काही समान सूत्र ठरवताना दिसत नाही...

**गतसप्ताहात पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्याशी झालेल्या सर्व-मुख्यमंत्री परिषदेत उद्धव ठाकरे यांनी एकूणच परीक्षांचा विषय काढला ते बरे झाले. पंतप्रधानांनी बैठक करोना आणि तदनुषंगिक मुद्द्यांचा आढावा घेण्यासाठी बोलावली होती. चर्चेच्या दुसऱ्या दिवशी तर तीवर लडाख परिसरातील चिनी दुःसाहसाचे सावट होते. तरीही पंतप्रधानांनी ती चर्चा रद्द केली नाही वा पुढे ढकलली नाही, ही बाबदेखील महत्त्वाची. या चर्चेत सर्वसाधारणपणे मुख्यमंत्र्यांना श्रवणभक्ती करावी लागते आणि जे काही मुद्दे उपस्थित होतात ते चर्चाविषयाशी संबंधित असे जुजबी असतात. तसेच झाले आणि पंतप्रधानांनी टाळेबंदी अधिकाधिक कशी उठवता येईल याच्या सूचना दिल्या. त्या बैठकीत उद्धव ठाकरे यांनी परीक्षा-घोळाचा मुद्दा उपस्थित केला आणि त्याबाबत काही एक निश्चित धोरण तसेच एक सूत्र केंद्राने आखून देण्याची गरज व्यक्त केली. परीक्षांचा विषय पंतप्रधानांसमोर काढणारे ते बहुधा एकमेव मुख्यमंत्री असावेत. शिक्षण हा विषय राजकीय पक्षांकडून नेहमीच 'ऑप्शन'ला टाकला जातो, ठाकरे यांनी तसे केले नाही. या मुद्द्याची पंतप्रधानांनी निश्चितच दखल घेतली असेल. तथापि त्यानंतर केंद्राकडून याबाबत काय केले जाणार याचा तपशील अद्याप तरी जाहीर झालेला नाही. तसा तो होईपर्यंत मुख्यमंत्री ठाकरे यांची सूचना आणि त्याच वेळी त्यांच्या राज्य सरकारने याबाबत घेतलेला निर्णय यांची चर्चा व्हायला हवी.

याचे कारण असे की राज्यातील पदवीच्या अंतिम परीक्षेसह सर्व परीक्षा रद्द केल्या जाव्यात असे राज्य सरकारने प्रथम ठरवले. विद्यापीठे ही स्वायत्त असतात आणि त्यांचे नियमन 'विद्यापीठ अनुदान आयोगा'कडून केले जाते. त्यामुळे राज्य सरकारचा निर्णय हा 'अव्यापारेषुव्यापार' होता. म्हणून राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी त्यात हस्तक्षेप केला आणि तो राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलपती या न्यायाने योग्यच होता. राज्यपालांच्या हस्तक्षेपाचे पुढे काय झाले हे कळावयास मार्ग नाही. राज्यपालांच्या पत्रासही राज्य सरकारने काय उत्तर दिले, आणि मुळात ते दिले की नाही, याची वाच्यता अद्याप तरी झालेली नाही. त्यामुळे ते नाही असे गृहीत धरून त्यावर भाष्य करणे अन्याय्य नाही. याचे कारण त्यानंतर उच्चशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेऊन पदवी परीक्षा रद्द करण्याबाबत शासन आदेश निघाल्याचे जाहीर केले आणि त्याबाबत आधीच्या गोंधळात मोलाची भर घातली. राज्य सरकारचे म्हणणे असे की करोनाकालीन आणीबाणी लक्षात घेता परीक्षा घेणे अयोग्य. या काळात राज्य सरकारने प्राचीन साथरोग नियंत्रण कायद्याचा आधार घेतला आहे. म्हणून त्या काळात विद्यापीठाच्या परीक्षा रद्द करण्याचा अधिकार आपणास आहे असा राज्य सरकारचा दावा. पण तो कागदोपत्री होण्याआधी राज्य सरकारच्या नाकावर टिच्चून पुणे विद्यापीठाने आपल्या अखत्यारीतील परीक्षा घेतल्या जातील असे जाहीर केले होते. राज्यातील विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंनीही परीक्षा घेणे आवश्यक असल्याचेच मत व्यक्त केले होते. अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेताच विद्यार्थ्यांना रोजगाराच्या बाजारात सोडणे हे त्यांचे शैक्षणिक नुकसान करणारे आहे. कारण या परीक्षा-विरहित उत्तीर्णांची संभावना आयुष्यभर 'फुकट पास' अशीच होणार हे उघड आहे. हे असे होणे खरे तर अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे. पण विद्यार्थी संघटना आणि अभ्यासू विद्यार्थी यांचा घटस्फोट होऊन कित्येक वर्षे लोटली. त्यामुळे 'परीक्षेस न जाताच पास' होण्याच्या आनंदात मोठा विद्यार्थी वर्ग न्हाऊन निघताना दिसतो. मुळात ही मागणी प्रथम केली 'युवा सेना' या मुख्यमंत्री सुपुत्र आदित्य ठाकरे-चलित संघटनेने. एखाद्या सरकारी अंमलदाराच्या चिरंजीवाने आपल्या सवंगड्यांकडून काही आगळीक झाल्यास त्यांना 'घाबरू नका, माझे वडील अमुकतमुक आहेत' असा धीर द्यावा तद्वत आदित्य ठाकरे यांनी आपल्या संघटना सदस्यांना काळजी करू नका, मी परीक्षाच रद्द करून घेतो असे बहुधा सांगितले असावे. कारण ज्या तत्परतेने राष्ट्रवादी ते शिवसेना असा प्रवास केलेले उच्चशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी ही मागणी केली त्यातून हे दिसून येते. विवेकास रजा देऊन कोणी कोणासमोर कुर्निसात करावा आणि लोटांगण घालावे हा ज्याचा त्याचा प्रश्न. त्यात अन्यांस रस असण्याचे कारण नाही. तथापि या विवेकास रजा देण्याचा संबंध एका पिढीशी असल्याने त्याची दखल घेणे आवश्यक ठरते.

> **उच्चशिक्षणमंत्री म्हणतात की परीक्षा 'ऐच्छिक' आणि परीक्षा न देणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यांकन कोणत्या निकषांच्या आधारे करणार हे विद्यापीठेच आपापले ठरवतील! या गोंधळाचाच नव्हे, तर मूळ निर्णयाचा फेरविचार आवश्यक आहे...**

त्यातही सामंत यांच्या निर्णयातील ढळढळीत विरोधाभास या निर्णयाचा समाचार घेण्यास भाग पाडतात. उदाहरणार्थ परीक्षा देण्याचा हा निर्णय 'ऐच्छिक' आहे असे आपले उच्चशिक्षणमंत्री म्हणतात. समाजजीवनात किमान एक शिस्त आणि समानता पाळण्यासाठी काही नियम सर्वांनी पाळणे आवश्यक असते. उदाहरणार्थ सरकार अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी वाहतूक नियम पाळणे ऐच्छिक करेल काय? केंद्र सरकार उद्या आयकर भरणे ऐच्छिक करेल काय? असे अन्य अनेक नमुना प्रश्न सांगता येतील. त्या सर्वांचे उत्तर जर नाही असे असेल तर विद्यार्थ्यांनी परीक्षा देणे ऐच्छिक कसे असू शकेल? तसे ते केले आणि उद्या रोजगार बाजारात एक ऐच्छिक म्हणून परीक्षा न दिलेला आणि दुसरा परीक्षेस सामोरे जाऊन पदवी मिळवलेला विद्यार्थी समोर आल्यास निर्णय कोणाच्या बाजूने होईल हे ओळखण्यास किमान अक्कलही पुरेशी ठरेल. विद्यार्थ्यांना तितकी समज नक्की असते. त्यामुळे तो धोका टाळण्यासाठी समजा सर्व नाही तरी बहुसंख्य विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्याचे ठरवले तर त्यांची परीक्षा विद्यापीठांना घ्यावीच लागेल. आणि त्यासाठी विद्यापीठांना आवश्यक ते सहकार्य राज्य सरकारांना करावेच लागेल. तसे झाल्यास- आणि तसे होण्याचीच शक्यता अधिक- मग करोनाकालीन आणीबाणीचे काय? त्या वेळी राज्य सरकारकडे मागे जाण्याचा पर्याय नसेल. आणि तसे होणे हे हात दाखवून अवलक्षण नव्हे काय? तेव्हा ते टाळण्यासाठी 'परीक्षा नकोच' हा निर्णय मागे घेणे हा शहाणपणा नाही, असे कोण म्हणेल?

आणि यातील दुसरा विरोधाभास हा मुख्यमंत्र्यांच्या मागणीचा. केंद्राने देशभरात एक सूत्र ठरवून द्यावे ही त्यांची मागणी योग्य. पण खुद्द त्यांचे सरकार मात्र आपल्या पातळीवर असे काही समान सूत्र ठरवताना दिसत नाही. कारण उच्चशिक्षणमंत्री म्हणतात की कोणत्या निकषांच्या आधारे महाराष्ट्रातील विद्यापीठे परीक्षा न देणाऱ्या विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करणार हे त्यांचे ते ठरवतील. म्हणजे डझनभर विद्यापीठांचे याबाबत तितकेच निकष असू शकतील. केंद्राकडून देशपातळीवर एकसमान सूत्राची अपेक्षा ठेवायची आणि राज्याच्या पातळीवर मात्र विद्यापीठांना 'कुणी गोविंद घ्या कुणी गोपाळ घ्या' असे स्वातंत्र्य द्यायचे, हा दुजाभाव झाला. या मुद्द्यावर राज्य सरकार तो विद्यापीठांचा अधिकार आहे, असे म्हणू शकते. पण तसा तो आहे हे मान्य करायचे असेल तर परीक्षा घ्यायचा अधिकारही विद्यापीठांचाच आहे. मग त्यात तरी राज्य सरकारचा हस्तक्षेप का? शिवाय 'एटीकेटी'वाल्यांचे काय, दूरस्थ आणि मुक्त शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय, हे प्रश्न अद्यापही अनुत्तरितच आहेत. की त्यांचेही विद्यापीठ त्यांना हवे ते ठरवणार?

हे उघड उघड शैक्षणिक स्वैराचारास निमंत्रण देणारे आहे. शिक्षणाच्या दर्जासाठी एके काळी देशात ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात मराठी अस्मितेच्या नावे राज्य करणाऱ्या पक्षाकडून तो व्हावा हे दुर्दैवी आणि घातक आहे. एका पिढीचे भवितव्य धोक्यात आणणारा हा निर्णय राज्य सरकारने प्रतिष्ठेचा करू नये आणि शिक्षणतज्ज्ञांच्या सल्ल्याने त्याचा पुनर्विचार करावा. पुढील पिढीसाठी आपण इतके तरी करू शकतो.

# मृत्यूचे तांडव



**समोरच्या बाकावरून**

**पी. चिदम्बरम**

**एकविसाव्या शतकात चीन व भारत हे मिळून आशियाचे शतक घडवताना नेतृत्व करतील असे मोदी यांचे स्वप्न होते, ते आता धुळीस मिळाले आहे. लष्करी गुप्तचर यंत्रणेचे अपयश तर आहेच; परंतु डोकलामचा धडा आपण शिकू शकलो नाही, पंतप्रधानांनी वाटाघाटींत योग्य वेळी हस्तक्षेप केला नाही, हेही उघड झाले आहे...**

**भारत व चीन** यांच्यात आता संघर्षाच्या नवीन पर्वाला सुरुवात झाली आहे काय, असा प्रश्न पडण्याइतपत सीमेवरील परिस्थिती चिघळल्याचे दिसते. पहिल्या टप्प्यात चीनच्या सैन्याने हळूहळू भारतीय प्रदेशात काही कि.मी. अंतरापर्यंत घुसखोरी केली, पण हे कुणाच्या लक्षात आले नाही. त्यांनी गलवान खोरे, हॉट स्प्रिंग्ज, पँगॉग त्सो (सरोवर) अशा काही भागांचा कब्जा घेतला. त्यानंतर ५-६ मेदरम्यान चिनी सैन्याची घुसखोरी निदर्शनास आली. दुसरा अध्याय अगदी अलीकडचा म्हणजे १५ व १६ जूनदरम्यानच्या रात्रीचा. चिनी सैन्याची भारतीय सैनिकांशी गलवान नदीच्या खोऱ्यात चकमक झाली. त्यात आपले २० जवान शहीद झाले तर इतर ७० जण जखमी झाले. याशिवाय भारताच्या दहा सैनिकांना चीनच्या सैन्याने ओलीस ठेवले होते, त्यांची सुटका १८ जून रोजी लष्करी पातळीवरच्या वाटाघाटीनंतर करण्यात आली. हा तपशीलही फारसा स्पष्टपणे सरकारने सांगितला नव्हता. भारत-चीन सीमा किंवा प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचा वाद १९६२ च्या युद्धापासून चिघळलेला आहे; परंतु १९७५ नंतर चीनलगतच्या सीमेवर एवढे भारतीय जवान शहीद होण्याची ही पहिलीच वेळ होती. गेली ४५ वर्षे शांतता राखणे ही काही कमी मोठी कामगिरी नाही. पण चीनशी चांगले संबंध असल्याचा आव आणणाऱ्या मोदी यांच्या काळात ही शांतता भंगली, सीमेवरील गलवान भागातील भूमीवर पुन्हा भारतीय सैनिक धारातीर्थी पडले. यातून शांततेचा तर भंग झालाच, पण चीनची अनेक दिवस साचलेली खदखद बाहेर पडली. मात्र, त्याला आपल्या जवानांनी प्राणपणाने लढून चोख उत्तर दिले.

### चुकीचे चित्र

मोदी सरकारने गेल्या सहा वर्षांत चीनशी मैत्रीचे जे गोडगुलाबी चित्र बऱ्याच प्रयत्नांती निर्माण केले होते तो एक आभास होता, हे आता सीमेवर जे घडले त्यातून स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जेव्हा गुजरातचे मुख्यमंत्री होते तेव्हापासून ते चीनचे आवडते होते, त्यांना चार वेळा त्या देशाने निमंत्रण दिले. नंतर ते देशाचे पंतप्रधान झाले, त्यानंतरही त्यांनी चीनला पाच वेळा भेट दिली. जिनपिंग व मोदी यांच्या जवळिकीचे हे चित्र पाहिले तर दोन्ही देशांतील संबंध किती गहिरे असतील असे कुणालाही वाटल्यावाचून राहणार नाही. २०१८ मध्ये वुहान शहरात जिनपिंग यांनी मोदी यांचे खास स्वागत करून त्यांच्याशी अनौपचारिक चर्चा केली, नंतर २०१९ मध्ये महाबलीपुरम येथे मोदी यांनीही त्यांच्याशी अशाच प्रकारे चर्चा करून अनौपचारिक बाबींचा ऊहापोह केला. त्यामुळे भारत-चीन मैत्रीचा कळसाध्याय झाला असेच वाटू लागले होते, पण त्याचा फुगा १५ व १६ जूनमधील रात्री गलवान खोऱ्यातील धुमश्चक्रीत भारताचे २० जवान शहीद झाल्यानंतर फुटला.

त्या रक्तरंजित रात्रीनंतरही भारताने समेटाचे तुणतुणे सुरूच ठेवले. परराष्ट्र कामकाज मंत्रालयाने अतिशय कमजोर विधान केले; त्यात असे म्हटले होते, की चिनी सैन्याने सीमेवरील जैसे थे परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला त्याचा परिणाम म्हणून सीमेवर हिंसाचार झाला. चीनचा तो प्रयत्न एकतर्फी होता. आमचे सैन्य आमच्या हद्दीत काम करीत होते, तशीच कृती चीनच्या सैन्याकडून अपेक्षित होती पण त्यांनी तसे न करता जैसे थे स्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. याउलट आपण चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने मांडलेली भूमिका पाहिली तर त्यांची प्रतिक्रिया अतिशय चपळ व आक्रमक होती- 'गलवान खोऱ्याचा भाग हा चीनचा असून त्यावर आमचा सार्वभौम अधिकार आहे,' असे चीनने ठामपणे म्हटले होते. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी भारतास सांगितले की भारताने सर्व प्रक्षोभक कृती आता थांबवाव्यात, भारताने चीनला कमी लेखू नये. आम्ही आमच्या प्रादेशिक एकात्मतेचे रक्षण करण्यास सज्ज आहोत.



अहमदाबाद- २०१७ (संग्रहित छायाचित्र)

### गुप्तचरांचे अपयश

या सगळ्यात अनेकांना असा प्रश्न पडला असेल, की मे महिन्यात चीन असे का वागला. त्याबाबत अनेक मतप्रवाह मांडले जात आहेत. चीनने गेले अनेक महिने या घुसखोरीचे नियोजन केले होते. त्याची मुळे शोधल्यास ती ऑगस्ट २०१९ पर्यंत जातात. त्या वेळी मोदी सरकार जम्मू काश्मीरचा विशेष घटनात्मक दर्जा काढून घेण्याच्या आत्मप्रौढीच्या खटाटोपात गुंतले होते, पण दुसरीकडे चीनचे काय चालले आहे याकडे कुणाचेच लक्ष नव्हते. कदाचित सरकारला यात काहीही माहिती नव्हते अशातला भाग नसेल, पण त्यांनी त्याकडे दुर्लक्षही केले असेल किंवा त्याला महत्त्व दिले नसेल. माझ्या मते यात भारताने चीनच्या कारवायांना फारसे महत्त्व देण्याचे टाळले. चीनने लडाखचा बराच भूभाग घुसखोरीने ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. त्या भागावर आता ते 'सार्वभौम हक्क' सांगत आहेत. जेव्हा चीनने 'बेल्ट अँड रोड' प्रकल्प सुरू केला तेव्हा त्यात लडाखचा भाग असलेल्या गिलगिट बाल्टिस्तानातून पाकिस्तानला जोडण्याचा विचार होता. त्यामुळेच भारताने प्रत्यक्ष नियंत्रण रेषेच्या आपल्या हद्दीत राहून डीबीओ रस्त्याला जोडणारा उपरस्ता बांधण्याचा जो प्रयत्न केला त्याला चीनचा कठोर विरोध होता. अक्साई चीन हा भारताचा आहे व तो आम्ही घेतल्याशिवाय राहणार नाही, असे गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत ठणकावून सांगितले होते; त्याचीही नोंद चीनने योग्य वेळी घेतली होती. भारताला जर चीनच्या हेतूंचा त्याच वेळी संशय आला नसेल, तर ती गंभीर बाब आहे.

जर कुणी यात भारताच्या आत्मसंतुष्टतेला दोष दिला असेल, तर ते चुकीचे नाही. यात भारतीय गुप्तचर संस्था व संरक्षण गुप्तचर संस्था जबाबदार आहेत. लडाखमध्ये या दोन्ही संस्थांची माणसे कार्यरत असतात. त्यांना हे कळायलाच हवे होते. एक प्रकारे ही कारगिलसारखी अक्षम्य घटना झाली. उपग्रहाच्या मदतीने प्रतिमा, छायाचित्रे घेण्याच्या सुविधा असताना हे घडले आहे. रोज अवकाशात आपले उपग्रह फिरत असतात, त्यांनी काढलेली सीमावर्ती भागाची छायाचित्रे आपल्या सुरक्षा संस्थांकडे येत असतात. त्याला लडाखचा भाग अपवाद नाही. किंबहुना चीन-भारत या सीमेवर जे काही चालले आहे त्याची इत्थंभूत खबरही आपल्याला असायलाच हवी होती. कारगिल व गलवान खोरे येथे जे घडले त्यातील फरक इतकाच की, कारगिलमध्ये गोंधळलेला/ गडबडलेला पाकिस्तान हा प्रतिस्पर्धी होता; गलवानमध्ये धूर्त चीन हा प्रतिस्पर्धी आहे.

देसपांगमध्ये २०१३ या वर्षात भारताने चीनला धडा शिकवला. त्या वेळी चीनला पूर्णपणे माघार घ्यावी लागली. २०१७ मध्ये भूतानजीक डोकलाम येथे चीनला भारताचे सामर्थ्य अनुभवायला मिळाले, तसेच कमकुवत बाजूही कळल्या. डोकलामच्या तिवंध्यावरून (ट्रायजंक्शन) चीनने काही प्रमाणात सैन्य माघारी घेतले तेव्हा भारताने आनंदोत्सव साजरा केला. पण तो क्षणभंगुर ठरावा अशाच आताच्या घटना आहेत. त्या काळात डोकलाम पठारावर चीनने जी बांधकामे केली त्याकडे भारताने दुर्लक्ष केले. आजपर्यंत डोकलाम पठारावर चीनचे वास्तव्य आरामात सुरू आहे.

### मोदींची चूक

डोकलामचा धडा चीन गलवान खोऱ्यातही गिरवत आहे. त्यांनी तो पँगाग त्सो येथे लागू करून पाहिला. फिंगर ४ (चीनच्या मते असलेली प्रत्यक्ष नियंत्रण रेषा) व फिंगर ८ (भारताच्या मते असलेली नियंत्रण रेषा) यांच्या दरम्यानचा भागही चीनने बळकावण्याचा प्रयत्न केला. गलवान खोऱ्यात जे गमावले ते टाळण्याची खरे तर संधी होती. कोअर कमांडर पातळीवर ६ जूनला वाटाघाटी झाल्यानंतर मोदी यांनी चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांना दूरध्वनी करून लगेच दोन्ही बाजूंसाठी संयुक्त निवेदनावर मतैक्य घडवायला हवे होते. त्यातून दोन्ही देशांच्या वाटाघाटीत जे ठरले त्यावर ठोस शिक्कामोर्तब झाले असते. तसे झाले असते तर १५ व १६ जूनच्या त्या रात्री भारतीय जवान बळी गेले नसते. मोदी यांनी ही मोठी चूक केली आहे.

### स्वप्न संपले

एकविसाव्या शतकात चीन व भारत हे मिळून आशियाचे शतक घडवताना नेतृत्व करतील असे मोदी यांचे स्वप्न होते ते आता धुळीस मिळाले आहे. मोदी हे जिनपिंग यांच्याबाबत काही ठोस भूमिका घेऊन सुधारणेस भाग पाडतील अशातली शक्यता नाही. जिनपिंग हे मोदी यांच्याबरोबर पुन्हा जुळवून घेऊन काही सुधारणात्मक पावले उचलतील याबाबत सध्या तरी आपण अंदाजच बांधू शकतो. आता हे दोन्ही नेते कधीच जवळचे मित्र राहणार नाहीत. तरी दोन्ही देशांतील व्यापार चालू राहील. नरसिंह राव, वाजपेयी, डॉ. मनमोहन सिंग यांच्या काळात ज्या पद्धतीने जसे करार होत असत तसे होत राहतील. त्यानंतर ४०५६ कि.मी. लांबीच्या भारत-चीन सीमेवर शांतता राखण्याचा लटका प्रयत्न केला जाईल.

आता दोन्ही नेत्यांमध्ये कुठल्या शिखर परिषदा, अनौपचारिक चर्चा, झोपाळ्यावर एकत्र झुलण्याचे भावनिक उमाळे असणार नाहीत. यापुढे दोन्ही देशांत असतील त्या शुष्क वाटाघाटी. मोदी यांनी संत तिरुवल्लुवर यांनी दोन हजार वर्षांपूर्वी सांगितलेली गोष्ट लक्षात ठेवावी : '*नशिबाची शक्ती, व्यक्तिगत शक्ती, प्रतिस्पर्ध्याची शक्ती, मित्रांची शक्ती यांचा विचार करून तुम्ही तुमच्या कृतीची दिशा ठरवायची असते*' (कुरल ४७१).

हे संतवचन त्यांनी विसरू नये.

**लेखक भारताचे माजी अर्थमंत्री आहेत.**

**संकेतस्थळ** : pchidambaram.in
**ट्विटर** : @Pchidambaram_IN

## अन्वयार्थ

# सारे काही संख्याबळासाठी...?

**लोकसभेत ३०३** खासदारांचा पल्ला गाठलेल्या भाजपने राज्यसभेत मित्रपक्षांच्या साह्याने बहुमताचा आकडा गाठण्यासाठी हरप्रकारे प्रयत्न सुरू ठेवले आहेत. पक्षासाठी एकेक जागा महत्त्वाची असल्याने भाजपचे धुरीण टोकाची भूमिका घेण्यास कचरत नाहीत हे गुजरात वा मणिपूरमधील ताज्या राज्यसभा निवडणुकीतही दिसले. मोदी सरकारच्या पहिल्या कारकीर्दीत राज्यसभेत बहुमत नसल्याने विरोधकांकडून अडवणूक होत असे. लोकसभेत २०१९ मध्ये बहुमत मिळताच भाजपने राज्यसभेत कोणत्याही परिस्थितीत संख्याबळ वाढविण्यावर भर दिला. मग त्यातूनच काँग्रेस, समाजवादी पक्ष, तेलुगू देशम, लोकदल या पक्षांच्या खासदारांना वश करण्यात आले. फोडाफोडीतून विरोधी बाकांवरील आठ खासदार भाजपच्या गळाला लागले. ताज्या राज्यसभा निवडणुकीत गुजरातमध्ये एक जादा जागा जिंकण्यासाठी भाजपने सारी शक्ती पणाला लावली आणि काँग्रेसच्या आठ आमदारांच्या राजीनाम्यांमुळे ते शक्य झाले. मध्य प्रदेशात ज्योतिरादित्य शिंदे यांच्या बंडामुळे काँग्रेसला राज्याची सत्ता गमवावी लागली; त्याबरोबरच राज्यसभेची एक जादा जागा भाजपला मिळाली. मात्र मणिपूरची एक जागा जिंकण्यासाठी भाजपने ज्या काही क्लृप्त्या केल्या त्यातून राजकीय निरीक्षकही चक्रावले असतील. तीन वर्षांपूर्वी मणिपूर विधानसभा निवडणुकीत ६० पैकी २८ जागांवर काँग्रेसचे तर २१ भाजपचे सदस्य निवडून आले होते. भाजपने वेळ न दडवता छोट्या पक्षांना बरोबर घेतलेच पण काँग्रेसमध्ये फोडाफोडी करून सरकार स्थापन केले. काँग्रेसच्या आठ आमदारांनी भाजपला समर्थन दिले. पक्षांतरबंदी कायद्यातील तरतुदीनुसार आवश्यक तेवढे संख्याबळ या बंडखोरांकडे नसल्याने, या आठजणांना अपात्र ठरविण्याकरिता काँग्रेसने विधानसभा अध्यक्षांकडे अर्ज केला. सुमारे तीन वर्षे विधानसभा अध्यक्षांनी यावर निर्णयच घेतला नाही. शेवटी काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांच्या कृतीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त करीत विशिष्ट कालमर्यादेत निर्णय घेण्याचा आदेश दिला. ही कालमर्यादा संपली तरीही अध्यक्षांनी निर्णयच घेतला नव्हता. शेवटी एका मंत्र्याला अपात्र ठरविण्यात आले तर सात आमदारांचा निर्णय राखून ठेवला. अध्यक्ष निर्णय घेण्यास विलंब लावत असल्याने उच्च न्यायालयाने या सात आमदारांच्या विधानसभा प्रवेशावर बंदी घातली. त्यातच गेल्या आठवड्यात राज्यसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपच्या तीन, प्रादेशिक पक्षाच्या चारसह नऊ आमदारांनी भाजप सरकारचा पाठिंबा काढून घेतला व काँग्रेसला पाठिंबा जाहीर केला. या घडामोडींमुळे राज्यसभेची भाजपची जागाही अडचणीत आली होती. यातूनही भाजपने 'मार्ग' काढला. प्रलंबित असलेल्या सात काँग्रेस आमदारांबाबत विधानसभा अध्यक्षांनी तात्काळ निर्णय घेऊन चौघांना अपात्र ठरविले तर तिघांना मतदानाचा अधिकार दिला. या आमदारांविरोधातील याचिकेवर सोमवारी सुनावणी होणार होती. पण अध्यक्षांनी तातडी म्हणून चार दिवस आधीच सुनावणी करून निर्णयही जाहीर करून टाकला. तीन वर्षे निर्णय लांबवणाऱ्या अध्यक्षांनी इतक्या आत्यंतिक तातडीने सुनावणी घेतल्याचा फायदा भाजपलाच होणार, हे स्पष्टच होते. उच्च न्यायालयाने आमदारांच्या प्रवेशावर बंदी घातली असली तरी 'घटनेच्या दहाव्या परिशिष्टानुसार आपल्या अधिकारात कोणी हस्तक्षेप करू शकत नाही,' असा युक्तिवाद विधानसभा अध्यक्षांनी केला. याहून धक्कादायक म्हणजे तृणमूल काँग्रेसच्या एकमेव आमदारालाही अपात्र ठरविले. या साऱ्या खेळीतून भाजपचे विजयाचे गणित जुळले. या घडामोडींनंतर काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे धाव घेतली; पण आयोगानेही हात वर केले. न्यायालयात कधी निकाल लागेल तेव्हा लागेल, पण राज्यसभेची एक जागा जिंकण्यासाठी भाजपने केलेल्या खेळीतून विधिमंडळात विधिनिषेध उरला नसल्याचे दिसून आले.



## व्यक्तिवेध



**राजिंदर गोयल**

**'कसोटी क्रिकेट** खेळू न शकलेले महानतम फिरकी गोलंदाज' असे राजिंदर गोयल यांचे वर्णन नेहमीच केले जाई. नुकतेच वयाच्या ७७व्या वर्षी त्यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले, त्या वेळी अनेक मृत्युलेखांमध्येही हाच उल्लेख. पण गोयल यांच्या प्रदीर्घ आणि महत्त्वपूर्ण कारकीर्दीसाठी तो काहीसा अन्याय्यच ठरेल. २४ वर्षांमध्ये भारतातील स्थानिक क्रिकेट स्पर्धांमध्ये १८.५८च्या सरासरीने ७५० बळी, त्यात रणजी स्पर्धेत ६३७ बळी हा विक्रम आता कोणाच्याही आवाक्यापलीकडचा आहे. राजिंदर गोयल हे डावखुरे फिरकी गोलंदाज. त्यांची कारकीर्द फुलू लागली त्या वेळी भारतीय क्रिकेट क्षितिजावर बिशनसिंग बेदी, इरापल्ली प्रसन्ना, श्रीनिवासन वेंकटराघवन आणि भागवत चंद्रशेखर यांचाही उदय झाला होता. या चौघांनाच प्राधान्याने भारतीय संघात स्थान मिळत गेल्यामुळे गोयल यांची संधी हुकली ती कायमचीच. त्यातही त्या चौकडीतील सर्वांत यशस्वी आणि प्रभावशाली असे बेदी हेही डावखुरे फिरकी गोलंदाजच. त्यामुळे गोयल यांचा कसोटी प्रवेश अधिकच खडतर बनला. पण याची त्यांनी कधीही पर्वा केली नाही. 'चांगली गोलंदाजी करत राहण्यापलीकडे काय करू शकत होतो?' असा त्यांचा सवाल. त्यांची ही 'चांगली गोलंदाजी' म्हणजे निव्वळ दहशतीचा मामला. विजय मांजरेकर, सुनील गावस्कर, दिलीप वेंगसरकर अशा भिन्न वयांच्या फलंदाजांना त्यांची जरब वाटायची. पारंपरिक फिरकी गोलंदाज चेंडूला भरपूर उंची देतात. पण गोयल फारशी उंची द्यायचे नाहीत. त्यामुळे चेंडू फलंदाजांपर्यंत झटकन यायचा. इंग्लिश फिरकी गोलंदाज डेरेक अंडरवूड यांच्या काहीशी जवळ जाणारी ही शैली. या शैलीमुळे क्रीझ सोडून फलंदाजी हे पारंपरिक फिरकी गोलंदाजांविरुद्धचे हुकमी अस्त्र गोयल यांच्यापुढे वापरता यायचे नाही, अशी आठवण गावस्कर यांनी लिहून ठेवली आहे. त्यामुळे त्यांची फलंदाजी बॅकफूटवरच खेळावी लागायची. गोयल वेगामध्ये बदल करून फलंदाजांना चकवायचे. गोयल यांचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे, सर्व प्रकारच्या खेळपट्ट्यांवर त्यांची गोलंदाजी प्रभावी ठरायची. गोयल काय किंवा आपले पद्माकर शिवलकर काय, यांना कसोटी खेळण्याची संधी मिळाली नाही. पण त्यांच्या गोलंदाजीमुळे भारतीय फलंदाज समृद्ध बनले. फिरकी गोलंदाजांचेच नव्हे, तर फिरकी गोलंदाजी प्रभावीपणे खेळून काढणाऱ्या फलंदाजांचेही नंदनवन भारत बनला यात गोयल, शिवलकर यांच्यासारख्यांचे श्रेय निःसंदेह आहेच. गोयल यांची खासियत म्हणजे त्यांनी कशाहीबाबत आणि कोणाहीविषयी कटुता बाळगली नाही. गोयल हरियाणाचे, बेदी दिल्लीचे. दोघांमध्येही अखेरपर्यंत उत्तम दोस्ताना होता. ४३व्या वर्षी ते निवृत्त झाले, पण नंतरही निव्वळ खेळाच्या प्रेमापोटी विविध प्रकारे मार्गदर्शक म्हणून काम करत राहिले. स्थानिक क्रिकेट त्यांच्या परीने समृद्ध करत राहिले.

## उलटा चष्मा

# जिव्हा-आसनांचे कर्म आणि मर्म...

***मित्रांनो, आपण** आंतरराष्ट्रीय योगदिन गेली सहा वर्षे साजरा करीत आहोत. या वर्षी हा दिवस आपण आपापल्या घरांतच, कुटुंबियांसमवेत साजरा केला. मात्र अनेकांनी योगदिनात सहभाग न नोंदवता, रविवार लोळतच घालवला. त्यांच्यासाठी आणि योगावर गाढ विश्वास असलेल्या सर्वांसाठी, एका नव्या पैलूची ओळख इथे करून देत आहे. आपले शरीर हे योगसाधनेचे साधन असते, हे सर्वांनाच माहीत आहे. अनुलोम विलोम, प्राणायाम आदींतून शरीरांतर्गत योग, तर अनेक आसनांमधून बाह्यशरीराने योगसाधना केली जाते. अशा प्रकारे साऱ्या शरीराचा विचार योगात आहे. त्यामुळेच, गंभीर शारीरिक व्याधी असणाऱ्यांनी कठीण आसने करू नयेत असे योगगुरू सांगतात. हे तात्कालिक व्याधींनाही लागू आहे. उदाहरणार्थ आपण गाफील असताना गेल्याच आठवड्यात कुणी आपल्या पाठीत फटके मारले असतील तर आपली पाठ दुखत असते. अशा वेळी पाठीच्या कण्यावर ताण पडेल, अशी आसने- उदाहरणार्थ हलासन, भुजंगासन, मयूरासन आदी आसने- करू नयेत, हे इष्ट सांगितले आहे. मात्र योगसाधनेत शरीर हे जसे साधन, तसे एका अर्थाने ते साध्यही असते. त्यामुळे पाठीच्या कण्याचे दुखणे बरे झाले, की मग ही आसने करायची आहेत. अशा आसनांमुळे पाठीच्या कण्यास लाभच होतो. पाठीचा कणा लवचिक होतो. कणा लवचिक असेल तर चटकन कोणाहीपुढे वाकता येते. आता काही साधक विचारतील की कणा ताठ ठेवण्याचेही महत्त्व योगात आहे, ते कसे काय? ते महत्त्व आहेच. ते कुणी नाकारणार नाही. आपापले काम करताना कणा ताठ ठेवला, तर निश्चितपणे लाभ होतात. हे लाभ फक्त स्वतःला नव्हे तर इतरांनाही होतात. मग लवचिक कण्याचा लाभ काय?*

*इथे आपण उदाहरण पाहू. हे उदाहरण आहे जिभेचे. जीभ लवचिक असते, हे साऱ्यांनाच माहीत आहे. या लवचिकतेचे बाह्य आणि अंतर्गत, लौकिक आणि पारमार्थिक असे लाभ आहेत. 'दोन हजाराची नोट येणार, मग काळा पैसा हद्दपार होणार' असे सांगणारे लोक चार वर्षांपूर्वी सर्वत्र होते. नोट आली आणि काळा पैसा नष्ट झाला नाही, तेव्हा हेच लोक लोभीपणा नष्ट होत नाही तोवर काळा पैसा जाणार नाही, असे सांगू लागले. इथे पैशाचा रंग महत्त्वाचा नाही. जिभेची लवचिकता वाढली, हे आपल्या उदाहरणात महत्त्वाचे. जीभ जितकी वापरली जाते, तितकी तिची लवचिकता वाढते. आधार म्हणून, २०१४ पूर्वी जिभा कशा वापरल्या जात होत्या आणि आता जिभा कशा वापरल्या जातात, याची उदाहरणे तुम्ही आंतरजालावर शोधू शकता. जिभेच्या लवचिकतेवर भरपूर संशोधनही झाले आहे, अभिमानाची बाब म्हणजे ते भारतीयांनी केलेले आहे. असो. हे झाले अलीकडील उदाहरण. योगशास्त्र हे पुरातन शास्त्र आहे. ते सदा नवीन राहावे, या हेतूने आजच्या जगण्याशी ते जोडले पाहिजे! जिव्हा-आसन असे अशा अनेक उद्गारांना म्हणता येईल. त्या आसनांनी जिभेची जशी लवचिकता वाढली, तशी आपल्या पाठीच्या कण्याची लवचिकता विविध आसनांनी वाढू शकते, एवढेच या उदाहरणातील मर्म.*

## स्वयंअध्ययन मार्गदर्शनासाठी शैक्षणिक दिनदर्शिका

**पुणे :** करोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाइन शिक्षण सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पालकांच्या मदतीने स्वयंअध्ययन कसे करावे हे समजावण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून शैक्षणिक दिनदर्शिका तयार करण्यात आली असून, त्यात विषयनिहाय अभ्यास कसा करावा या बाबतचे मार्गदर्शन करण्यात आले आहे.

### ऑनलाइन चाचण्यांचा विद्यार्थ्यांवर मारा नको

शिक्षकांनी दूरध्वनी-मोबाइल, व्हॉट्स अ‍ॅप, चित्रफितीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद ठेवून त्यांचे शिक्षण आनंददायी करण्याची सूचनाही दिनदर्शिकेत देण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांवर ऑनलाइन चाचण्यांचा मारा न करता त्यांच्याशी चर्चा करणे, प्रश्न विचारणे, शंकानिरसन करणे आणि सर्वंकष मूल्यमापन करणे महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले आहे.

विद्यार्थ्यांनी प्रत्येक धडा वाचून झाल्यावर कोणती कृती करावी, पालकांशी संवादाच्या माध्यमातून उजळणी कशी करावी, कोणता स्वाध्याय करावा, पाठाचा अभ्यास कसा करावा, किती गणिते कोणत्या पद्धतीने सोडवावीत याचे नियोजन या दिनदर्शिकेमध्ये देण्यात आले आहे. याद्वारे विद्यार्थी आणि शिक्षक स्वतःच्या वेळेनुसार अध्ययन, अध्यापन करू शकतील अशी माहिती राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेचे संचालक दिनकर पाटील यांनी दिली.

# मालमत्ता विक्रीतून पाचशे कोटींचे उत्पन्न

## उत्पन्नवाढीसाठी महापालिकेच्या मालमत्तांची विक्री

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** उत्पन्नवाढीसाठी महापालिकेने स्वमालकीच्या काही मालमत्ता विकण्याचा निर्णय घेतला असून त्या माध्यमातून किमान पाचशे कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळेल, असा अंदाज गृहीत धरण्यात आला आहे. या निधीतून शहरातील विकासकामे मार्गी लावण्यात येतील, असा दावा महापालिके तील सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आला आहे.

महापालिके ला मिळणाऱ्या उत्पन्नावर मर्यादा आल्यामुळे विकासकामांसाठी निधी मिळणार का, असा प्रश्नही निर्माण झाला आहे. त्यामुळे उत्पन्नाचे नवनवीन स्रोतांची चाचपणी सुरू झाली असून त्याअंतर्गत मालमत्ता विक्री करण्यासंदर्भात गांभीर्याने विचार सुरू झाला आहे. सध्या महापालिकेच्या मालकीच्या १० हजार सदनिका आहेत. त्यापैकी ३ हजार सदनिका महापालिके च्या ताब्यात आहेत. त्यातील १ हजार ५०० लहान-मोठ्या सदनिका, गाळ्यांची विक्री करण्याचे संकेत सत्ताधाऱ्यांकडून देण्यात आले आहेत.

महापालिकेच्या मोकळ्या जागांवर सातत्याने अतिक्रमणे होतात. ती रोखण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. सुरक्षा रक्षकांचा खर्च, देखभाल दुरुस्तीवरही खर्च करावा लागतो. त्यामुळे त्याचा वापर मंगल कार्यालये, लहान-मोठ्या कार्यक्रम करण्यासाठी केल्यास उत्पन्न वाढेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. महापालिकेतील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार मालमत्ता विक्रीतून किमान पाचशे कोटी रुपयांचे उत्पन्न महापालिकेला मिळू शकते. याशिवाय महापालिके च्या मोकळ्या जागांचा (ॲमिनिटी स्पेस) वापर व्यावसायिक कारणांसाठीही करण्याचे नियोजित आहे.

> महापालिकेच्या मालकीच्या मालमत्तांची विक्री करण्याचे अधिकार महापालिकेला आहेत. सध्या या मालमत्तांवर मोठा खर्च करावा लागत आहे. त्यामुळे त्या विकता येऊ शकतात. त्याबाबत विचार सुरू झाला आहे. यातून शेकडो कोटींचे उत्पन्न मिळेल. हा निधी विकासकामांसाठी वापरता येईल.
>
> – हेमंत रासने, अध्यक्ष, स्थायी समिती, महापालिका

वस्तू आणि सेवा करापोटी (जीएसटी) मिळणाऱ्या अनुदानाबाबतची अनिश्चितता, करोना संकटामुळे ठप्प झालेली बांधकामे, घटलेले बांधकाम परवानगी शुल्क आणि मिळकतकराचे घटलेले उत्पन्न या परिस्थितीमुळे महापालिकेपुढे चालू आर्थिक वर्षात महासंकट निर्माण झाले आहे. वर्ष अखेरीस अपेक्षित उत्पन्न जमा होण्याची शक्यताच धूसर असल्यामुळे प्रकल्पांची कामेही थांबविण्याची वेळ महापालिके वर आली आहे.

यंदा नवे आर्थिक वर्ष सुरू झाले, तरी महापालिके च्या बांधकाम विभागाकडे अद्यापही परवानगीचे प्रस्ताव आलेले नाहीत. जीएसटीपोटी दरवर्षी साधारण दोन हजार कोटी रुपये महापालिकेला मिळतात. सध्या दीडशे कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. मिळकतकरातून चारशे कोटी रुपये मिळाले आहेत.

महापालिके कडून अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी केवळ समान पाणीपुरवठा योजना आणि भामा-आसखेड पाणीपुरवठा योजना ही कामे सुरू ठेवण्याचा निर्णय झाला असून अन्य प्रकल्पांवर फु ली मारण्यात आली आहे. त्यामुळे आता उत्पन्नाचे स्रोत धुंडाळण्यास सुरुवात झाली आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील नाल्यांची पालिका पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी सलग तीन दिवस पाहणी केली.

# नालेसफाईचे दारुण चित्र उघड

## पाहणी दौऱ्यानंतर तत्काळ कार्यवाहीचे पिंपरी चिंचवड पालिका आयुक्तांचे आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील नाल्यांची पाहणी दौरा पूर्ण केल्यानंतर नालेसफाईचे दारुण चित्र समोर आले आहे. या संदर्भात, आवश्यक कार्यवाही तातडीने करण्याचे आदेश महापौर माई ढोरे आणि पालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

वादळी पावसामुळे शहराची दाणादाण उडाल्यानंतर आणि प्रत्यक्ष पावसाळा सुरू झाल्यानंतर उशिरा जाग आलेल्या पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी महापौर व आयुक्तांच्या उपस्थितीत १७ ते १९ जून असा तीन दिवसांचा पाहणी दौरा केला. या निमित्ताने जवळपास १०० ठिकाणी भेट देऊन नाल्यांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. स्थापत्य विभागातील अधिकाऱ्यांनी चांगल्या अवस्थेत असलेल्या नाल्यांकडेच सर्वांना नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागातील नाल्यांची दुरवस्था महापौर तसेच आयुक्तांना दाखवून दिली. यावरून आयुक्तांनी काही अभियंत्यांची जागीच कानउघडणी केली. काही ठिकाणी अरुंद नाले तर काही ठिकाणी नाल्यांमध्ये अस्वच्छता दिसून आली. तुंबलेले नाले ही सर्वच क्षेत्रीय कार्यालयात सामाईक समस्या असल्याचे आढळून आले. नाल्यांची रुंदी वाढवावी, खराब झालेल्या वाहिन्या बदलण्याची सूचना करण्यात आली.

> पावसाळापूर्व कामांची पाहणी करण्यासाठी महापौर, आयुक्तांसह नगरसेवक व अधिकाऱ्यांचा पाहणी दौरा झाला. पाहणी दौऱ्यात आढळून आलेल्या नाल्यांशी संबंधित समस्यांवर योग्य कार्यवाही करण्याचे आदेश आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत.
>
> – नामदेव ढाके, सत्तारूढ पक्षनेता

# लोकसभेत सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्या पाच खासदारांमध्ये तिघे महाराष्ट्राचे

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** लोकसभेत सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्या पाच खासदारांमध्ये पहिल्या तीन क्रमांकावरचे खासदार हे महाराष्ट्रातील आहेत. २१२ प्रश्न विचारणाऱ्या बारामतीच्या सुप्रिया सुळे प्रथम क्रमांकावर असून त्यांच्यापाठोपाठ धुळ्याचे सुभाष भामरे आणि शिरूरचे डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रत्येकी २०२ प्रश्न विचारले आहेत.

मध्य प्रदेशातील मंदसौर येथील खासदार सुधीर गुप्ता (१९८ प्रश्न) आणि झारखंड येथील जमशेटपूर येथील खासदार बिद्युत महतो (१९५ प्रश्न) हे चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहेत. पुण्यातील परिवर्तन संस्थेने पहिल्या वर्षीच्या खासदारांच्या कामकाजाचा अहवाल जाहीर करताना ३१ मेपर्यंतच्या कामाची दखल घेतली आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्षा अंकिता अभ्यंकर, समन्वयक तन्मय कानिटकर आणि सायली दोडके यांनी सोमवारी ऑनलाइन पत्रकार परिषदेत दिली. हा अहवाल khasdar.info या संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. लोकसभेत सर्वाधिक प्रश्न विचारणाऱ्या महाराष्ट्रातील खासदारांमध्ये सुळे, भामरे आणि डॉ. कोल्हे यांच्यासह श्रीरंग बारणे (मावळ) आणि गजानन कीर्तिकर (उत्तर-पश्चिम मुंबई) यांचा समावेश आहे. लोकसभेत सर्वाधिक चर्चांमध्ये सहभाग घेणाऱ्या राज्यातील पाच खासदारांमध्ये सुळे आणि बारणे यांच्यासह राहुल शेवाळे (दक्षिण मध्य मुंबई), डॉ. श्रीकांत शिंदे (कल्याण) आणि विनायक राऊत (रत्नागिरी-सिंधुदुर्ग) यांचा समावेश आहे. स्वतंत्रपणे विधेयक मांडणाऱ्या राज्यातील पहिल्या पाच खासदारांमध्ये गोपाळ शेट्टी (उत्तर मुंबई), डॉ. श्रीकांत शिंदे, सुप्रिया सुळे, श्रीरंग बारणे आणि राहुल शेवाळे यांचा समावेश आहे.

### लोकसभेत सर्वाधिक उपस्थिती

- गोपाळ शेट्टी (उत्तर मुंबई) - १०० टक्के
- मनोज कोटक (उत्तर पूर्व मुंबई) - १०० टक्के
- कपिल पाटील (भिवंडी) - ९५ टक्के
- सुनील मेंढे (भंडारा-गोंदिया) - ९३.७५ टक्के
- हेमंत गोडसे (नाशिक) - ९३.७५ टक्के

# ऑनलाइन अधिसभेवर बहिष्काराचे सावट

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेला सदस्यांकडून विरोध

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फु ले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाइन अधिसभेला सदस्यांकडून विरोध करण्यात येत आहे. ऑनलाइन अधिसभेच्या वैधतेविषयी प्रश्नचिन्ह अधिसभा सदस्यांनी उपस्थित के ले असून, नेहमीच्या पद्धतीने अधिसभा न घेता ऑनलाइन पद्धतीने अधिसभा घेतल्यास त्यावर बहिष्कार घालण्याची काही अधिसभा सदस्यांनी भूमिका घेतली आहे.

करोना विषाणू संसर्गामुळे विद्यापीठाची अर्थसंकल्पीय अधिसभा मार्चमध्ये होऊ शकली नाही. त्यामुळे कु लगुरूंच्या अधिकारात अर्थसंकल्पानुसार तीन महिने कामकाज करण्यात आले. मात्र, ही मुदत ३० जूनला संपत असल्याने २५ जूनला अर्थसंकल्पीय अधिसभा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मात्र, अधिसभा ऑनलाइन न घेता नेहमीच्या पद्धतीने घेण्याची मागणी आता जोर धरत आहे.

अधिसभा सदस्य डॉ. नंदू पवार म्हणाले, की अर्थसंकल्पाला मान्यता घेण्यासाठी विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील आहे. पण विद्यापीठाशी संबंधित अन्य प्रश्नही महत्त्वाचे आहेत. ऑनलाइन अधिसभेत अर्थसंकल्प वगळता अन्य विषय बाजूला राहतील. तसेच ऑनलाइन बैठकीची तरतूद विद्यापीठ कायद्यात नसल्याने ऑनलाइन अधिसभेच्या वैधतेबाबतही प्रश्न आहे. तसेच अधिसभेची सूचना एकवीस दिवस आधी द्यावी लागते. त्यानुसार ही सूचना देण्यात आलेली नाही. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाला अधिसभेच्या कार्यप्रणालीचे उल्लंघन करता येणार नाही. विद्यापीठ लाखो विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यायला तयार आहे, पण थोडक्या सदस्यांची अधिसभा घेण्याची तयारी न दाखवणे योग्य नाही. ऑनलाइन अधिसभा घेतल्यास या बैठकीत सहभागी न होण्याचा निर्णय घ्यावा लागेल. नेहमीच्या पद्धतीने अधिसभा घेण्याबाबत राज्यपालांनाही निवेदन दिले आहे.

विद्यापीठाची अधिसभा नेहमीच्या पद्धतीनेच व्हायला हवी. अर्थसंकल्पाशिवाय अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी ऑनलाइन बैठकीत पुरेसा वेळ मिळणार नाही. मात्र विद्यापीठाने नेहमीच्या पद्धतीने अधिसभा न घेतल्यास अधिसभेवर बहिष्कार टाकण्याची भूमिका घ्यावी लागेल, असे अधिसभा सदस्य संतोष ढोरे यांनी सांगितले.

### अंतिम वर्ष परीक्षेच्या मुद्द्यावर अधिसभेत चर्चेची मागणी

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षा न देता त्यांना पदवी प्रमाणपत्र हवे असल्यास तसे त्यांच्याकडून लेखी स्वरूपात घेऊन विद्यापीठांनी योग्य ते सूत्र वापरून त्यांचा निकाल घोषित करण्याबाबतचे निर्देश राज्य शासनाने दिले आहेत. हा मुद्दा व्यावसायिक आणि अव्यावसायिक अशा दोन्ही अभ्यासक्रमांना लागू आहे. मात्र या निर्णयामुळे विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांना तांत्रिकदृष्ट्या पदवी देता येणार नाही. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या स्वायत्त परिषदांनी या निर्णयाला मान्यता न दिल्यास पदवीच्या वैधतेचा प्रश्न निर्माण होईल. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची पदव्युत्तर प्रवेशाची प्रवेश प्रक्रिया कशी राबवणार हाही प्रश्न आहे. तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशावरही परिणाम होणार आहे. अनेक अभ्यासक्रमांना पुरेसे विद्यार्थी मिळणार नाहीत. परिणामी शिक्षकांना कार्यभार राहणार नसल्याने त्यांच्या नोकरीवर गदा येण्याची शक्यता आहे. असे विविध मुद्दे उपस्थित करून अधिसभेमध्ये अंतिम वर्ष परीक्षांच्या विषयावर चर्चा करण्याची मागणी डॉ. शामकांत देशमुख, डॉ. संजय खरात, दादाभाऊ शिनलकर, संतोष ढोरे, शशिकांत तिकोटे, तानाजी वाघ, डॉ. प्रवीण चौधरी, डॉ. सुनीता आढाव, डॉ. देविदास वायदंडे, गिरीश भवाळकर, बागेश्री मंठाळकर, डॉ. बाबा सांगळे यांनी केली आहे.

> शासनाच्या निर्देशांनुसार जास्त व्यक्तींना एकत्र येता येणार नाही. तसेच राज्यपालांनीही ऑनलाइन अधिसभेला मान्यता दिलेली आहे. त्यानुसारच ही अधिसभा घेण्याचे नियोजन आहे. करोनाचा प्रादुर्भाव वाढत असताना जास्त लोकांनी एकत्र येणे योग्य नाही. तसेच प्रत्यक्ष अधिसभा घेतल्यास तीन जिल्ह्यांतून सदस्य येणार असल्याने त्यात जोखीम आहे. अर्थसंकल्पाशिवाय अन्य मुद्द्यांवर चर्चा होणे आवश्यक असले, तरी सध्याची परिस्थिती अनुकूल नाही. त्यामुळे २५ जूनच्या अधिसभेत अर्थसंकल्पाची मान्यता प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. परिस्थिती पूर्वपदावर आल्यावर अन्य विषयांवरील चर्चेसाठी पुन्हा स्वतंत्र अधिसभा घेता येईल.
>
> – डॉ. एन. एस. उमराणी, प्र कुलगुरू

# वृत्तपत्रे वितरक, घरकामगारांसाठी वेगळ्या आदेशांची गरज नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शहरासह जिल्ह्यातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये घरोघरी वृत्तपत्र वितरणाला आणि घरकामगारांना बंदी करण्यात येत असल्याच्या रोज तक्रारी येत आहेत. मात्र, राज्य आणि जिल्हा प्रशासनाने याबाबत दिलेल्या आदेशांचे पालन करणे आवश्यक आहे. के वळ प्रतिबंधित क्षेत्रामध्येच याबाबतचे नियम पाळले जावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नवल किशोर राम यांनी सोमवारी केले. तसेच याबाबत गृहनिर्माण सोसायट्यांसाठी वेगळे आदेश काढण्याची गरज नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

सहकारी आणि इतर गृहनिर्माण संस्थांबाबत (हौसिंग सोसायटी) राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाने करोनाच्या अनुषंगाने वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. त्यानुसारच गृहनिर्माण संस्थांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत करोनाच्या अनुषंगाने सोसायट्यांकडून स्वतः नियम तयार करण्यात येत असून ते सर्व सभासदांना पाळणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे नियम बेकायदा असून याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिलेले आदेश शहरासह जिल्ह्यातील सर्व सोसायट्यांसाठी बंधनकारक आहेत. याबाबत गृहनिर्माण सोसायट्यांसाठी वेगळ्या आदेशांची गरज नसून राज्य आणि जिल्हा प्रशासनाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे, असेही जिल्हाधिकारी राम यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, सोसायटीमधील करोनाबाधित रुग्ण उपचारानंतर बरे होऊन आल्यानंतर त्यांच्यावर, त्यांचे नातेवाईक व त्यांची काळजी घेणारे यांच्यावर बहिष्कार घालण्यात येऊ नये. सोसायटीमधील अत्यावश्यक सेवेतील अधिकारी किंवा कर्मचारी यांना योग्य पद्धतीने वागणूक द्यावी. त्यांना कर्तव्यावर जाणे-येणे यासाठी प्रतिबंध करू नये. सोसायटीमधील अत्यावश्यक सेवा पुरवठा करणाऱ्या व्यक्ती, संस्था (विजेबाबत कामे करणारे, प्लंबिंग, गॅस किंवा पाणी इत्यादी सेवा) यांना सोसायटीमध्ये ये-जा करण्यासाठी प्रतिबंध करू नये असे, त्यांनी सांगितले.

### प्रतिबंधित क्षेत्रात बंदी

टाळेबंदी शिथिल करण्यात आल्यानंतर घरोघरी वृत्तपत्रे वितरक, घरकामगार यांना कामावर जाण्यास हरकत नाही. केवळ शहरात महापालिका आयुक्त आणि ग्रामीण भागात जिल्हा प्रशासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या प्रतिबंधित क्षेत्रात बंदी आहे. संबंधित भाग प्रतिबंधित क्षेत्रातून वगळल्यानंतर बंदी उठवावी, असेही जिल्हाधिकारी राम यांनी स्पष्ट केले.

ऑनलाइन पूर्वनियोजित वेळेशिवाय काम नाही

# निम्म्या क्षमतेने ‘आरटीओ’ कार्यान्वित

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** वाहन परवान्यासह इतर सर्व प्रकारच्या कामकाजासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय सोमवारपासून कार्यान्वित करण्यात आले. करोनाची दक्षता म्हणून सध्या निम्म्या क्षमतेनेच कामकाज करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या कामांसाठी नागरिकांना ऑनलाइन पूर्वनियोजित वेळ घेऊनच कार्यालयात जावे लागणार आहे.

टाळेबंदीनंतर आरटीओतील कामकाज पूर्णपणे बंद करण्यात आले होते. टाळेबंदीत हळूहळू शिथिलता देत असताना काही दिवसांपूर्वी नव्या वाहनांच्या नोंदणीचे काम सुरू करण्यात आले होते. त्यानंतर राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार वाहन आणि नागरिकांशी संबंधित सर्वच प्रकारची कामे सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले होते. वाहन परवाना आणि इतर कामांसाठी नागरिकांना पूर्वनियोजित वेळा देणेही सुरू करण्यात आले होते. त्यानुसार सध्या वाहन आणि नागरिकांशी संबंधित सर्व प्रकारची कामे सुरू करण्यात आली आहेत.



शिकाऊ आणि पक्क्या वाहन परवान्याच्या चाचणीसह इतर सर्व प्रकारची कामे पुणे आरटीओकडून सोमवारपासून सुरू करण्यात आली.

### दिवे ग्रामस्थांच्या आक्षेपानंतर पर्यायी व्यवस्था

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत येणाऱ्या व्यावसायिक वाहनांची योग्यताचाचणी दिवे येथील चाचणी मैदानावर घेतली जाते. आरटीओचे कामकाज सुरू झाल्यानंतर या ठिकाणीही चाचण्या सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र, करोनाची पार्श्वभूमी लक्षात घेता येथील चाचण्या बंद करण्याचे पत्र ग्रामपंचायतीने आरटीओला दिले. त्यामुळे हे कामकाज बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, पूर्वनियोजित वेळ घेतलेल्यांच्या वाहनांची चाचणी पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या मोशी येथील चाचणी मार्गावर केली जाणार आहे. पूर्वनियोजित दिवसानुसार संबंधित वाहनांसह या ठिकाणी दुपारी १ वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अजित शिंदे यांनी केले आहे.

# वृत्तपत्र विक्रेत्यांना मदतीचे आवाहन

## वृत्तपत्र पोहोचविणाऱ्या विक्रेत्यांची आर्थिक घडी विस्कटली

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** इलेक्ट्रॉनिक आणि समाजमाध्यमातून करोना संसर्गाबद्दल चुकीचा संदेश समाजात गेल्यामुळे वृत्तपत्र विक्री व्यवसाय चालू आणि बंद या चक्रात अडकला असताना घरोघरी दररोज वृत्तपत्र पोहोचविणाऱ्या विक्रेत्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. त्यांना आता मदतीचा हात देण्याची गरज असून दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कंपन्या, गणेशोत्सव मंडळे आणि संघटनांनी वृत्तपत्र विक्रेत्यांना मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमातून येणाऱ्या भडक बातम्यांच्या काळात वृत्तपत्रांची विश्वासार्हता अबाधित राहिली आहे. पूर्ण शाहनिशा करून बातमी प्रसिद्ध करण्याची परंपरा वृत्तपत्र माध्यमांनी जपली आहे. अशा बातम्यांचा समावेश असलेले वृत्तपत्र घरोघरी पोहोचवताना ऊन-पाऊस-वाऱ्याची पर्वा न करता अखंड सेवा पुरवणारा वृत्तपत्र विक्रेता हा घटक व्यवसायाची लढाई लढत आहे. आपत्कालीन परिस्थिती असली, तरी आपल्यापर्यंत वेळेत वृत्तपत्र पोहोचविणारे विक्रेते अनेक अडचणींचा सामना करत आहेत. ग्राहकांमध्ये होणारे समज-गैरसमजाचे वातावरण, अंक वितरणासाठी मनुष्यबळाची उपलब्धता ही समस्या, प्रत्यक्ष ग्राहकाकडे मासिक बिल मिळवण्यासाठी फिरण्यास आलेल्या मर्यादा यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा अशा कात्रीमध्ये वृत्तपत्र विक्रेते सापडले आहेत. आपला व्यवसाय सुरू ठेवत ते प्रत्येकाच्या वाचनाची भूक भागवत आहेत, ही कौतुकाची बाब आहे. अशा वृत्तपत्र विक्रेत्यांना समाजाकडून मदतीचा हात मिळण्याची आवश्यकता असून दानशुरांनी त्यांना अर्थसाह्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### येथे मदत करा

- खातेदार : पुणे वृत्तपत्र विक्रेता संघ
- बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र
- खाते क्रमांक : 60131088730
- आयएफएससी कोड - MAHB 0000001

# पिंपरीत सत्ताधाऱ्यांची नामुष्की

## प्रस्तावच दाखल न झाल्याने जून महिन्याची सभा नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी:** पिंपरी पालिकेची जून महिन्याची सर्वसाधारण सभाच होऊ शकली नाही. सभेसाठी तयार करण्यात येणाऱ्या विषयपत्रिकेसाठी एकही प्रस्ताव नगरसचिव कार्यालयाकडे दाखल न झाल्याने सत्ताधाऱ्यांवर ही नामुष्की ओढवली. महापालिकेच्या स्थापनेपासून आतापर्यंतच्या प्रवासात असा प्रकार प्रथमच घडल्याचे ज्येष्ठ सदस्यांकडून सांगण्यात आले.



दर महिन्याच्या २० तारखेला सर्वसाधारण सभेचे आयोजन केले जाते. त्यासाठी आवश्यक असलेली विषयपत्रिका जवळपास दोन आठवडे आधी तयार करण्यात येते. त्याचप्रमाणे, सर्व सदस्यांना ती घरपोच केली जाते. यात आतापर्यंत कधीही खंड पडला नाही.

टाळेबंदीमुळे महापालिकेचे कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले होते. टाळेबंदीचे निर्बंध हळूहळू शिथिल केल्यानंतर स्थायी समिती तसेच पालिका सभेचे यापूर्वीच्या तहकूब असलेले कामकाज पूर्ण करण्यात आले. मात्र, जून महिन्याच्या सभेसाठी कोणताही प्रस्तावच दाखल न झाल्याने सभेची विषयपत्रिका तयार झाली नाही. परिणामी, शनिवारी (२० जून) अपेक्षित असलेली सभाच होऊ शकली नाही. राष्ट्रवादीचे नगरसेवक दत्ता साने यांनी या प्रकरणी खुलासा करण्याची मागणी आयुक्तांकडे केली आहे.

या संदर्भात, पक्षनेते नामदेव ढाके यांनी सांगितले, की सुरुवातीला करोनाच्या पार्श्वभूमीवर निर्बंध होते. नंतर, यापूर्वीच्या सभांचे प्रलंबित कामकाज जूनच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात आले. २० जूनच्या सभेसाठी निकडीचे विषय नव्हते. म्हणून सभा होऊ शकली नाही.

> **“** महिन्यात एक सभा झालीच पाहिजे. मात्र, जूनच्या सभेचे कामकाज होऊ शकले नाही. एप्रिल आणि मे महिन्यात टाळेबंदीमुळे सभांचे कामकाज झाले नाही. आधीच्या सर्व सभांचे एकत्रित कामकाज १ जून आणि ४ जूनच्या सभांमध्ये घेण्यात आले होते.
>
> – उल्हास जगताप, नगरसचिव

# रामनदी पूरमुक्त होण्यासाठी तातडीची कार्यवाही आवश्यक

## किर्लोस्कर वसुंधरा रामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा अहवाल सादर

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** नैसर्गिक प्रवाहांचे पुनरुज्जीवन करून गाळ काढणे, अतिक्रमणे हटविणे, नैसर्गिक प्रवाहांच्या मार्गांचे पुनरुज्जीवन आणि रामनदी-मुळा संगम क्षेत्रातील घन कचरा हटविणे या उपाययोजनांची तातडीने कार्यवाही केल्यास रामनदी पूरमुक्त होऊ शकेल. तीन लाख नागरिक बाधित होण्यापासून वाचू शकतील.

किर्लोस्कर वसुंधरा रामनदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचा अहवाल 'किर्लोस्कर वसुंधरा'चे संयोजक वीरेंद्र चित्राव सोमवारी जाहीर केला. या प्रकल्पामध्ये इकॉलॉजिकल सोसायटीचे डॉ. गुरुदास नूलकर, वसुंधरा स्वच्छता अभियानचे अनिल गायकवाड, जीवित नदी संस्थेच्या शैलजा देशपांडे, बायोस्फिअर्सचे डॉ. सचिन पुणेकर, मिशन ग्राउंडवॉटरच्या वैशाली पाटकर, किर्लोस्कर ऑइल इंजिन लि. चे निनाद पाटील, केपीसीएलचे डॉ. सुरेश मिजार, जलदेवता सेवा अभियानचे शैलेंद्र पटेल आणि पराडकर फाउंडेशनचे जयप्रकाश पराडकर यांनी सहभाग घेतला.



या उपाययोजना केवळ रामनदीपुरत्या मर्यादित नसून शहरातील अन्य जलप्रवाह आणि पाणीसाठ्यांसाठी उपयुक्त आहेत, असे सांगून चित्राव म्हणाले, काही ठिकाणी नदीपात्रातून गाळ काढणे आवश्यक आहे. त्यामुळे नदीच्या प्रवाहाची क्षमता वाढेल आणि पुराची टोकाची पातळी कमी होईल. पाण्याच्या प्रवाहाची मूळच्या रुंदीइतकी पात्राची रुंदी वाढविल्यामुळे योग्य तेवढे पुराचे पाणी त्यातून वाहून जाऊ शकेल. नदीचे पात्र पुरेसे खोल करण्यामुळे तिला येऊन मिळणाऱ्या उपनद्या आणि ओढ्यांच्या पुराचे पाणी तिच्यामध्ये सामावून घेतले जाईल. नदीच्या पात्राच्या तळाचे नुकसान होऊ नये म्हणून जेसीबी यंत्राऐवजी स्पायडर यंत्राचा वापर करावा. पुराचा धोका टाळण्यासाठी आणि होणारे नुकसान टाळण्यासाठी नदीपात्रातील अतिक्रमणे हटविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कडक कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित आहे.

नैसर्गिक धोक्यांमुळे होणारे आर्थिक आणि सामाजिक नुकसान कमी करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांसह सर्व विभागांचा समावेश असलेली संरक्षण समिती तयार करावी. पुणे महापालिका, ग्रामपंचायत, सिंचन विभाग, स्वयंसेवी संस्था, नागरिकांचे गट, कंपन्या आणि सरपंच यांच्यामध्ये माहितीची देवाणघेवाण होऊन त्यानुसार अंमलबजावणी त्वरित सुरू करावी, अशा शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्यासाठी महापालिकेने एका समन्वयकाची नियुक्ती करून कृतिशील कार्यक्रम राबवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# हंगामी प्राध्यापकांना विद्यापीठाकडून मुदतवाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना विषाणू संसगाने उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये महाविद्यालयात हंगामी प्राध्यापकांची भरती प्रक्रिया नव्याने राबवता येत नसल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कार्यरत हंगामी प्राध्यापकांनाच एक वर्ष मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हंगामी प्राध्यापकांना दिलासा मिळाला आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी काही महाविद्यालयांना प्राध्यापकांच्या पदांना एका शैक्षणिक वर्षासाठी मान्यता देण्यात आली होती. मात्र करोनाच्या प्रादुर्भावामुळे नियुक्तीची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे या पदांना मुदतवाढ देण्याची मागणी महाविद्यालयांकडून करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने खास बाब म्हणून हंगामी प्राध्यापकांना मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची मान्यता घेतलेल्या, शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेल्या शिक्षकांनाच २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी नव्याने



दिलेले नियुक्ती आदेश, रुजू अहवाल आणि संस्थेच्या प्राध्यापक मान्यतेच्या मुदतवाढीच्या ठरावासह ३१ जुलैपर्यंत विद्यापीठाकडे पाठवणे आवश्यक आहे. तसेच ज्या पदांना विद्यापीठाची मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९-२०साठी घेतलेली नाही, अशी पदे भरताना संस्था किंवा महाविद्यालयाने प्राध्यापकांची पदे भरण्यासाठी विहित प्रक्रिया राबवणे बंधनकारक आहे. तसेच या प्राध्यापकनियुक्तीत काही कायदेशीर आणि आर्थिक समस्या उद्भवल्यास त्याला संस्था आणि महाविद्यालय जबाबदार असेल, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाच्या कुलसचिवांनी स्पष्ट केले आहे.

# 'घरमालकांनी भाडेकरूंना सक्ती करू नये'

लोकसत्ता प्रतिनिधी

**पिंपरी :** करोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे सर्वांचे आर्थिक गणित कोलमडले असल्याने गरीब आणि गरजू भाडेकरूंना घरमालकांनी भाडेदरासाठी सक्ती करू नये, असे आवाहन पिंपरीच्या महापौर माई ढोरे यांनी केले आहे.

पिंपरी-चिंचवड ही औद्योगिक आणि कामगारांची नगरी आहे. राज्यभरातून पोटापाण्यासाठी आलेले नागरिक शहरात वास्तव्य करत आहेत. टाळेबंदीमुळे सर्वांनाच आर्थिक चणचण जाणवते आहे. कष्टकऱ्यांना जगण्याची भ्रांत पडली आहे. अशा परिस्थितीत अनेकांना घराचे तथा इतर जागांचे भाडे देताना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागते आहे. घरमालकांनी संयम दाखवावा आणि तीन महिन्यांचे भाडे वसूल करताना सक्ती करू नये. टप्प्याटप्प्याने भाडे देण्याची सवलत भाडेकरूंना द्यावी. भाडेकरार संपलेल्या भाडेकरूंना बाहेर काढू नये. अशा अडचणीच्या काळात घरमालकांनी सहकार्याची भूमिका ठेवावी, असे आवाहन महापौरांनी प्रसिध्दीस दिलेल्या निवेदनाद्वारे केले आहे.

# पडद्यामागच्या कलाकारांना मदतीचा हात

## मोहन जोशी यांच्या 'मैत्री ट्रस्ट'तर्फे निधी सुपुर्द

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सध्याच्या कालखंडात संकटात सापडलेल्या पडद्यामागच्या कलाकारांना मदतीचा हात देत ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या 'मैत्री ट्रस्ट' तर्फे रंगभूमी सेवक संघाला निधी सुपुर्द करण्यात आला.

बालगंधर्व रंगमंदिराच्या आवारात झालेल्या कार्यक्रमात मोहन जोशी यांच्या हस्ते एक लाख रुपयांचा धनादेश रंगभूमी सेवक संघाचे अध्यक्ष सुरेंद्र गोखले आणि उपाध्यक्ष अरुण पोमण यांना देण्यात आला. जोशी यांनी यापूर्वी वैयक्तिक रीत्या ५० हजार रुपयांचे अर्थसाह्य केले आहे. 'मैत्री ट्रस्ट'चे विश्वस्त श्रीराम रानडे, राजन मोहाडीकर, नाट्य परिषद कोथरूड शाखेचे अध्यक्ष सुनील महाजन, महापालिका रंगमंदिराचे मुख्य व्यवस्थापक सुनील मते या वेळी उपस्थित होते.



'मैत्री ट्रस्ट'तर्फे मोहन जोशी यांच्या हस्ते रंगभूमी सेवक संघाचे सुरेंद्र गोखले यांना एक लाख रुपयांचा धनादेश सोमवारी प्रदान करण्यात आला. अरुण पोमण, राजन मोहाडीकर, सुनील महाजन आणि श्रीराम रानडे या वेळी उपस्थित होते.

गोखले म्हणाले, गेल्या तीन महिन्यांपासून नाटकाचे प्रयोग झालेले नाहीत. त्यामुळे पडद्यामागचे कलाकार आर्थिक अडचणीत आले आहेत. या रंगभूमी सेवकांचे घर चालण्यासाठी या निधीतून अन्नधान्याचा संच देण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात काही प्रमाणात थेट आर्थिक मदत देण्यात येईल.

**रंगभूमी बंद पडणार नाही**

अडचणीतून बाहेर येत रंगभूमी उभी करण्यासाठी अनेक मदतीचे हात लागणार आहेत. प्रत्येकाच्या मनात धास्ती असल्यामुळे अजून दोन महिने तरी नाटकाचे प्रयोग सुरू होतील असे वाटत नाही. पण, नवे लेखक आणि नवे कलाकार नवी नाटके घेऊन येतील. रंगभूमी बंद पडणार नाही, असा विश्वास मोहन जोशी यांनी व्यक्त केला.

# पीएमपी सेवकांच्या पगारावरून आंदोलनाचा इशारा



**पुणे :** करोना संसर्ग काळात पीएमपीच्या १० हजार कर्मचाऱ्यांना मासिक वेतन देणे आवश्यक असतानाही ते देण्यात आलेले नाही. सेवकांच्या वेतनाचा प्रश्न तातडीने निकाली काढावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू असतानाही त्याला प्रतिसाद देण्यात येत नाही. त्यामुळे हा प्रश्न लवकर सुटला नाही तर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा पीएमटी कामगार संघाने (इंटक) दिला आहे.

करोना संकटाच्या काळात पीएमपीच्या १० हजार कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार वेतन अदा करणे आवश्यक होते. मात्र ते करण्यात आलेले नाही. बदली सेवकांनाही एप्रिल २०२० पासून वेतन देण्यात आलेले नाही. सेवक आणि अधिकारी करोना संकटाच्या काळात कार्यरत असतानाही त्यांना कोणतेही सुरक्षा कवच देण्यात आले नाही. तसेच दवाखान्यातही सेवकांवर सवलतीच्या दरात उपचार होत नाहीत. या समस्यांसंदर्भात पीएमपीएमएल कामगार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी राज्याचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांना निवेदन दिले होते. यानंतर इंटकच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये इंटकचे सल्लागार आणि काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते गोपाळ तिवारी यांनी हा वेतनाचा तिढा न सुटल्यास आंदोलनाचा इशारा दिला.

पीएमपी संचालक मंडळाने तातडीने हा प्रश्न मार्गी लावावा, राज्यात बेस्ट आणि अन्य महापालिकांतील सार्वजनिक वाहतूक कामगारांबाबत एकच धोरण असावे, अशी मागणी या वेळी करण्यात आली.

# महापालिकेतील काँग्रेस गटनेतापदी आबा बागुल

## प्रदेश काँग्रेसकडून नियुक्ती पत्र

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** काँग्रेस पक्षाच्या महापालिकेतील गटनेतापदी ज्येष्ठ नगरसेवक, माजी उपमहापौर आबा बागुल यांची सोमवारी नियुक्ती करण्यात आली. प्रदेश काँग्रेसकडून त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. आबा बागुल यांच्याकडे दुसऱ्यांदा या पदाची जबाबदारी आली असून पक्षातील गटबाजी रोखण्याचे आव्हान आबा बागुल यांच्यापुढे आहे. दरम्यान, आबा बागुल यांच्या नियुक्तीमुळे गटनेता नियुक्तीच्या चर्चेलाही पूर्णविराम मिळाला आहे.

महापालिका निवडणुकीनंतर काँग्रेस गटनेतापदाची जबाबदारी अरविंद शिंदे यांच्याकडे देण्यात आली होती. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर गटनेता बदलण्याची चर्चा सुरू झाली. विधानसभा निवडणुकीसाठी आबा बागुल हे पर्वती विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. मात्र त्यांना संधी मिळाली नाही. प्रदेश काँग्रेसमध्ये बदल झाल्यानंतर प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी बाळासाहेब थोरात यांच्याकडे आली. त्या वेळी गटनेता म्हणून जबाबदारी दिली जाईल, असे बागुल यांना सांगण्यात आल्याची चर्चा काँग्रेसमध्ये होते. मात्र गटनेता पदासाठी पक्षात जोरदार गटबाजी दिसून येत होती. ज्येष्ठ नगरसेवक असूनही सातत्याने डावलण्यात आल्याची तक्रारही आबा बागुल यांनी बोलून दाखविली होती.

आबा बागुल हे गेल्या तीस वर्षांपासून नगरसेवक आहेत. उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेता, गटनेता अशा विविध पदांवर त्यांनी काम केले आहे. गटनेतापदाची पुन्हा जबाबदारी मिळाल्यामुळे त्यांच्यापुढे गटबाजी रोखण्याचे आणि पक्ष संघटन मजबूत करण्याचे आव्हान असणार आहे.

# कृषी आचार्य पदवी प्रवेश परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी १३ जुलैपर्यंत मुदत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील विविध विद्याशाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये आचार्य पदवी (पीएच.डी.) अभ्यासक्रमाची सामायिक प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. त्यासाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १३ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या शैक्षणिक वर्षात अंतिम पदव्युत्तर परीक्षा दिलेले विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र असतील. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थानिक शाखेत १७ जुलैपर्यंत परीक्षा शुल्क भरता येईल. ही परीक्षा २९ ऑगस्ट रोजी राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या मुख्यालयी केंद्रांवर होईल. संबंधित परीक्षा केंद्रावर करोना विषाणू प्रादुर्भाव आणि प्रसार टाळण्यासाठी कार्यप्रणालींचे पालन करणे बंधनकारक असेल.

परीक्षेसाठीचा अर्ज महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणे यांच्या http://www.mcear.org या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. परीक्षेसाठी संभाव्य पात्र आणि अपात्र उमेदवारांची यादी २७ जुलै रोजी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल. पात्र उमेदवारांना परीक्षा प्रवेशपत्र संकेतस्थळाद्वारे १९ ऑगस्टपासून प्रिंट करता येईल. तसेच परीक्षेची उत्तरसूची ८ सप्टेंबर आणि निकाल १० सप्टेंबरला संकेतस्थळाद्वारेच जाहीर करण्यात येईल, अशी माहिती परीक्षा मंडळाचे नियंत्रक डॉ. ए. पी. सूर्यवंशी यांनी दिली.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कॅटॅलिस्ट फाउंडेशनतर्फे राज्यस्तरीय ऑनलाइन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागासाठी वय, भाषा असे बंधन नसून स्पर्धा विनाशुल्क आहे.

स्पर्धकाने पाच मिनिटांमध्ये आपले मनोगत सादर करून दिनांक २६ जून २०२० पर्यंत ९८९०१६७२५४ किंवा ९०२८५३२१२३ या क्रमांकावर व्हॉट्स ॲपद्वारे पाठवावे. स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांसह तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रदान करण्यात येणार असून प्रत्येकी सहभागी व्यक्तीस प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या स्पर्धेत राज्यातील जास्तीत जास्त वक्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कॅटॅलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष सुनील माने यांनी केले आहे.

# स्राव चाचण्यांबाबत खासगी प्रयोगशाळांशी महापालिकेचा करार

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना चाचणीसाठी घशातील स्राव तपासण्यासाठी शहरातील खासगी प्रयोगशाळांबरोबर महापालिका करार करणार आहे. राज्य शासनाच्या २२०० रुपये प्रतिचाचणी या दरापेक्षाही कमी दरांत चाचणी करण्याचे करार होणार आहेत. या करारामुळे शहरातील चाचण्यांचे प्रमाण ५०० ने वाढणार असून करारांतर्गत चाचण्यांचा खर्च महापालिका करणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शेखर गायकवाड यांनी सोमवारी दिली.

गायकवाड यांनी दूरचित्रसंवादाद्वारे पत्रकारांना ही माहिती दिली. ते म्हणाले, करोना चाचणीसाठी घशातील प्रति स्राव नमुना तपासणीचा दर ५५०० रुपये होता. सरकारने त्यामध्ये कपात करून प्रतिचाचणी दर २२०० रुपयांपर्यंत आणला. या नव्या दरापेक्षाही कमी दरात चाचण्या करण्याबाबत महापालिकेकडून खासगी प्रयोगशाळांबरोबर बोलणी सुरू आहेत. खासगी प्रयोगशाळांनी २२०० पेक्षा कमी दरात चाचण्या करण्याची तयारी दर्शवली असून त्यांच्यासोबत महापालिका पुढील एक महिन्यासाठी करार करणार आहे. त्यानुसार चाचणीचे पैसे महापालिका देणार आहे. सध्या प्रतिदिवस सरासरी तीन हजार चाचण्या होत असून या करारानंतर त्यांच्या संख्येत ५०० ने वाढ होणार आहे. प्रशासनाकडून दर १५ दिवसांनी आढावा घेण्यात येत होता. रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता दर शुक्रवारी आढावा घेण्यात येणार आहे. २० टक्क्यांपेक्षा अधिक रुग्ण आढळून आल्यास संबंधित भाग तातडीने सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून निश्चित केला जाणार असल्याचे गायकवाड यांनी स्पष्ट केले.

**प्रतिबंधित क्षेत्राबाहेर ४० टक्के रुग्ण**

टाळेबंदीच्या तिसऱ्या टप्प्यापर्यंत रुग्ण सापडण्याचे प्रमाण केवळ १८ टक्के होते. शिथिलता आणल्यानंतर ४० टक्क्यांपर्यंत वाढले. त्यामध्ये झोपडपट्टीसह इतरही भाग आहे. शहरात दररोज सरासरी तीन हजारांपेक्षा अधिक चाचण्या होत आहेत. मात्र, नमुन्यांचे निदान होण्याचे प्रमाण चाचण्यांच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. त्यामुळे केलेल्या चाचण्यांचे २४ तासांत निदान होण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असेही गायकवाड यांनी स्पष्ट केले.

# अळिंबी संशोधन केंद्राचा गौरव

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** कृषी महाविद्यालयातील अळिंबी संशोधन केंद्राने सन २०१९-२० या वर्षात केलेल्या कामगिरीची दखल घेऊन महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट अळिंबी संशोधन केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

कृषी महाविद्यालयातील अखिल भारतीय समन्वित अळिंबी संशोधन प्रकल्पाद्वारे दरवर्षी विविध अळिंबीवर संशोधनपर प्रयोग घेण्यात येतात. याशिवाय केंद्रामार्फत शेतकरी आणि इतर इच्छुक व्यक्तींना धिंगरी, बटन व दुधी अळिंबी लागवड तंत्रज्ञान, अळिंबी बियाणे उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण देण्यात येते. संपूर्ण भारतात अशी अळिंबीवर संशोधन करणारी ३२ संशोधन केंद्र कार्यरत आहेत. या केंद्रांपैकी कृषी महाविद्यालयातील केंद्राने सन २०१९-२० मध्ये केलेल्या कार्याची दखल घेऊन संचालक, अळिंबी संशोधन संचालनालय, सोलन, हिमाचल प्रदेश यांच्यामार्फत या केंद्राला सर्वोत्कृष्ट अळिंबी संशोधन केंद्र या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

अळिंबी संशोधन प्रकल्पाचे केंद्र प्रमुख डॉ. अनिल गायकवाड, डॉ. अशोक जाधव, मिनौती ढवळे यांचे विद्यापीठातील सर्व अधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

## प्रसिद्धीसाठी दावा दाखल केल्याचे निरीक्षण; धर्मादाय संस्थेला फटकारून दंड

# अर्सोनिक अल्बम गोळ्यांवर बंदीचा दावा न्यायालयाने फेटाळला

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** अर्सोनिक अल्बम-३० या गोळ्यांचे वाटप करण्यास स्थगिती देण्याबाबत मानवाधिकार कायद्याअंतर्गत न्यायालयात दावा दाखल करणाऱ्या धर्मादाय संस्थेला न्यायालयाने फटकारले. सध्याच्या काळात संबंधित संस्थेने मानवाधिकाराच्या नावाने प्रसिद्धी मिळवण्यासाठी दावा दाखल केला तसेच न्यायालयाचा वेळ वाया घालवला, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. संबंधित संस्थेला फटकारून दहा हजार रुपये दंड भरण्याचे आदेश जिल्हा सत्र न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी नुकतेच दिले.



**दावा का फेटाळला**

'अर्सोनिक अल्बम-३० या गोळ्यांवर राज्य आरोग्य विभाग किंवा अन्य शासकीय संस्थेने बंदी घातलेली नाही. या गोळ्यांचा वापर प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी होत आहे. या गोळ्यांचे सेवन केल्याने कोणाला त्रास झाल्याचे पुरावे देखील नाहीत. करोनाचा संसर्गात न्यायालय फक्त तातडीच्या दाव्यांवर सुनावणी घेत आहे तसेच कैद्यांना जामीन देण्यात यंत्रणा व्यस्त आहे. अर्जदार संस्थेने केवळ प्रसिद्धीच्या हेतूने न्यायालयात दावा दाखल करून न्यायालयाचा वेळ वाया घालवला आहे', असे निरीक्षण न्यायाधीश नावंदर यांनी नोंदविले.

दंडाची रक्कम पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. चिंचवड येथील केअर ऑफ पब्लिक सेफ्टी या धर्मादाय संस्थेने पुणे महापालिकेचे आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याविरोधात मानव अधिकार संरक्षण अधिनियम १९९३ च्या कलम-३० अनुसार न्यायालयात दावा दाखल केला होता. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने होमिओपॅथी उपचार पद्धती फेटाळलेली आहे. कोविड-१९ च्या उपचारासाठी या उपचार पद्धतीचा वापर केला जात आहे. त्यामुळे अर्सोनिक अल्बम-३० या गोळ्यांच्या वाटपाला स्थगिती देण्यात यावी, अशी मागणी संबंधित संस्थेने न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यात केली होती.

या गोळ्यांचा वापर करण्याचे आवाहन नागरिकांना केले जात आहे. त्यामुळे औषध विक्री दुकानात या गोळ्यांच्या खरेदीसाठी गर्दी होत आहे. सामाजिक अंतर न पाळता दुकानात खरेदीसाठी गर्दी होत असल्याचे दाव्यात म्हटले होते. जिल्हा सत्र न्यायाधीश एस. आर. नावंदर यांच्यापुढे संबंधित दावा सुनावणीसाठी ठेवण्यात आला. न्यायालयाने संबंधित संस्थेचा दावा फेटाळून लावून न्यायालयाचा वेळ घालविल्याप्रकरणी दहा हजार रुपये दंड भरण्याचे आदेश दिले.

# ५८ हजार द्वितीय अपिले, तक्रारी प्रलंबित

## माहिती आयुक्तांची तीन पदे गेल्या दीड वर्षांपेक्षा अधिक काळ रिक्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राज्य माहिती आयोगाच्या पुणे, नाशिक आणि औरंगाबाद खंडपीठाच्या माहिती आयुक्तांची पदे गेल्या दीड वर्षांपेक्षा अधिक काळ रिक्त आहेत. परिणामी माहिती अधिकार अर्जावरील द्वितीय अपिले आणि तक्रारींची तब्बल ५८ हजार १८५ प्रकरणे आयोगापुढे प्रलंबित आहेत. ही प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी माहिती आयुक्तांची तीन रिक्त पदे भरण्यात यावी, तसेच आणखी तीन माहिती आयुक्तांची पदे निर्माण करण्याची मागणी अधिकार कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे.

राज्य मुख्य माहिती आयोगाचे कार्यालय मुंबई येथे आहे. राज्याचे माजी मुख्य सचिव सुमीत मलिक हे मुख्य माहिती आयुक्त आहेत. पुणे, बृहन्मुंबई, कोकण, नाशिक, अमरावती, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांचा कारभार मुख्य माहिती आयुक्तांच्या अखत्यारित चालतो. त्यापैकी पुणे, नाशिक आणि औरंगाबाद या तीन खंडपीठांवरील माहिती आयुक्तांची पदे गेल्या दीड वर्षांपासून रिक्त आहेत. या रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य खंडपीठांच्या माहिती आयुक्तांकडे देण्यात आला आहे. त्यामुळे सर्वच खंडपीठांपुढील प्रलंबित द्वितीय अपिले आणि तक्रारींची संख्या वाढत आहे. याबाबत एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयानेही माहिती आयोगापुढील प्रलंबित प्रकरणांची वाढती संख्या लक्षात घेता, राज्य सरकारने माहिती आयुक्तांची तीन रिक्त पदे भरण्याची आणि अतिरिक्त तीन माहिती आयुक्त पदे निर्माण करण्याची गरज व्यक्त केली होती. रिक्त होणारी पदे आणि भरती प्रक्रिया यांत अधिक कालावधी असू नये, असेही न्यायालयाने नमूद केले आहे. त्यामुळे राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांची पूर्तता करत रिक्त पदांवर तातडीने तीन माहिती आयुक्त नेमावेत, तसेच तीन पदे निर्माण करावी, अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

याबाबत केंद्रीय माहिती आयोगाचे माजी माहिती आयुक्त शैलेश गांधी, माहिती अधिकार कट्ट्याचे संस्थापक विजय कुंभार, सजग नागरिक मंचचे विवेक वेलणकर आणि जुगल राठी यांच्यासह विनिता देशमुख, एस. के. नांगिया, भास्कर प्रभू, मोहम्मद अफजल या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री ठाकरे यांना पत्र पाठवले आहे.

**खंडपीठनिहाय प्रलंबित प्रकरणे**

| खंडपीठ | द्वितीय अपिले | तक्रारी | एकूण |
|---|---|---|---|
| मुख्य माहिती आयुक्त | ७२२९ | १२८२ | ८५११ |
| मुंबई | ४३५५ | ३९२ | ४७४७ |
| कोकण | ३६८८ | ६९८ | ४२७५ |
| पुणे | १३,५४७ | ५८७ | १४,१३४ |
| औरंगाबाद | ५४८१ | २२६७ | ७७४८ |
| नाशिक | ५९३२ | ६०३ | ६५३५ |
| नागपूर | २२२७ | ७४७ | २९७४ |
| अमरावती | ८७७६ | ३७४ | ९१५० |
| एकूण | ५१,२३५ | ६९५० | ५८,१८५ |

# ‘पेटीएम ॲप’अद्ययावत करण्याच्या बतावणीने फसवणुकीचे सत्र

## बिबवेवाडीतील आणखी एकाला गंडा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** ‘पेटीएम ॲप’अद्ययावत करण्याच्या बतावणीने फसवणुकीचे सत्र कायम आहे. बिबवेवाडी भागातील एकाकडे बतावणी करून चोरट्यांनी त्यांच्या खात्यातून ४३ हजार ९९८ रुपयांची रोकड लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला. गेल्या दोन दिवसांत बिबवेवाडीत दोन ज्येष्ठ नागरिकांची अशा पद्धतीने फसवणूक करण्यात आल्याची घटना घडली.

याबाबत योगेश शहा (वय ५५, रा. बिबवेवाडी) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार एका मोबाइल धारकाविरोधात फसवणूक तसेच माहिती-तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चार महिन्यांपूर्वी अज्ञाताने शहा यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. त्या वेळी अज्ञाताने त्यांना मोबाइलवर संदेश पाठविला होता. पेटीएम ॲप बंद पडणार असून तातडीने काही माहिती द्यावी लागेल, अशी बतावणी त्यांच्याकडे करण्यात आली होती. शहा यांनी चोरट्याला प्रतिसाद दिला. त्यानंतर चोरट्याने शहा यांना क्विक सपोर्ट ॲप डाउनलोड करावे लागेल, असे सांगितले. चोरट्याने केलेल्या बतावणीवर विश्वास ठेवून शहा यांनी हे ॲप डाउनलोड केले.

शहा यांच्या बँक खात्यातून चोरट्याने वेळोवेळी ४३ हजार ९९८ रुपये काढून घेतले. पैसे काढून घेतल्याचे उघड झाल्यानंतर त्यांनी सायबर गुन्हे शाखकडे अर्ज दिला. या प्रकरणी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला. गेल्या दोन दिवसांत चोरट्यांनी बिबवेवाडी भागातील दोन ज्येष्ठ नागरिकांकडे पेटीएम ॲपबाबत बतावणी करून त्यांना गंडा घातल्याचे प्रकार उघडकीस आले होते. बिबवेवाडीतील आणखी एका व्यक्तीला चोरट्यांनी गंडविले असून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले तपास करत आहेत.

**चोरट्यांना प्रतिसाद देऊ नका**

दोन दिवसांत बिबवेवाडीतील दोन ज्येष्ठ नागरिकांना पेटीएम अद्ययावत करण्याच्या बतावणीने चोरट्यांनी गंडा घातल्याचा प्रकार उघडकीस आला. तीन महिन्यांपूर्वी पेटीएम ॲप अद्ययावत करण्याची बतावणी करणारे संदेश अनेक मोबाइलधारकांना पाठविण्यात आले होते. त्या वेळी अनेकांची फसवणूक झाली होती. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हे शाखेने चोरट्यांच्या बतावणीवर विश्वास ठेवू नका तसेच त्यांना प्रतिसाद देऊ नका, असे आवाहन केले आहे.

# प्राधिकरणात चिनी बनावटीच्या वस्तूंची होळी

## भाजपचे आंदोलन



निगडी प्राधिकरणात भाजपच्या वतीने चिनी बनावटीच्या वस्तू जाळण्यात आल्या.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** चीनच्या भ्याड आणि विश्वासघातकी कृत्याचा निषेध करून शहर भाजपच्या वतीने सोमवारी निगडीत चिनी बनावटीच्या वस्तूंची होळी करण्यात आली.

प्राधिकरणातील भेळ चौकात झालेल्या या आंदोलनात चीनच्या राष्ट्राध्यक्षांची प्रतिमा जाळण्यात आली. ‘अ’ प्रभागाच्या अध्यक्षा शर्मिला बाबर, माजी महापौर आर. एस. कुमार, माजी उपमहापौर शैलजा मोरे, मंडलाध्यक्ष विजय सिनकर, राजेंद्र बाबर, अनूप मोरे आदी पदाधिकारी आंदोलनात सहभागी झाले होते. या वेळी चिनी बनावटीच्या वस्तूंची होळी करण्यात आली. तसेच चीनच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.

# व्यापारी वर्गाने जागेच्या समस्येबाबत प्रशासनाकडे प्रस्ताव द्यावा

## डॉ. दीपक म्हैसेकर यांची सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** शहराच्या मध्यभागातील बाजारपेठेचे स्थलांतर करणे तसेच प्रदर्शन केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शहरातील व्यापारी वर्गाकडून मागणी करण्यात आली आहे. याबाबत पुणे शहर व्यापारी महासंघाने सोमवारी विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर यांना निवेदन दिले. व्यापारी वर्गाने जागेची अडचण, समस्यांबाबतचा प्रस्ताव प्रशासनाकडे सादर करावा, अशी सूचना डॉ. म्हैसेकर यांनी केली.

समभागधारकांनी नोंद घ्यावी की आयइपीएफ अधिकाऱ्यांकडे हस्तांतरित झालेले न मागणी केलेले लाभांश आणि समभाग दोन्ही आयइपीएफ अधिकाऱ्यांकडून नियमात दिलेल्या विहीत प्रक्रियेनंतर परत मागता येतील.

कोणत्याही चौकशीसाठी भागधारकांना विनंती की त्यांनी कंपनीशी **पर्सिस्टंट सिस्टिम्स लिमिटेड, कॉर्पोरेट सेक्रेटेरियल डिपार्टमेंट, भगीरथ, ४०२ सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६, भारत येथे संपर्क साधावा. दूरध्वनि क्र. +९१ (२०) ६७०३ ००००,** इ-मेल : investors@persistent.com

**पर्सिस्टंट सिस्टिम्स लिमिटेड** करिता
अमित अत्रे
कंपनी सचिव
ICSI सभासदत्व क्रमांक : ACS २०५०७

ठिकाण : पुणे
दिनांक : २२ जून २०२०

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८

### वृक्षसंवर्धन विभाग
### ई-निविदा नोटिस क्रमांक - ०१/२०२०-२०२१

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडील वृक्षारोपणासाठी कर्मचारी ई-टेंडर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा र. रु. | बयाणा रक्कम रु. | अनामत रक्कम रु. | कामाची मुदत | निविदा फॉर्म फी (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अ व फ क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्या अनुषंगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ९,१४,१२०/- | ९१४१/- | ४५७०६/- | ४ महिने | १६५८/- |
| २. | क व ई क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्या अनुषंगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ९,१४,१२०/- | ९१४१/- | ४५७०६/- | ४ महिने | १६५८/- |
| ३. | ब व ग क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्या अनुषंगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ९,१४,१२०/- | ९१४१/- | ४५७०६/- | ४ महिने | १६५८/- |
| ४. | ड व ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रामध्ये वृक्षारोपण करणे व त्या अनुषंगिक कामे करणेकरीता मजुर कर्मचारी पुरविणे | ९,१४,१२०/- | ९१४१/- | ४५७०६/- | ४ महिने | १६५८/- |

| निविदेचे वेळापत्रक | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक २३/०६/२०२० ते २९/०६/२०२० |
| निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक २९/०६/२०२० दुपारी ३.०० पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक ०३/०७/२०२० दु. ३.०० वा.(शक्य झाल्यास) |

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य/उद्यान यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरु राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१) सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
**कार्यकारी अभियंता, स्थापत्य/उद्यान**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

जाहिरात क्र.
क्रमांक :- उद्यान/ ४कावि/२४१/२०२०
दिनांक :- १८/६/२०२०

## equitas — इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

(पूर्वीची इक्विटास फायनान्स लि)
**नोंदणीकृत कार्यालय:** क्र. 769, स्पेन्सर प्लाझा, चौथा मजला, फेज-II, अन्ना सलाई, चेन्नई, तामिळनाडू-600002. # 044-42995000, 044-42995050

**मागणी सूचना**
**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल असेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 मधील अनुच्छेद 13(2) अंतर्गत सूचना**

याद्वारे सूचित करण्यात येते की पुढील कर्जदारांनी इक्विटास हाउसिंग फायनान्स लिमिटेड (ईएचएफएल)/इक्विटास फायनान्स लिमिटेड (ईएफएल) /इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि. यांचेकडून कर्जे घेतलेली आहेत. दरम्यान, माननीय उच्च न्यायालय, मद्रास यांनी 2016 च्या सीपी क्र. 119 ते 121 मध्ये आपल्या दि. 06-06-2016 रोजीच्या आदेशान्वये मंजूर केलेल्या एकत्रीकरण योजनेनुसार मे. इक्विटास हाउसिंग फायनान्स लिमिटेड चे मे. इक्विटास फायनान्स लिमिटेड शी एकत्रीकरण झाले आहे. सदर एकत्रीकरणाच्या अनुषंगाने इक्विटास हाउसिंग फायनान्स लिमिटेड चे सर्व अधिकार व दायीत्वे आता इक्विटास फायनान्स लिमिटेड यांना प्राप्त झाले आहेत. याशिवाय याद्वारे आपणांस असेही सुचित करण्यात येते की कंपनी निबंधक, चेन्नई यांनी जारी केलेल्या प्रमाणपत्रानुसार मे. इक्विटास फायनान्स लिमिटेड चे नाव बदलून मे. इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड असे करण्यात आले होते आणि भारतीय रिझर्व्ह बँकेने दि. 30-06-2016 रोजी बँकिंग व्यवसाय सुरु ठेवण्यासाठी इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांना एक परवाना जारी केला होता. सदर कर्जदार आपल्या कर्जाच्या मासिक हप्त्यांची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार त्यांची कर्जे अनुत्पादक मत्ता म्हणून वर्ग करण्यात आलेली आहेत. सदर कर्जदारांनी खाली वर्णन केलेल्या अचल मालमत्ता अनामत म्हणून देऊ केलेल्या आहेत. कर्जाचे तपशील आणि कर्जदारांना आज दिनांकास ईएसएफबी यांना देणे असलेली थकबाकीसुद्धा खाली देण्यात आलेली आहे. कर्जदार तसेच सर्व लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की ईएसएफबी म्हणजे सुरक्षित धनकोचे प्राधिकृत अधिकारी म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल असेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, 2002 (SARFAESI अधिनियम) च्या तरतुदींतर्गत पुढील कर्जदारांविरुद्ध कारवाई सुरु केलेली आहे. पुढील कर्जदारांनी खाली त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या थकबाकी रकमांची सदर सूचनेच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत परतफेड न केल्यास निम्नस्वाक्षरीकार SARFAESI अधिनियमाच्या अनुच्छेद 13 च्या उप-विभाग (4) अंतर्गत सुरक्षित धनकोस बहाल करण्यात आलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही एका किंवा अनेक अधिकारांचा वापर करेल ज्यात सदर मालमत्तांचा ताबा घेणे आणि त्यांची विक्री करणे यांचाही समावेश असेल. सर्व लोकांना याद्वारे सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये.

| कर्जदार/जामीनदार यांचे नाव (शाखेचे नाव) | मागणी सूचनेचा दिनांक व रक्कम | अनामत मत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) |
|---|---|---|
| शाखा: शिवाजी नगर<br>क.क्र.: VLPHPUNE0000384<br>कर्जदार: 1. श्रीमती मंगल माधवराव शिंदे सह-कर्जदार: 2. श्री शिवराज मल्हार शिंदे, 3. श्रीमती वैशाली शिवराज शिंदे, 4. श्री युवराज मल्हार शिंदे | 10-01-2020 आणि रु. 5,63,223/- | दुकान क्र. 2, एकुण क्षेत्रफळ सुमारे 120 चौ.फू., तळ मजला, सीटीएस क्र. 206 व 207, गावठाण परिसर, पुणे महानगर पालिका, कोथरुड गाव, ता. हवेली, जि. पुणे यात सद्य व भावी अशा सर्व प्रकारच्या जमिनीवर करण्यात आलेल्या आणि जमिनीला चिकटून असलेल्या कशाशीही कायमस्वरूपी जोडलेल्या संरचनांचा तसेच संबंधित असलेल्या सर्व प्रकारच्या वहिवाट/मामूल अधिकारांचा समावेश असून चतु:सीमा याप्रमाणे आहेत: पूर्वेस: कॉर्पोरेशन रस्ता, दक्षिणेस: सदर इमारतीचा उर्वरित भाग, पश्चिमेस: मोकळी जागा, उत्तरेस: दुकान क्र. 1. |
| शाखा: आकुर्डी<br>क.क्र.: EMFPUNE0006877<br>कर्जदार: 1. श्री रमेश आनंद पिल्ले सह-कर्जदार: 2. श्रीमती एस पद्मा आनंद पिल्ले | 20-01-2020 आणि रु. 23,35,908/- | सदनिका क्र. 102, पहिला मजला, तुळजाई हेरीटेज, क्षेत्रफळ सुमारे 661 चौ.फू., सर्व्हे क्र. 13, हिस्सा क्र. 1ए/3/2, मामुर्डी गाव, तालुका हवेली आणि जिल्हा पुणे. उत्तरेस: सर्व्हे क्र. 13, हिस्सा क्र. 1बी/2 ची उर्वरित मालमत्ता, दक्षिणेस: 15 फुटी रस्ता, पूर्वेस: श्री परमेश्वर ढोंगरे यांची मालमत्ता, पश्चिमेस: श्रीमती कुसुम विठ्ठल गायकवाड यांची मालमत्ता. क्षेत्रफळ सुमारे 661 चौ.फू., उप-नोंदणी जिल्हा एसआरओ हवेली आणि नोंदणी जिल्हा पुणे. |

**स्थान :** पुणे, महाराष्ट्र
**दिनांक :** 23.06.2020

**प्राधिकृत अधिकारी**
**इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.**

## KIRLOSKAR INDUSTRIES LIMITED

A Kirloskar Group Company
**CIN No.:** L70100PN1978PLC088972
**Regd. Office:** Office No. 801, 8th Floor, Cello Platina, Fergusson College Road, Shivajinagar, Pune 411 005 (India)

Enriching Lives

**EXTRACT OF STANDALONE & CONSOLIDATED UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED 31 MARCH 2020**

(₹ in Lakhs)

| Sr. No. | Particulars | STANDALONE | | | CONSOLIDATED | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter Ended 31/03/2020 Audited | Quarter Ended 31/12/2019 Unaudited | Year Ended 31/03/2020 Audited | Quarter Ended 31/03/2020 Audited | Quarter Ended 31/12/2019 Unaudited | Year Ended 31/03/2020 Audited |
| 1 | Total Income | 3,159 | 862 | 8,609 | 47,981 | 46,357 | 1,93,005 |
| 2 | Net Profit (+)/ Loss (-) for the period (Before tax, Exceptional and / or Extraordinary items) | 2,469 | 383 | 6,492 | 8,185 | 3,819 | 19,991 |
| 3 | Net Profit (+)/ Loss (-) for the period before tax (after Exceptional and / or Extraordinary items) | 2,469 | 383 | 6,492 | 8,185 | 3,819 | 19,991 |
| 4 | Net Profit(+)/ Loss(-) for the period after tax (after Exceptional and / or Extraordinary items) | 2,351 | 319 | 5,945 | 6,687 | 2,652 | 15,063 |
| 5 | Total Other Comprehensive Income | (24,017) | (7,101) | (39,639) | (24,040) | (7,102) | (39,764) |
| 6 | Total Comprehensive Income [ Comprising Profit (after tax) and Other Comprehensive Income (after tax) for the period] | (21,666) | (6,782) | (33,694) | (17,353) | (4,450) | (24,701) |
| 7 | Paid-up Equity Share Capital | 971 | 971 | 971 | 971 | 971 | 971 |
| 8 | Earnings per share (for continuing and discontinuing operations) (of ₹10/- each) (not annualised): | | | | | | |
| | Basic | 24.21 | 3.29 | 61.23 | 40.02 | 15.62 | 98.77 |
| | Diluted | 24.21 | 3.29 | 61.23 | 39.98 | 15.60 | 98.68 |

Notes:
1 The above results are reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company in their respective meetings held on 22 June 2020 and a Limited Review of the same has been carried out by the Statutory Auditors of the Company.
2 The above is an extract of the detailed format of Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure requirements) Regulations, 2015. The full format of Financial Results are available on the Company's and Stock Exchange websites.(www.kil.net.in, www.bseindia.com and www.nseindia.com).

For **KIRLOSKAR INDUSTRIES LIMITED**

Sd/-
**Atul Kirloskar**
Chairman
DIN 00007387

Place : Pune
Date : 22 June 2020

• Tel: +91 20 2970 4374 • Fax: +91 20 2970 4374
• Email: investorrelations@kirloskar.com • Website: www.kil.net.in

*"Mark bearing word 'Kirloskar' in any form as a suffix or prefix is owned by Kirloskar Proprietary Limited and Kirloskar Industries Limited is the Permitted User"*

# आधुनिक जगाचा इतिहास

## यूपीएससीची तयारी

श्रीकांत जाधव







**आजच्या लेखामध्ये** आपण २० व्या शतकातील आधुनिक जगाच्या इतिहासातील महत्त्वाच्या घडामोडींची विस्तृत चर्चा करून गतवर्षीच्या परीक्षांमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांसह या घटकाची तयारी करण्यासाठी कोणते संदर्भ साहित्य वापरावे याचाही आढावा घेणार आहोत.

मागील परीक्षांमध्ये विचारण्यात आलेले काही प्रश्न व या प्रश्नांची उकल करण्यासाठी लागणारा दृष्टिकोन

- आर्थिक महामंदीशी सामना करण्यासाठी कोणत्या धोरणात्मक साधनांचा वापर करण्यात आलेला होता?
- कोणत्या घटनांमुळे १९५६ मधील सुवेझ संकट निर्माण झालेले होते? याने कशाप्रकारे ब्रिटनच्या स्वयंकित जागतिक सत्तेच्या प्रतिमेवर शेवटचा प्रहार केला?
- कोणत्या मर्यादेपर्यंत जर्मनीला दोन जागतिक महायुद्धांसाठी जबाबदार धरले जाऊ शकते? समीक्षात्मक चर्चा करा.
- पश्चिमी आफ्रिकेतील वसाहतविरोधी संघर्षचे नेतृत्व पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्या नव अभिजन वर्गाने केले होते. परीक्षण करा.
- मलाया द्वीपकल्प निर्वसाहतीकरण प्रक्रियेसाठी कोणकोणत्या समस्या सुसंगत होत्या?
- २०१८ आणि २०१९ मध्ये या घटकावर थेट प्रश्न विचारण्यात आलेला नाही.

उपरोक्त प्रश्न हे संकीर्ण आणि विश्लेषणात्मक या दोन्ही माहितीचा एकत्रित आधार घेऊन विचारण्यात आलेले आहेत. यातील आर्थिक महामंदीशी संबंधित प्रश्न सोडविताना आपणाला आर्थिक धोरणांचा मुखत्वे विचार करावा लागतो. ही धोरणे नेमकी कोणती होती आणि या धोरणांच्या परिणामस्वरूप नेमके काय साध्य झालेले होते, अशापद्धतीने माहिती असावी लागते. तसेच या प्रश्नाचे स्वरूप संकीर्ण प्रकारात अधिक मोडणारे आहे म्हणून येथे फक्त धोरणाची माहिती नमूद करून उत्तर लिहिणे अपेक्षित आहे. यातील पश्चिमी आफ्रिकेतील वसाहतविरोधी संघर्षाचे नेतृत्व पाश्चिमात्य शिक्षण घेतलेल्या नव अभिजन वर्गाने केलेले होते. परीक्षण करा. हा प्रश्न व्यक्तिविशेष प्रकारात मोडणारा आहे आणि या देशातील महत्त्वाच्या व्यक्ती व त्यांची नावे व कार्य आणि विचारसरणी व कशा पद्धतीने यांनी नेतृत्व केलेले होते. या सर्व पैलूंचा आधार घेऊन या प्रश्नाचे उत्तर लिहिणे अपेक्षित होते. अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर प्रश्न विचारण्यात आलेले नाहीत. म्हणून या विषयाचा सर्वांगीण आणि सखोल अभ्यास करून परीक्षेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी तयारी करणे गरजेचे आहे. यासाठी उपरोक्त चर्चेचा फायदा होऊ शकतो.

**या घटकाचे परीक्षाभिमुख आकलन खालील पद्धतीने करणे उपयुक्त ठरू शकते.**

- या कालखंडात ज्या महत्त्वाच्या घटना घडलेल्या होत्या त्याला तत्कालीन कारणाबरोबरच मागील दोन शतकातील म्हणजेच १८ व्या आणि १९ व्या शतकात घडलेल्या काही महत्त्वपूर्ण घटनांची पार्श्वभूमी होती. विशेषकरून युरोपमध्ये घडणाऱ्या घटनांचा प्रभाव हा संपूर्ण जागतिक व्यवस्थेवर होत असे. कारण २० व्या शतकातील साम्राज्यवादी सत्ता या युरोपमधील होत्या आणि त्यांच्या वसाहती आफ्रिका आणि आशिया खंडात होत्या.
- १९ व्या शतकात झालेल्या युरोपातील काही महत्त्वाच्या घडामोडी उदा. इटलीचे एकीकरण, जर्मनीचे एकीकरण, राष्ट्रवादाचा उदय, पूर्वेकडील प्रश्न, बर्लिन परिषद आणि आफ्रिका खंडाची साम्राज्यवादी सत्ता यामध्ये झालेली विभागणी, आणि युरोपातील विविध राष्ट्रांमध्ये स्थापन झालेल्या मैत्रीपूर्ण युती अथवा करार (Alliances) आणि याद्वारे केले जाणारे राजकारण, त्याचबरोबर अमेरिका, जपान या राष्ट्रांची ध्येयधोरणे इत्यादीची माहिती असल्याखेरीज २० व्या शतकातील अर्थात सुरवातीपासून या शतकाच्या मध्यापर्यंतच्या महत्त्वाच्या घडामोडी योग्य पद्धतीने समजून घेता येणार नाहीत. मैत्रीपूर्ण युती अथवा करार, राष्ट्रवादी विचारसरणीचा वाढता प्रभाव, आक्रमक लष्करवाद, साम्राज्यवादी प्रतिस्पर्धा, बाल्कन युद्धे तसेच तत्कालीन कारणे या काही महत्त्वाच्या कारणांमुळे पहिल्या जागतिक महायुद्धाची १९१४ साली सुरुवात झाली व हे युद्ध १९१८ मध्ये समाप्त झाले.
- यानंतर पॅरिस शांतता परिषेदतील विविध करारानुसार पराभूत राष्ट्रांवर अनेक अटी लादण्यात आल्या आणि यामध्ये जर्मनी हे महत्त्वाचे पराभूत राष्ट्र होते व जर्मनीला या युद्धासाठी जबाबदार धरण्यात आले. तसेच या परिषदेमध्ये राष्ट्रसंघाची (League of Nations) स्थापना करण्यात आली होती. तिचा मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय स्तरवरील विवाद सोडविणे हा होता, याच दरम्यान रशियन क्रांती होऊन सोव्हिएत युनियनची स्थापन झालेली होती आणि या क्रांतीवर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. या विचारसरणीचा वाढता प्रभाव, दोन जागतिक महायुद्धांमधील जग, इटली मधील फॅसिझम आणि जर्मनीमधील नाझीझम, राष्ट्रसंघ आणि राष्ट्रसंघाचे कार्य आणि राष्ट्रसंघाचे अपयश, जागतिक आर्थिक महामंदी, अरब राष्ट्रवाद, युरोपमधील हुकूमशाहीचा उदय आणि अंत, ब्रिटिशांचे तुष्टीकरण धोरण व याचे परिणाम, दुसऱ्या जागतिक महायुद्धाची महत्त्वाची कारणे व याचा परिणाम, दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरचे जग, यामध्ये आशिया आणि आफ्रिकेमधील निर्वसाहतीकरण व यामधून उदयाला आलेली नवीन राष्ट्रे व अलिप्ततावादी चळवळ, चीनची क्रांती, भांडवलशाही व समाजवादी विचारसरणीचा प्रभाव व अमेरिका आणि सोव्हिएत युनियन या दोन महासत्तांचा उदय व या दोन महासत्तांमध्ये जगाची विभागणी, शीतयुद्धाची सुरुवात आणि या काळातील महत्त्वाच्या घटना, १९८९ मधील सोव्हिएत युनियनचे विघटन व याची कारणे, पश्चिम व पूर्व जर्मनीचे १९९१ मध्ये झालेले एकत्रीकरण व अमेरिकेचा एकमेव जागतिक महासत्ता म्हणून झालेला उदय इत्यादी महत्त्वाच्या घडामोडींची योग्य माहिती असणे गरजेचे आहे. अशा प्रकारे या घटकांची सर्वप्रथम मूलभूत माहिती करून घ्यावी लागते, ज्यामुळे या विषयाची समज व्यापक होण्यास मदत होते.

या घटकाची मूलभूत तयारी करण्यासाठी एनसीईआरटीची इयत्ता ९ वी ते १२ वीच्या शालेय पुस्तकांचा आधार घेता येतो. तसेच या घटकाचा अधिक सखोल पद्धतीने अभ्यास करण्यासाठी राजन चक्रवर्ती लिखित 'अ हिस्ट्री ऑफ दी मॉडर्न वर्ल्ड', अर्जुन देव लिखित 'हिस्ट्री ऑफ दी मॉडर्न वर्ल्ड' आणि नॉर्मन लोवे लिखित 'मास्टररिंग मॉडर्न वर्ल्ड हिस्ट्री' या महत्त्वाच्या संदर्भ साहित्याचा वापर करावा.

## नोकरीची संधी

सुहास पाटील
suhassitaram@yahoo.com

**बारावी उत्तीर्ण** पुरुष अविवाहित उमेदवारांना डिफेन्समध्ये लेप्टनंट पदावर भरती होण्याची संधी, युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशन ६ सप्टेंबर २०२० रोजी एनडीएच्या आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्स विंग्जमधील १४६वा कोर्स आणि १०८ वा इंडियन नेव्हल अकॅडमी कोर्स (INAC) साठी नॅशनल डिफेन्स अकॅडमी अ‍ॅण्ड नेव्हल अकॅडमी एक्झामिनेशन (II) २०२० ही प्रवेश परीक्षा घेणार आहे.

प्रवेश क्षमता ४१३ पदे.

नॅशनल डिफेन्स अकॅडमी ३७० जागा (आर्मी – २०८, नेव्ही – ४२ आणि एअरफोर्स – १२० (यात ग्राउंड ड्युटीसाठीच्या २८ पदांचा समावेश आहे.) नेव्हल अकॅडमी (१०+२ कॅडेट एन्ट्री स्कीम – ४३ जागा.) परीक्षा केंद्र रू. मुंबई, नागपूर पणजी, इ.

**पात्रता –** आर्मी विंग एनडीएसाठी – १२ वी उत्तीर्ण (कोणतीही शाखा)

एनडीएमधील एअरफोर्स आणि नेव्हल विंग्ज आणि नेव्हल अकॅडमीमधील १०+२ कॅडेट एन्ट्रीसाठी – १२वी (फिजिक्स केमिस्ट्री आणि गणित विषयांसह) उत्तीर्ण. (१२वीच्या परीक्षेला बसणारे उमेदवारसुद्धा अर्ज करण्यास पात्र आहेत.)

**वयोमर्यादा —** उमेदवाराचा जन्म दि.२ जानेवारी २००२ ते १ जानेवारीपर्यंत २००५ दरम्यानचा असावा.

**शारीरिक मापदंड –** उंची – एअरफोर्ससाठी १६२.५ सें.मी. ; इतरांसाठी – १५७ सें.मी. ;

वजन उंचीच्या प्रमाणात ; दृष्टी चष्म्याशिवाय – ६/६, ६/९ ; चष्म्यासह – ६/६ ,६/६.

इच्छुक उमेदवारांनी शारीरिक तंदुरुस्तीकरिता पुढील सराव ठेवावा रू – (ए) २.४ कि.मी अंतर १५ मिनिटांत धावणे, (बी) स्किपिंग, (सी) पुशअप्स आणि सिटअप्स (किमान २० प्रत्येकी), (डी) चिनअप्स किमान ६, (इ) रोप क्लाइम्बिंग – ३ ते ४ मीटर

**परीक्षा पद्धती —** ओएमआर शीटवर उत्तरे काळ्या बॉल पॉइंट पेननेच मार्क करायची आहेत.

(ए)लेखी परीक्षा – वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची, (१) मॅथेमॅटिक्स कालावधी अडीच तास, गुण ३०० (२) जनरल अ‍ॅबिलिटी टेस्ट कालावधी अडीच तास, गुण ६०० (जनरल अ‍ॅबिलिटी – पार्ट–ए . इंग्लिश–२०० गुण, पार्ट–बी – जनरल नॉलेज – ४०० गुण (फिजिक्स–१०० गुण ; केमिस्ट्री–६० गुण ; जनरल सायन्स–४० गुण ; इतिहास, स्वातंत्र्य चळवळ (समाजशास्त्र) – ८० गुण ; जिओग्राफी–८० गुण आणि चालू घडामोडी –४० गुण; यांवर आधारित). प्रत्येक चुकीच्या उत्तराला प्रश्नास असलेल्या गुणांच्या १/३ गुण वजा केले जातील. लेखी परीक्षेचा निकाल डिसेंबर २०२० मध्ये लागेल.

(बी) सायकॉलॉजिकल अ‍ॅप्टिट्यूड टेस्ट आणि इंटेलिजन्स टेस्ट – या टेस्ट ४ दिवस चालतील.

एस.एस.बी/ मुलाखत एकूण – ९०० गुण

**अर्जाचे शुल्क –** १००/– (अजा/अज उमेदवारांना फी माफ). पे बाय कॅशने फी भरण्याची अंतिम दिनांक ५ जुलै २०२०

**प्रशिक्षण —** आर्मी, नेव्ही आणि एअरफोर्ससाठी निवडलेल्या उमेदवारांना ३ वर्षांचे प्रिलिमिनरी ट्रेनिंग एनडीए, पुणे येथे दिले जाईल. आणि इंडियन नेव्हल अकॅडमीसाठी निवडलेल्या उमेदवारांना इझिमाला, केरळ येथे ४ वर्षांच्या ट्रेनिंगसाठी पाठविले जाईल. ट्रेनिंग यशस्वीरीत्या पूर्ण केलेल्या (अ) आर्मी कॅडेट्सना बी.एससी/बी.एससी. (कॉम्प्युटर)/बी.ए., (ब) नेव्हल कॅडेट्सना – बी.टेक.डिग्री. (क) एअरफोर्स कॅडेट्सना – बी.टेक/बी.एस्सी/बी.एस्सी (कॉम्प्युटर) पदव्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाकडून दिल्या जातील.

एनडीएमधून उत्तीर्ण आर्मी कॅडेट्सना – इंडियन मिलिटरी अकॅडमी (आयएमए), डेहराडून येथे (१ वर्षाचे ट्रेनिंग); नेव्हल कॅडेट्सना इंडियन नेव्हल अकॅडमी इझिमाला येथे (१ वर्षाचे ट्रेनिंग)आणि एअरफोर्स कॅड्ेसना एअरफोर्स अकॅडमी हैद्राबाद येथे दीड वर्षाचे ट्रेनिंग दिले जाईल.) ट्रेनिंग यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या जेंटलमेन कॅडेट्सना आर्मीमध्ये लेफ्टनंट पदावर, नेव्हल कॅड्ेसना सबलेफ्टनंट पदावर आणि एअरफोर्स कॅडेट्सना (१ वर्षानंतर) फ्लाइंग ऑफिसर पदावर तैनात केले जाईल. आयएमए ट्रेनिंग दरम्यान जेंटलमन कॅडेट्सना रु.– ५६,१००/. स्टायपेंड (दरमहा) दिले जाईल.

लेखी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर एसएसबी सिलेक्शन सेंटर निवडीसाठी आणि मुलाखतीची तारीख निवडण्यासाठी उमेदवारांनी,

www.joinindianarmy.nic.in /
www.joinindiannavy.gov.in /
www.careerindianairforce.cdac.in
या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

NDA & NA Examination (I) २०२० जी १९ एप्रिल २०२० रोजी होणार होती ती कोविड – १९ च्या संकटामुळे पुढे ढकलली आहे.

आता या दोन्ही NDA & NA Examination (I) २०२० आणि NDA & NA Examination (II) २०२० परीक्षांसाठी एकच परीक्षा दि. ६ सप्टेंबर २०२० रोजी घेतली जाणार आहे.

NDA & NA Examination (I) २०२० चे उमेदवार ज्यांना NDA & NA Examination (II) २०२० साठी अर्ज करावयाचा आहे, त्यांनी याची नोंद घ्यावी की NDA & NA Examination (II) २०२० च्या अर्जावरील त्यांचे छायाचित्र, सही, केंद्राची निवड आणि फोटो आयडीवरून त्यांना परीक्षा केंद्राचे वाटप केले जाईल. छायाचित्र / सही / जन्मतारीख यांत दोन्ही परीक्षांसाठीच्या अर्जामधील तपशिलात फरक आढळल्यास अशा उमेदवारांना परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

NDA & NA Examination (I) २०२० साठी अर्ज केलेल्या उमेदवारांना NDA & NA Examination (II) २०२० साठी अर्ज करायचा असल्यास त्यांचा NDA & NA Examination (I) २०२० साठीचा RID नंबर NDA & NA Examination (II) २०२० च्या अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

शंकासमाधानासाठी यूपीएससीच्या सुविधा केंद्राचा टेलिफोन नं ०११– २३३८५२७१/२३३८११२५/ २३०९८५४३ वर कामाच्या दिवशी सकाळी १०.०० ते १७.०० वाजेपर्यंत संपर्क साधावा.

ऑनलाइन अर्ज www.upsconline.nic.in या संकेतस्थळावर ६ जुलै २०२० (१८.०० वाजे.) पर्यंत करावेत.

ऑनलाइन अर्ज १३ ते १९ जुलै २०२० पर्यंत मागे घेता येतील.

# सजग होणे गरजेचे

## करोनोत्तर आव्हाने

डॉ. श्रीराम गीत, करिअर समुपदेशक



*करोनानंतर नोकरी व्यवसायाच्या संधी कशा बदलत जातील, याबद्दल अनेकांच्या मनात शंका आहेत. टाळेबंदीच्या काळातील ठप्प झालेले व्यवहार आणि अर्थचक्रातील बदल पाहता त्या रास्तही आहेत पण पुढे काय हा प्रश्न प्रत्येकाच्या मनात आहेच. पुढच्या काळातील करिअरचा मार्ग कसा असेल, याविषयी विविध विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेली ही लेखमाला...*

**करोनानंतरचे वास्तव** अजून कोणालाच माहीत नाही. करोनाबरोबरचे युद्ध किंवा करोनाबरोबरच सहजीवन यावर विविध अंगाने घनघोर चर्चा होऊ शकते. मात्र करिअर वृत्तान्तच्या वाचकांच्या दृष्टीने गेल्या दशकातील शिक्षण (पदव्या) कसे असेल व ज्यातून हाती काय लागेल हा यक्षप्रश्न बनणार आहे, एवढे मात्र नक्की. कारण साधेसे आहे. येत्या वर्षा दोन वर्षात किमान २५ ते ३५ टक्के नोकऱ्या एकतर नष्ट होतील किंवा त्यातील कामाचे स्वरूप आमूलाग्र बदलत जाईल. या बदलाला सामोरे जाणे सोपे नाही. त्यासाठी येत्या सहा- सात वर्षांमध्ये शिकण्याच्या वयोगटातील म्हणजे यंदा दहावी पास होणाऱ्यांपासून पहिली पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांपर्यंत प्रत्येकाने सजग व्हायला हवे. म्हणजे नेमके काय करायचे?

आपण गेल्या ६० दिवसातील घरबंदीचे उदाहरण घेऊन हाच विषय विविध अंगांनी पाहिला तर? वृत्तपत्र, बातम्या, विश्लेषण व लेख यामध्ये रस असणाऱ्या अनेकांच्या लक्षात आले असेल की करोनासंदर्भात संख्याशास्त्र, साथींचा इतिहास, विषाणूंचा अभ्यास, समाजमनाचा अभ्यास, राज्यशास्त्रीय व घटनात्मक निर्णय, आंतरराष्ट्रीय ताणतणाव, यातून येणारे अर्थकारण या प्रत्येकाला जितके महत्त्व आले तितके महत्त्व कोव्हिड योद्धे म्हणून काम करणाऱ्या डॉक्टर्स व त्यांच्या मदतनीसांना मिळाले काय? मात्र त्यांच्या कामाचे फक्त कौतुक होत राहिले हे मात्र खरे.

करोनासंदर्भातील संशोधन क्षेत्रात तर अजूनच वेगळे दृश्य पाहायला मिळते. रसायनशास्त्रातील, औषधनिर्माण शास्त्रातील बायोटेक किंवा जेनेटिक्समधील भिंती पूर्णतः नष्ट झालेल्या सहज लक्षात येते. त्याचवेळी उपयोजित संशोधनाची मागणी प्रचंड वाढली. उदाहरण म्हणजे पीपीई सूट व मास्क यांची निर्मिती. व्हायरसला परिपूर्ण प्रतिबंध करून या दोन गोष्टींची निर्मिती सोपी नाही याचाच अर्थ संशोधनाचे विविध मार्ग असतात, पण त्याचे उपयोजन तितकेच महत्त्वाचे असते.

शिक्षण, कला क्षेत्र, मनोरंजन या तीन क्षेत्रात तर आमूलाग्र बदल या दोन महिन्यात साऱ्यांनीच अनुभवले आहेत. त्यातून ही तीनही क्षेत्रे अक्षरशः नव्याने कात टाकून उभी राहतील. त्यात होणारे बदल समजायला अजून काही महिने जावे लागणार आहेत हे मात्र नक्की. ट्रॅव्हल, हॉटेल, केटरिंग, इव्हेंटस, विमानसेवा या उद्योगांना मात्र सावरायला किती वेळ लागेल हे माहीत नाही.

या साऱ्यातून म्हणजेच करोनाच्या २०२० मधल्या मंथनातून दोन गोष्टी सुस्पष्ट होऊन पुन्हा अधोरेखित होत आहेत. पहिली म्हणजे आवडीचा विषय, त्याचेच फक्त शिक्षण, त्यातील पदव्या घेऊन बाहेर पडणारे निरुपयोगी ठरणार आहेत. आनुषंगिक उपयोजन व त्यासाठीचे कौशल्य मिळविणे ही सर्वात महत्त्वाची गरज राहणार आहे. दुसरी त्याहीपेक्षा महत्त्वाची आहे, याआधी त्यासाठी सजगपणा असा शब्द वापरला होता. सजगपणाचा सोपा अर्थ म्हणजे, 'हे माझे काम नाही हे' वाक्य विसरून 'जिथे काही कमी तिथे मी' ही वृत्ती अंगी बाणवणे. घरबंदीच्या काळात घरोघरी ही शिकवण अनेकांना मिळाली आहेच. त्याचे वर्णन इथे नको.

थोडक्यात स्पेशालिस्ट, कन्सल्टंट, अ‍ॅडव्हायजर अशा बिरुदांऐवजी सर्वसमावेशक जनरॅलिस्टसाठी येता काळ आश्वासक असणार आहे. ज्यांचे शिक्षण संपत आले आहे, यंदा हाती पदवी येणार आहे त्यांना हे जास्त लागू पडते. अधिक काय शिकू याऐवजी प्रथम काम शिक, अनुभव घे व त्यानंतर पुढचा विचार कर हे येत्या तीनचार वर्षात गरजेचे राहील. ज्या प्रगत देशात शिक्षणासाठी, स्थायिक होण्यासाठी इथले सारेच उत्सुक असतात. तिथले गेल्या ५० वर्षांचे वास्तव हेच सांगते. मात्र परदेशी विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फी रूपी डॉलर्ससाठी त्यांचे स्वागत होत असते. असे सारेच देश कोलमडले, भोवंडले आहेत. म्हणून हा उल्लेख.

येत्या काळात सामान्यज्ञानाऐवजी व्यवहारज्ञानावर भर देणारा प्रगती करत राहणार आहे. इंग्रजी गप्पांऐवजी इंग्रजी संवाद कौशल्यावर प्रभुत्व असलेली अनेक ग्रामीण मुले आज आयटी इंडस्ट्रीत पाय रोवून उभी आहेत. याउलट निव्वळ छान छान कॉलेज व छान मार्ग आणि कॅम्पस यातून निवडले गेलेले अनेकजण नोकरी राहील का जाईल, या चिंतेत आहेत.

इंटरनेट हे माहिती, ज्ञान मिळवण्याचे आणि सुलभ संवाद साधण्याचे माध्यम आहे, वेळ घालवायचे साधन नाही हे कळणारे चौकस, सजग विद्यार्थी यातून रस्ते शोधत आहेत. पुरेशा कष्टांसह त्यांना ते नक्की सापडतील.

या साऱ्याबद्दल अधिक नेमकेपणाने व विस्ताराने पुढच्या लेखातून पाहू या.

## शब्दकोडे - १४७



**आडवी विधाने :**
(१) ओळख, वशिला
(४) त्रास, तिरपीट, दुर्दशा
(७) अंदाज, अनुमान, तर्क
(८) रण, युद्ध
(९) श्वास, धाप
(११) फोडलेल्या नारळाचा अर्धा भाग
(१५) हत्ती
(१७) कायर, भित्रा
(१८) तत्काळ उत्तर देणारा, समयसूचकता असलेला
(२०) एक प्रकारचे हलके धान्य, हुलगा
(२२) जाडजूड दोर
(२५) गलबत, जहाज
(२६) हस्त, हात
(२८) साथीच्या रोगातून टोचतात औषध
(२९) ठिकाण, स्थळ
(३१) मृदंग, तबला, एक चर्मवाद्य
(३३) बनावट, खोटा
(३४) रोगी
(३५) शीर, धमनी, नस
(३६) खोगीर, आच्छादन

**उभी विधाने :**
(१) पराकाष्ठा, कमालीचा प्रयत्न
(२) अत्तराचा बोळा
(३) सैन्याला पुरवलेला अन्नसाठा
(४) लष्करी तुकडी वा मदत
(५) एक वनस्पती
(६) भार, बोजा, वजन
(१०) फळातील गाभा, गर
(१२) वाघाची गर्जना
(१३) द्वेष, मत्सर
(१४) किरीट, मुकूट
(१६) साक्ष; आपले म्हणणे
(१८) हातात हात घालून केलेले अभिवादन
(१९) धोबी, परीट
(२०) बेढप, विद्रूप
(२१) मरगळ, ग्लानी
(२३) तापाची कणकण, ताप चढण्यापूर्वी अंगावर येणारे शहारे
(२४) दंड, शिक्षा (२७) रात्र, निशा
(३०) नाग-साप यांचा खेळ करणारा
(३२) केस, कज्जा

– सरोज ताठरे

## सुडोकू - १४७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३ | | | | २ | |
| | | ५ | | | ९ | | | १ |
| | | | १ | २ | | ७ | | ५ |
| | | | | | ३ | ६ | | |
| | | ९ | २ | | ४ | ५ | | |
| | | ४ | ५ | | | | | |
| ६ | | २ | | ३ | १ | | | |
| ३ | | | ४ | | | ९ | | |
| | ७ | | | | ८ | | | |

## सुडोकू - १४६चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | १ | ५ | ४ | २ | ३ | ९ | ७ | ८ |
| २ | ९ | ४ | ६ | ८ | ७ | १ | ५ | ३ |
| ८ | ३ | ७ | ५ | १ | ९ | २ | ६ | ४ |
| ४ | ५ | २ | ९ | ७ | १ | ८ | ३ | ६ |
| ९ | ७ | ३ | २ | ६ | ८ | ४ | १ | ५ |
| १ | ८ | ६ | ३ | ४ | ५ | ७ | २ | ९ |
| ७ | ६ | १ | ८ | ३ | ४ | ५ | ९ | २ |
| ५ | २ | ८ | ७ | ९ | ६ | ३ | ४ | १ |
| ३ | ४ | ९ | १ | ५ | २ | ६ | ८ | ७ |

## शब्दकोडे क्र. १४६चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | तु | ल | नी | य | ■ | अं | गा | र | की |
| ल्प | ■ | ग | र | ज | वं | त | ■ | फू | ट |
| सं | क | ट | ■ | न | द | ■ | आ | ■ | क |
| तु | ला | ■ | सू | ■ | न | व | रो | ज | ■ |
| ष्ट | ■ | क | ट | क | ■ | त | प | मा | न |
| ■ | हे | र | ■ | वा | म | न | ■ | दा | त |
| ता | क | ■ | ग | ड | द | ■ | को | र | म |
| प | ट | वा | री | ■ | न | क | ली | ■ | स्त |
| ट | ■ | द | ब | द | बा | ■ | त | ब | क |
| ■ | छ | ळ | ■ | वा | ण | वा | ■ | स्त | ■ |



| सेन्सेक्स | | निफ्टी ५० | | डॉलर | | तेल | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३४,९११.३२ | १७९.५९ | १०,३११.२० | ६६.८० | ७६.०३ | ०.१७ | ४२.२२ | ०.०७ |

**लक्षणीय समभाग** ग्लेनमार्क फार्मा : रु. १,७५९.५० (+६.२३%) : फॅबीफ्ल्यू नावाने करोनाविषाणूच्या नायनाटासाठी औषध विकसित केल्यानंतर....

# जागतिक गुंतवणुकीकडे कल

## वैविध्य जपताना फंड सुरू करण्यासाठी घराण्यांची सेबीकडे परवानगी

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** मालमत्ता वैविध्यासाठी स्थानिक गुंतवणूकदार जागतिक गुंतवणुकीकडे वळलेले दिसत असल्याने फंड घराण्यांनी जागतिक गुंतवणूक करणारे फंड सुरू करण्यासाठी सेबीकडे परवानगी मागणारे अर्ज केले आहेत.

भारतीय भांडवली बाजार हे दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकदारांसाठी अधिक संपत्ती निर्मिती करत असले तरी भारतीय बाजारात निर्माण होणाऱ्या अस्थिरतेवर मात करण्यासाठी भारतीय गुंतवणूकदार जागतिक आणि विशेषतः अमेरिकेत गुंतवणूक करणाऱ्या बाजाराकडे वळत असल्याचे दिसत आहे.

> **आमच्याकडे सध्या एकूण गुंतवणुकीचा काही हिस्सा परदेशात गुंतवणूक करणाऱ्या दोन योजना असल्या तरी नजीकच्या भविष्यात आमच्या मालमत्ता व्यवस्थापन कंपनीत हिस्सेदार असलेल्या परदेशी गुंतवणूकदाराच्या सहयोगाने परदेशात गुंतवणूक करणारा फंड भारतीय गुंतवणूकदारांना उपलब्ध करून देऊ.**
> – अश्विन पटनी, उत्पादन विभाग प्रमुख, ॲक्सिस म्युच्युअल फंड.

रुपया परिवर्तनीय नसल्याने भारतीय गुंतवणूकदार परदेशात थेट समभाग गुंतवणूक करू शकत नाहीत. भारतीय गुंतवणूकदारांना जागतिक कंपन्यांच्या समभागात गुंतवणूक करण्यासाठी म्युच्युअल फंडांचा पर्याय उपलब्ध आहे.

भारतीय म्युच्युअल फंड परदेशातील कंपन्यांतून गुंतवणूक करतात. जागतिक गुंतवणूक करण्याकडे भारतीय गुंतवणूकदारांचा वाढता कल पाहून फंड घराण्यांनी या प्रकारचे फंड उपलब्ध करून देण्यासाठी अर्ज केले आहेत.

ॲक्सिस म्युच्युअल फंडाच्या उत्पादन विभागाचे प्रमुख अश्विन पटनी यांनी लोकसत्ताला सांगितले की, भारतीय बाजारपेठेत गुंतवणुकीची उत्तम संधी उपलब्ध असली तरी भारतीय बाजारपेठ केवळ जागतिक शेअर बाजाराच्या तुलनेत एक छोटा अंश व्यापते. अमेरिकेतील फक्त ३ मोठ्या सूचिबद्ध माहिती तंत्रज्ञान कंपन्यांचे एकत्रित भांडवली मूल्य एकूण भारतीय बाजारच्या भांडवली मूल्यापेक्षा भारतीय भांडवली बाजाराच्या आकारापेक्षा जास्त आहे.

जागतिक गुंतवणूक करणाऱ्या फंडांनी गुंतवणूकदारांना गेल्या १० वर्षात अधिक जोखीम समायोजित परतावा दिला आहे.

गुंतवणूकदाराच्या जोखिमांकाला अनुसरून अनेक सल्लागार आपल्या ग्राहकांना गुंतवणुकीचा थोडा हिस्सा जागतिक गुंतवणूक करणाऱ्या फंडात गुंतवायचा सल्ला गेल्या काही दिवसांपासून देत आहेत.

# निर्देशांकांचा तिमाही उच्चांक

**लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी**

**मुंबई :** आशियाई भांडवली बाजारातील घसरणीकडे दुर्लक्ष करत येथील वित्त क्षेत्रातील समभागांकरिता गुंतवणूकदारांनी खरेदी मागणी नोंदविल्याने सेन्सेक्स व निफ्टी त्यांच्या तिमाही उच्चांकावर पोहोचले. सप्ताहारंभीच्या व्यवहारातच दोन्ही प्रमुख निर्देशांकांनी अर्ध्या टक्क्याहून अधिक वाढ नोंदविली.

करोना व सीमावादाच्या पार्श्वभूमीवर आशियाई बाजारांमध्ये चिंताग्रस्त वातावरण होते. मात्र मुंबई व राष्ट्रीय शेअर बाजारातील गुतवणूकदारांनी बँक, औषधनिर्माण क्षेत्रातील समभागांची खरेदी केल्याने सेन्सेक्स व निफ्टी वाढले. सोमवारच्या सत्रात जवळपास ५०० अंश तेजी नोंदविणारा मुंबई निर्देशांक दिवसअखेर ३५ हजारानजीक पोहोचला.

## उद्यमशील, उद्य'मी'



# सामाजिक दायित्वाचा निर्देशांक

● **मकरंद जोशी**

भांडवली बाजार नियामक सेबी या यंत्रणेने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. सेबीने इशात हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एक गट स्थापन केला होता. त्या गटाने दिलेल्या अहवालात सामाजिक संस्था आणि सामाजिक बांधिलकी सांभाळून उद्योग करणाऱ्या संस्थांसाठी सामाजिक भांडवली बाजार (Social Stock Exchange) ही कल्पना प्रस्तावित केली आहे.

संयुक्त राष्ट्राने शाश्वत विकासासाठी १७ उद्दिष्टे निश्चित केली आहेत. ही उद्दिष्टे २०३० पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. बेन अँड कंपनीच्या अहवालानुसार ही उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी भारताला दरवर्षी काही लाख कोटी रुपये खर्च करावे लागतील तरच ही उद्दिष्टे पूर्ण होऊ शकतात.

२०१९-२० च्या अर्थसंकल्पावेळी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनीही सामाजिक संस्थांच्या निधी उभारणीसाठी एक सामाजिक भांडवली बाजाराचे सूतोवाच केले होते.

### सेबीच्या अहवालातील प्रस्ताव :

या अनुषंगाने सेबीने इशात हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली गट स्थापन केला होता. या गटाने अनेक प्रस्ताव केले आहेत. त्याप्रमाणे काही महत्त्वाचे प्रस्ताव पुढीलप्रमाणे -

१) सामाजिक संस्थांच्या निधी उभारणीसाठी सामाजिक भांडवली बाजाराची स्थापना करण्यात यावी.

२) सामाजिक संस्थांच्या निधी/भांडवल उभारणीसाठी स्वतंत्र निधी उभारण्यात यावा आणि त्याचे स्वतंत्र नियमन करणारे कायदे असावेत.

३) सामाजिक संस्थांनी केलेल्या कामाचा परिणाम मोजण्यासाठीचे मानक तयार करण्यात यावेत.

४) सामाजिक संस्थांच्या आर्थिक ताळेबंदाबाबत, त्याच्या कारभाराबाबत मानक तयार करण्यात यावेत.

### उच्चस्तरीय समिती २०१८ :

कंपनी व्यवहार खात्याने (Ministry of corporate Affairs) २०१८ साली एक उच्चस्तरीय समिती नियुक्त केली होती. त्याच्या आकडेवारीनुसार २०१४ पासून २०१८ पर्यंत कंपनी सामाजिक दायित्व (सीएसआर) हे ५०% (अंदाजे) पूर्ण झाले आहे आणि अनेक कंपन्यांनी आपले दायित्व पूर्ण केलेले नाही. २०१४ पासून २०१८ पर्यंत ३०,००० कोटी रुपये दायित्व थकीत आहे. त्याच समितीच्या अहवालाप्रमाणे सामाजिक संस्थांची नोंदणी आणि त्यांच्या आर्थिक शिस्तीचा विषय चर्चेत आला होता.

### सद्यःपरिस्थिती :

कंपनी कायदा २०१३ मध्ये कंपन्यांच्या सामाजिक दायित्वाविषयीच्या तरतुदींमध्ये सतत बदल होत गेले आणि काही बदल हे २०२० च्या कंपनी विधेयकामध्ये प्रलंबित आहेत. त्यानुसार जर कंपन्यांनी आपले दायित्व पूर्ण केले नाही तर त्यांना त्या दायित्वाच्या दुप्पट दंड होऊ शकतो. ही तरतूद अस्तित्वात आली तर दायित्व निर्वाहाला गती मिळण्याची शक्यता आहे. अशा वेळी सामाजिक संस्थांच्या विश्वासार्हतेच्या दृष्टीनेदेखील कडक नियम कंपनी कायद्यात होणे अपेक्षित आहे.

प्रत्येक सामाजिक संस्थेने कंपनी व्यवहार खात्याकडे नोंदणी केल्याशिवाय त्यांना कंपनी सामाजिक दायित्व घेता येणार नाही अशा प्रकारची तरतूद येऊ घातली आहे.

सामाजिक दायित्व आणि त्याची जबाबदारी उचलणाऱ्या सामाजिक संस्था दोघांसाठी कडक नियमावली येऊ घातली आहे आणि दुसऱ्या बाजूला चांगल्या दर्जाचं काम करणाऱ्या सामाजिक संस्थांच्या निधी उभारणीसाठी सामाजिक भांडवली बाजाराची निर्मितीही होण्याची शक्यता आहे.

### सामाजिक संस्थांसाठी सुवर्णसंधी :

ही सामाजिक संस्थांसाठी संधी आणि प्रचंड बदल घडवणारी वेळ आहे. खाली नमूद केलेल्या बाबींची ज्या संस्था पूर्तता करतील अशा संस्थांना भविष्यात निधीची कमी भासणार नाही.



१) स्वच्छ आणि पारदर्शक कारभार

२) कायदेशीर बाबींची अचूक पूर्तता

३) नियोजनबद्ध तसेच परिणामकारक काम करण्याची क्षमता सिद्ध करणे.

४) क्षमता सिद्ध करण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्र/पुराव्यांची जमवाजमव करण्याची आणि ते ठेवण्याची व्यवस्था विकसित करणे.

५) हितसंबंधाबाबत (Conflict of Interest) कठोर नियमावली तयार करणे आणि परिणामकारक अंमलबजावणी करणे.

६) वरील सर्व बाबी करताना खर्च नियंत्रणात ठेवणे.

एकंदर सामाजिक संस्था/कंपनी सामाजिक दायित्व हे येत्या काही काळात काही लाख कोटी उभे करून ते नाही रे समाजाकडे वळवतील, अशी अपेक्षा आहे.

या माध्यमातून अशा संस्थांसाठी आणि त्यांच्या कार्यवाहकांसाठी अनेक संधी निर्माण होतील. सामाजिक संस्था आणि त्याच्या कार्यवाहकांनी या संधीचं सोनं करण्यासाठी स्वतःला सिद्धं करणं आवश्यक आहे.

**(लेखक कंपनी सचिव आहेत.)**


● makarandjoshi@mmjc.in


## चिनी वस्तू नको; स्वदेशी वापरा - क्रेडाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** विकासकांनी प्रकल्पांसाठीच्या बांधकामात चिनी साहित्य व उत्पादनांवर अलवंबून न राहता स्वदेशी उत्पादनांवर भर द्यावा, असे आवाहन क्रेडाई संघटनेने सभासदांना केले आहे. क्रेडाईचे देशभरात २० हजारांहून अधिक सभासद आहेत.

'क्रेडाई'चे अध्यक्ष सतीश मगर यांनी सांगितले की, सदस्य विकासकांनी 'स्वदेशी' किंवा 'मेड इन इंडिया' संकल्पना जीवनशैलीत व व्यवसायात प्रभावीपणे अंगीकारावी.

क्षेत्राशी निगडित २५० उद्योगांनी चीनमधून आयात होणारी उत्पादने स्थानिक लघू उद्योजकांमार्फत स्थानिक पातळीवरच तयार करावीत आणि अर्थव्यवस्थेला पाठिंबा द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

# राज्य बँकेला ३२५ कोटींचा नफा

## १०९ वर्षांच्या इतिहासात प्रथमच नक्त अनुत्पादित मालमत्ता शून्यावर

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** संचालक मंडळाचा मनमानी कारभार आणि ढासळलेली आर्थिक स्थिती यामुळे प्रशासक नियुक्तीची आफत ओढवलेल्या राज्य सहकारी बँकेने पुन्हा एकदा मोठी झेप घेतली असून १०९ वर्षांच्या इतिहासात प्रथमच अनुत्पादक कर्जाचे निव्वळ प्रमाण शुन्यावर आणण्यात बँकेला यश आले आहे. त्याचप्रमाणे यावेळी बँकेला तब्बल ३२५ कोटींचा निव्वळ नफा झाला आहे.

राज्य बँकेची आर्थिक स्थिती खालावल्यामुळे रिझर्व्ह बँकेने ७ मे २०११ रोजी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन प्रशासकांची नेमणूक केली होती. तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या या कारवाईवरून काँग्रेस-राष्ट्रवादीतील राजकारण विकोपास गेले होते. त्यावेळी बँकेस १,०६९ कोटीचा तोटा होता. मात्र गेल्या नऊ वर्षात प्रशासकांनी या बँकेला पूर्वपदावर आणण्यात यश मिळविले आहे.

मार्च अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला एक हजार ३४५ कोटींचा ढोबळ तर विविध तरतुदीनंतर ३२५ कोटीचा निव्वळ नफा झाला आहे.

वैधानिक तपासणीमध्ये गेली ७ वर्ष बँकेस ऑडिट वर्ग 'अ' प्राप्त होत आहे. गेली ६ वर्ष बँक सभासदांना १० टक्के लाभांश देत असून बँकेचे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाणही रिझर्व्ह बँकेच्या ९ टक्क्यांच्या निकषापेक्षा जास्त म्हणजे १३.११ टक्के आहे.

बँकेच्या भांडवलावरील परताव्याचे प्रमाण गेल्या वर्षीच्या ८.४४ टक्क्यावरून १४.२४ टक्क्यांवर पोहोचले आहे. तर राष्ट्रीय स्तरावरील सरासरी प्रमाण ६.२६ टक्के आहे.

बँकेने प्रथमच अनुप्तादक कर्जासाठी शंभर टक्के तरतूद केल्यानेअनुत्पादक कर्जाचे निव्वळ प्रमाण शुन्यावर आले आहे.

देश पातळीवर व्यापारी बँकाचे हे प्रमाण ४६ टक्के असून सहकारी बँकांचे ६४ टक्के असल्याची माहिती बँकेच्या प्रशासक मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी दिली.

बँकेने व्यवहार जिल्हा बँका अथवा साखर कारखान्यांपुरते मर्यादित न ठेवता, राज्यातील सर्व जिल्हा बँका, पतसंस्था, गृहनिर्माण सोसायट्या व इतर सर्व सहकारी संस्थांसाठी राबविलेल्या अनेक योजनांमुळे बँकचा आलेख उंचावल्याचे सांगण्यात आले.

याचबरोबर बँकेने राज्यातील नागरी सहकारी बँकांना सरकारी कर्जरोख्यांची खरेदी / विक्री करण्यासाठी स्वतंत्र मंच उपलब्ध करुन दिला असून आरटीजीएस तसेच एनईएफटी या निधी हस्तांतरण व्यवहारांसाठी थेट पोर्टल उपलब्ध करुन दिले आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

**क्रीडा**

## संक्षिप्त

### करोनाविरुद्धच्या लढाईत खेळ गरजेचा -सिंधू

**नवी दिल्ली :** करोना संसर्गावरील लस अजून सापडली नसली तरी खेळामुळे या संसर्गावर मात करण्यास यश येईल, असा विश्वास भारताची अव्वल बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने व्यक्त केला आहे. ''रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी खेळ आणि अन्य शारीरिक हालचाली आवश्यक आहेत. करोनावर अद्याप लस सापडलेली नाही किंवा योग्य ते उपचारदेखील नाहीत, अशा स्थितीत खेळ हे करोनाविरुद्धच्या लढाईत सर्वाधिक योगदान देऊ शकतात,'' असे सिंधूने सांगितले. ''व्यायामामुळे हृदयरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग यांसारख्या आजारांना दूर ठेवता येईल,'' असा सल्ला सिंधूने दिला .

### टेनिसपटू बोर्ना कोरिकला करोनाची बाधा

**झाग्रेब (क्रोएशिया) :** क्रोएशिया येथील प्रदर्शनीय स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर टेनिसपटू बोर्ना कोरिकला करोना झाला आहे. ३३व्या स्थानी असलेला कोरिक हा ग्रिगोर दिमित्रोव्हनंतर करोना झालेला दुसरा टेनिसपटू ठरला आहे. यामुळे ही प्रदर्शनीय स्पर्धा रद्द करावी लागली. या स्पर्धेत नोव्हाक जोकोव्हिच अंतिम फेरीत खेळणार होता.

### 'अमेरिकेत विश्वचषक मल्लखांब घेणार'

**मुंबई :** दुसरी विश्वचषक मल्लखांब स्पर्धा अमेरिकेत आयोजित करण्याचा प्रयत्न आहे, असे अमेरिका मल्लखांब महासंघाचे सचिव चिन्मय पाटणकर यांनी सांगितले. आंतरराष्ट्रीय मल्लखांब दिन १५ जून रोजी साजरा करण्यात आला. मल्लखांबमधील मंडळींनी खेळ प्रगतीपथावर असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. 'दुसरी विश्वचषक स्पर्धा अमेरिकेत घेण्याचा प्रयत्न आहे. अमेरिकेत मल्लखांब वाढत आहे,'' असे पाटणकर म्हणाले.

# चिनी उपकरणांवर बंदी!

## भारतीय वेटलिफ्टिंग महासंघाचा बहिष्काराचा निर्णय

**पीटीआय, नवी दिल्ली**



(प्रातिनिधिक छायाचित्र)

**चीनमधून आयात** केलेली उपकरणे सदोष असल्याचे सांगत भारतीय वेटलिफ्टिंग महासंघाने (आयडब्ल्यूएलएफ) आता यापुढे चिनी बनावटीची कोणतीही उपकरणे न वापरण्याचा निर्णय घेतला आहे.

गेल्या आठवड्यात लडाखमधील गलवान खोऱ्यात चीनच्या सैन्याशी झालेल्या चकमकीत २० भारतीय जवानांना आपले प्राण गमवावे लागल्यानंतर चिनी मालावर बहिष्कार घालण्याची मागणी जोर धरत आहे. भारतीय वेटलिफ्टिंग महासंघाने गेल्या वर्षी बार्बेल्स आणि वजनाच्या प्लेटसह वेटलिफ्टिंगचे चार संच चीनची कंपनी 'झेडके सी'कडून मागवले होते. ही सर्व उपकरणे सदोष असून सध्या वेटलिफ्टर्स यापैकी कोणतीही उपकरणे वापरत नाहीत, असा दावा महासंघाने केला आहे.

महासंघाने चीनच्या वस्तू न वापरण्याबद्दलचे पत्र भारतीय क्रीडा प्राधिकरणाला (साइ) पाठवले आहे. ''भविष्यात आम्ही चिनी बनावटीची कोणतीही उपकरणे वापरणार नाहीत. भारतीय कंपन्याकडून बनवली गेलेली किंवा चीन वगळून अन्य कंपन्यांनी बनवलेली उपकरणे आम्ही वापरणार आहोत,'' असे या पत्रात महासंघाचे सरचिटणीस सहदेव यादव यांनी सांगितले. त्यातच वजनाच्या प्लेट्स दुय्यम दर्जाच्या होत्या, असा दावाही राष्ट्रीय प्रशिक्षक विजय शर्मा यांनी केला आहे.

''करोनानंतर सरावाला सुरुवात झाल्यावर हे सर्व संच खराब झाले आहेत. आम्ही ते वापरत नाहीत. शिबिरातील सर्व खेळाडू चीनच्या या उपकरणांविरोधात बोलत आहेत. ऑनलाइन वस्तू मागवतानाही ते कोणत्या देशातून आयात केले आहे, हेसुद्धा ते पाहत आहेत,'' असे शर्मा म्हणाले. ही उपकरणे चीनमधूनच का मागवण्यात आली होती, या प्रश्नाचे उत्तर देताना शर्मा यांनी सांगितले की,

''टोक्यो ऑलिम्पिकमध्ये चीनमधलीच उपकरणे वापरण्यात येणार होती. त्याच्याशी जुळवून घेण्याकरिता आमच्यापुढे कोणताही पर्याय नव्हता. ऑलिम्पिकच्या तयारीसाठी आम्ही हे चार संच मागवले होते. पण करोनानंतर सरावाला प्रारंभ झाल्यावर आम्ही त्याचा वापर करणे सोडून दिले आहे. आम्ही पहिल्यांदाच चीनमधून ही उपकरणे मागवली होती. या उपकरणाचा दर्जा सुमार असल्यामुळे आम्ही यापुढे चिनी उपकरणे वापरणार नाहीत.''

> **यापुढे आम्ही चीनच्या सर्व वस्तूंवर बहिष्कार घालणार आहोत. चीनमध्ये बनवलेली कोणतीही उपकरणे भविष्यात वापरणार नाही, असे भारतीय वेटलिफ्टिंग महासंघाने ठरवले आहे.**
> – सहदेव यादव, सरचिटणीस

भारतीय वेटलिफ्टर्स सध्या स्वीडनमधील 'इलिको' कंपनीची उपकरणे वापरत आहेत. ''टाळेबंदी शिथिल केल्यानंतर आम्ही स्वीडनच्या कंपनीची उपकरणे वापरत आहोत. 'साइ'ने आम्हाला १० संच दिले आहेत. बहुतेक आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये हीच उपकरणे वापरली जातात. चिनी उपकरणांना भारतीय उपकरणांचाही पर्याय आहे,'' असेही शर्मा म्हणाले.

गलवान खोऱ्यातील चकमकीनंतर चिनी मालावर बहिष्कार घालण्याची मागणी होत आहे, असे भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनकडून (आयओए) स्पष्ट करण्यात आले आहे.

# राजिंदर गोएल यांना क्रिकेट क्षेत्रातून श्रद्धांजली

## भारताकडून खेळण्याची इच्छा अधुरीच

**पीटीआय, नवी दिल्ली**



**देशांतर्गत क्रिकेटमधील** महान गोलंदाज राजिंदर गोएल यांचे रविवारी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. त्यांना सोमवारी क्रिकेटविश्वातून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

रणजी करंडक स्पर्धेत सर्वाधिक ६३७ बळींचा विक्रम आजही राजिंदर यांच्या नावावर अबाधित आहे. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये सुरुवातीला पंजाब आणि नंतर हरयाणाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजिंदर यांनी ७५०पेक्षा अधिक बळी मिळवले आहेत. बिशन सिंग बेदी, भागवत चंद्रशेखर, इरापल्ली प्रसन्ना आणि एस. वेंकटराघवन हे फिरकीपटू देशाचे प्रतिनिधित्व करत असताना राजिंदर मात्र देशांतर्गत क्रिकेटपुरतेच मर्यादित राहिले. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सामनाधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या राजिंदर यांना २०१२मध्ये बीसीसीआयच्या जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. देशातील आजी-माजी क्रिकेटपटूंनी राजिंदर यांना श्रद्धांजली वाहिली.

''रणजी करंडक स्पर्धेत ६००पेक्षा अधिक बळी मिळवणाऱ्या राजिंदर गोएल यांच्या निधनाची बातमी ऐकून दुःख झाले. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो,'' अशा शब्दांत महान फलंदाज सचिन तेंडुलकरने श्रद्धांजली वाहिली. ''गोएल यांच्या रूपाने आपण महान खेळाडू गमावला. रणजी क्रिकेटमधील ते सर्वाधिक बळी मिळवणारे गोलंदाज होते. या संकटातून सावरण्याचे बळ त्यांच्या कुटुंबियांना मिळो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना,'' असे ट्विट भारताचा कर्णधार विराट कोहलीने केले आहे.

''आम्हा दोघांनाही भारताकडून खेळता आले नाही, याचे दुःख आहे. मैदानात आमच्यात प्रतिस्पर्धी म्हणून वैमनस्य होते. पण एकमेकांबद्दल नितांत आदर होता. त्यांच्या गोलंदाजीची शैली वेगळी होती. कदाचित माझ्यापेक्षाही ते चांगले गोलंदाज होते. त्यांच्या निधनाची बातमी ऐकून मला धक्काच बसला,'' अशा शब्दांत मुंबईचे माजी फिरकीपटू पद्माकर शिवलकर यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

माजी कर्णधार आणि 'बीसीसीआय'चा माजी अध्यक्ष सौरव गांगुलीनेही दुःख व्यक्त केले. तो म्हणाला की, ''भारतीय क्रिकेट विश्वाने आज एक महान देशांतर्गत खेळाडू गमावला. त्यांचे विक्रम हेच त्यांच्या महानतेची साक्ष आहेत. २५ वर्षांहून अधिक काळ सातत्याने कामगिरी करणारे ते एकमेव गोलंदाज होते, असे मला वाटते.''

# नेमबाज पूर्णिमाचे कर्करोगाने निधन



**मुंबई :** भारतीय नेमबाज पूर्णिमा झणाणे (लग्नापूर्वीची पूर्णिमा गव्हाणे) हिचे वयाच्या ४२व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले आहे. आंतरराष्ट्रीय नेमबाजी महासंघाची मान्यताप्राप्त प्रशिक्षक असलेली पूर्णिमा गेल्या दोन वर्षांपासून कर्करोगाशी झुंज देत होती. सोमवारी तिची प्राणज्योत मालवली. पूर्णिमाने आयएसएसएफ विश्वचषक, आशियाई क्रीडा स्पर्धा तसेच राष्ट्रकुल स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. नांदेड येथे जन्मलेल्या पूर्णिमाने मुंबईतून आपल्या नेमबाजी कारकीर्दीला सुरुवात केली होती. तिला शिवछत्रपती पुरस्कारानेही गौरवण्यात आले होते. १० मीटर एअर रायफल प्रकारात राष्ट्रीय विक्रमाचीही तिने नोंद केली होती. निवृत्तीनंतर पूर्णिमाने श्रीलंकेच्या संघाचे प्रशिक्षकपद भूषवले होते.

उपचारानंतर पूर्णिमाची तब्येत सुधारली होती, असे माजी नेमबाज जॉयदीप कर्माकरने सांगितले. ''पूर्णिमाच्या निधनाची बातमी ऐकून मला धक्काच बसला. कनिष्ठ गटात खेळताना आमच्यात चांगली मैत्री झाली होती,'' असे त्याने म्हटले.

# रेयाल माद्रिद अव्वल स्थानी

**पीटीआय, माद्रिद**



करीम बेंझेमा

**सर्जिओ रामोस** आणि करीम बेंझेमा यांनी केलेल्या प्रत्येकी एका गोलमुळे रेयाल माद्रिदने ला-लिगा फुटबॉलमध्ये रेयाल सोसिएदादला २-१ असे नमवले. या विजयासह करोनाच्या काळात फुटबॉल सुरू झाल्यावर रेयाल माद्रिदने प्रथमच ला-लिगामध्ये बार्सिलोनाला मागे टाकून अव्वल स्थान पटकावले आहे.

रॅमोसने ५०व्या मिनिटाला पेनल्टीच्या संधीवर गोल केला. त्यापाठोपाठ बेन्झेमाने प्रभावी कामगिरी कायम ठेवत ७०व्या मिनिटाला गोल केला. या विजयामुळे रेयाल माद्रिदचे बार्सिलोनाप्रमाणेच समान ६५ गुण झाले आहेत. मात्र गोलांच्या सरासरीच्या फरकावर रेयाल माद्रिदने अग्रस्थान पटकावले. अर्थातच शनिवारी सेव्हिलाने बरोबरीत रोखल्याने बार्सिलोनाची आघाडी पटकावण्याची संधी हुकली.

**लिव्हरपूलची विजेतेपदाची प्रतीक्षा लांबणीवर**

इंग्लिश प्रीमियर लीगचे (ईपीएल) ३० वर्षांनंतर विजेतेपद पटकावण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या लिव्हरपूलला रविवारी एव्हरटनने गोलशून्य बरोबरीत रोखले. या बरोबरीमुळे विजेतेपदाची लिव्हरपूलची प्रतीक्षा लांबणीवर पडली. लिव्हरपूलकडे २३ गुणांची भक्कम आघाडी आहे. चेल्सीने ॲस्टन व्हिलाचा २-१ पराभव केला.

# महिला विश्वचषक फुटबॉल यजमानपदातून जपानची माघार

**पीटीआय, टोक्यो**

**जपानने २०२३च्या** महिलांच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या यजमानपदातून माघार घेतली आहे. जपानने माघार घेतल्याने ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंड हे यजमानपदासाठी भक्कम दावेदार आहेत.

महिलांच्या विश्वचषकाच्या यजमानपदातून माघार घेत असल्याचे जपान फुटबॉल संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले. ''जपानला महिलांच्या विश्वचषक फुटबॉलच्या यजमानपदाच्या शर्यतीतून माघार घेत असल्याचे नाइलाजास्तव जाहीर करावे लागत आहे,'' असे जपान फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष कोझो ताशिमा यांनी सांगितले. या महिन्याच्या सुरुवातीलाच ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडला सर्वाधिक पसंती आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाकडून (फिफा) मिळाली होती. 'फिफा'कडून येत्या गुरुवारी यजमान देशाची घोषणा करण्यात येणार आहे.


हे पत्र वैदेही ठकार यांनी द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेडकरिता (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) इंडियन एक्स्प्रेस प्रेस, सर्व्हे क्र. २८८, प्लॉट नं. १ व २, रायसोनी इंडस्ट्रीयल पार्क, मु. पो. माण, ता. मुळशी, जि. पुणे ४११०२७ येथे छापून द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड, 'एक्स्प्रेस हाऊस', प्लॉट नं. १२०५/२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रसिद्ध केले. दूरध्वनी - ६७२४१०००. फॅक्स - ६७२४११४७ ● लोकसत्ता कार्यालय : एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : ०२२-२२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : ०२२-२२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४००७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. नागपूर कार्यालय : प्लॉट. न. ३८, ऑडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७, अहमदनगर ०२४१- २४५१९०७, फॅक्स -२४५१६०७. कोल्हापूर ०२३१- २६४४९९४.

■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर ■ सहायक संपादक : मुकुंद संगोराम * (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) Regd, No. RNI 56975/92



© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.

epaper.loksatta.com